उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक



◀◀ अवघा रंग एक झाला.. रंगी रंगला श्रीरंग ◀◀ नाशिक आज

# गांवकरी



◀◀ येवला शहरात रंगले सामने, बघण्यासाठी नागरिकांची गर्दी◀◀ नाशिक आज

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १७९ ■ नाशिक, शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा



नाशिक : शहरभरात रंगांची मुक्तहस्त उधळण करत रंगपंचमी साजरी करण्यात आली. यानिमित्त शनी चौक येथील पेशवेकालीन रहाडीत धप्पा देत उड्या घेत नाशिककर रंगांमध्ये न्हाऊन निघाले. (छाया : जगदीश सोनवणे)






# दोघा सखख्या भावांची वर्चस्ववादातून हत्या

## आंबेडकरवाडीतील घटना; पाच ताब्यात

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

नाशिक-पुणे महामार्गावरील आंबेडकरवाडी येथे बुधवारी (दि.१९) रात्री दोन सख्ख्या भावांवर धारदार शस्त्राने हल्ला करत त्यांची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे उपाध्यक्ष उमेश तथा मन्ना जाधव (वय ३२) व प्रशांत जाधव (वय ३०) अशी हत्या झालेल्या दोघा भावांची नावे आहेत. दरम्यान, घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. संशयित सागर गरड तसेच अनिल रेडेकर, सचिन रेडेकर, योगेश रोकडे, अविनाश उर्फ सोनू उशिरे, सागर गरड यांनी पूर्ववैमनस्य तसेच आंबेडकरवाडी परिसरात आपलेच वर्चस्व राहावे म्हणून जाधव भावंडांवर प्राणघातक हल्ला करून त्यांची हत्या केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, गुन्हे शाखा युनिट एकने तत्काळ तपासाची चक्रे फिरवत संशयितांना ताब्यात घेतले.

घटनेचे वृत्त समजताच पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे, पोलीस निरीक्षक संजीव फुलपगारे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर सोनवणे आदींनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. यावेळी आंबेडकरवाडीत तणावाचे /-...४



### संशयितांची परिसरात दहशत

या हल्ल्यात धारदार शस्त्रे तसेच लोखंडी रॉडचा वापर करण्यात आला. मारेकऱ्यांनी उमेश व प्रशांत जाधव यांच्या डोके, छाती, पोट तसेच शरीरावर सपासप वार केले. मारेकऱ्यांची आंबेडकरवाडीत दहशत आहे. संशयितांसमवेत जाधव बंधू यांचा वाद झाला होता. त्या वादाचा राग मारेकऱ्यांनी मनात धरून प्रशांत व उमेश या दोघा भावांवर हल्ला करत त्यांची हत्या केली.

### महत्त्वाचे

**सहा जणांवर देशद्रोहाचा गुन्हा**

**नागपूर :** नागपुरात सोमवारी (दि. १७) सायंकाळी दोन गटांत तुफान दगडफेक झाल्याची घटना घडली होती. या दंगलीचा मास्टरमाइंड असल्याचा ठपका मायनॉरिटीज डेमोक्रॅटिक पार्टीचा शहराध्यक्ष फहीम खानसह सहा जणांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
या प्रकरणात सायबर पोलीस ठाण्यात चार एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. यात औरंगजेबच्या विरोधात जे आंदोलन झाले त्या आंदोलनाचा व्हिडिओ लोकांनी तयार केला होता, व्हिडिओ रेकॉर्ड करून अफवा पसरवल्या गेल्या आणि दंगल भडकली.

**खोक्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत**

**शिरूर :** सतीश भोसले उर्फ खोक्याला शिरूर दिवाणी व फौजदारी न्यायालयात हजर केले असता १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. शिरूर येथील ढाकणे पितापुत्राला मारहाण केल्याप्रकरणी भोसले अटकेत आहे. सात दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर काल त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. पाच वर्षांपासून तो राजकारणात सक्रिय आहे.

**५९ वर्षीय महिलेची एव्हरेस्टवर चढाई**

**नवी दिल्ली :** कोणतेही अधिकृत प्रशिक्षण न घेता केरळमधील ५९ वर्षीय महिला वासंती चेरुवीत्तील यांनी जगातील सर्वांत उंच एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत केले आहे. त्यांनी यासाठी यूट्यूबवरील व्हिडिओ पाहून स्वतःची तयारी केली होती. वासंती यांनी १५ फेब्रुवारी रोजी नेपाळमधील सुर्के येथून मोहीम सुरू केली. २३ फेब्रुवारी रोजी त्या बेस कॅम्पवर दाखल झाल्या. त्या म्हणाल्या, मी दररोज सकाळी तीन तास चालायचे, ट्रेकिंग शूज परिधान करून बराच वेळ सराव करायचे. प्रवासादरम्यान वासंती अनेकांना भेटल्या.

**टीम इंडियाला ५८ कोटींचे बक्षीस**

**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या स्पर्धेत न्यूझीलंडला ४ विकेट्सने पराभूत करणाऱ्या भारतीय संघाला आयसीसीने १९.५० कोटी रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते. त्यानंतर आता बीसीसीआयने आयसीसीकडून मिळणाऱ्या रकमेपेक्षा तीनपट जास्त रकमेचे म्हणजेच संपूर्ण संघासाठी रोख ५८ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

# आदित्य ठाकरेंना तत्काळ अटक करा

## दिशा सालियन प्रकरणात सत्ताधाऱ्यांची सभागृहात मागणी

**मुंबई :**
**दिशा सालियन मृत्यूप्रकरणात तिच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेत आदित्य ठाकरे यांचा हत्याप्रकरणाशी संबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या आरोपांनंतर भाजपच्या आमदारांनी गुरुवारी (दि.२०) सत्ताधारी आमदारांकडून विधानसभेत मुद्दा उपस्थित करत आदित्य ठाकरे यांना अटक करण्याची मागणी केली.**



दिशा सालियनच्या वडिलांना गँगरेप करून दिशाचा खून करण्यात आला, असा संशय आहे. मविआ सरकारच्या काळात हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळी मुंबईच्या महापौर भेटल्या, त्यांनी दिशाभूल केली. त्यांनी आपल्याला प्रसारमाध्यमांसमोर येण्यापासून रोखले. आपल्यावर दडपण आणण्यात आले. त्यामुळे आपण या गोष्टी समोर आणू शकलो नाही, असे दिशाच्या वडिलांचे म्हणणे आहे.


गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिशा सालियन प्रकरणात एसआयटी चौकशी सुरू असल्याचे सांगितले. त्याचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. मात्र, आम्ही कोर्टाच्या निर्देशानुसार कारवाई करू, असे योगेश कदम यांनी सांगितले. नितेश राणे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या एका आदेशानुसार अशा प्रकरणात ज्या संबंधित व्यक्तीवर आरोप होतो, त्याला तत्काळ अटक करून त्याची /-...४

### कोर्टात उत्तर देऊ : ठाकरे

या प्रकरणी आदित्य ठाकरे म्हणाले की, पाच वर्षांपासून सातत्याने बदनामीचा प्रयत्न होतच आहे. त्यांना आम्ही औरंगजेबावर एक्स्पोज केले. एका मंत्र्याला राजीनामा द्यायला लागला. हे सगळं झाल्यानंतर आज हाऊस बंद कशावरून पाडायचे तर माझ्यावरून पाडायचे. तुम्ही महाराष्ट्राबद्दल चर्चा करा. पाच वर्षांपासून सातत्याने बदनामीचा प्रयत्न होतच आहे. कोर्टात उत्तर देऊ, असे त्यांनी म्हटले.

# ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना ‘महाराष्ट्र भूषण’ जाहीर

**मुंबई :** नामवंत शिल्पकार राम सुतार यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत विधानसभेत घोषणा केली. राम सुतार यांचे वय १०० वर्षे असून, आजही ते शिल्प तयार करतात, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना २०१६ मध्ये पद्मभूषण आणि १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



राम सुतार हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मुक्त शिल्पकार आहेत. यांचा जन्म इ.स.१९२५ मध्ये धुळे जिल्ह्यातील गोंदूर येथे झाला होता. देशभरात त्यांनी अनेक मोठी शिल्प तयार केली आहेत. त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या स्टॅच्यू ऑफ युनिटी या देशातील सर्वांत उंच शिल्प पुतळ्याचे कामही त्यांनीच केले आहे. गेल्या चाळीस वर्षांत त्यांनी पन्नासहून अधिक भव्य शिल्पे तयार केली आहेत. राम सुतार यांनी जेजे स्कूल ऑफ ओरिएंटमधून आपले शिक्षण पूर्ण केले असून, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणासोबत त्यांनी वेरूळ गुंफांमध्ये काम केले. १९६१ मध्ये गांधी सागर धरणावर चंबळ देवीची ४५ फूट उंच मूर्ती तयार करण्याची संधी त्यांना मिळाली. राम सुतार यांनी ३०० फूट उंच जटायूची कांस्य मूर्ती बनवली. जटायूच्या पुतळ्यानंतर त्यांनी अयोध्येत श्रीरामाची मूर्ती बनवली. त्यांनी ट्रस्टला भगवान रामाची मूर्ती बनवण्यासाठी दोन पर्याय दिले होते, त्यापैकी एक युद्धाच्या स्थितीत असलेली मूर्ती होती आणि दुसरी मूर्ती भगवान राम यांना अयोध्येचा राजा म्हणून दाखवणारी होती. त्यांनी संसद भवन परिसरात महात्मा गांधी, महाराजा रणजित सिंग, महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, सरदार पटेल, जयप्रकाश नारायण इत्यादींचे पुतळेही बनवले. यापैकी संसद भवनात बसवलेला ध्यानस्थ अवस्थेतील महात्मा गांधींचा पूर्णाकृती पुतळा अद्भुत आहे. संसद भवनात बसवण्यात आलेला छत्रपती शिवाजींचा १८ फूट उंच तांब्याचा पुतळा राम सुतार यांनी साकारला.



# बस्तरमध्ये चकमकीत २४ नक्षलींचा खात्मा

**छत्तीसगड :** राज्यातील बस्तरमध्ये झालेल्या दोन चकमकींत २४ नक्षलवाद्यांना सुरक्षा दलाने ठार केले. विजापूरमध्ये २० आणि कांकेरमध्ये ४ नक्षलवादी ठार झाले. स्वयंचलित शस्त्रांसह सर्व मृतदेह जप्त करण्यात आले आहेत. एक डीआरजी (जिल्हा राखीव रक्षक) जवान शहीद झाला आहे.

विजापूर-दंतेवाडा सीमेवरील नक्षलवाद्यांच्या मुख्य भागात सैन्याने प्रवेश केला आहे. जवानांनी नक्षलवाद्यांच्या मोठ्या कार्यकर्त्यांना घेरले आहे. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू आहे. या वर्षी आतापर्यंत छत्तीसगडमध्ये ७१ नक्षलवादी ठार झाले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, २०२४ मध्ये जवानांनी वेगवेगळ्या चकमकीत सुमारे ३०० नक्षलवाद्यांना ठार केले आहे. २९० शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. गांगलूर परिसरात मोठ्या प्रमाणात नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे पोलिसांनी दंतेवाडा आणि विजापूर सीमेवर संयुक्त कारवाई सुरू केली. एक दिवस आधी सैनिकांनी उंद्री परिसराला वेढा घातला होता. गुरुवारी सकाळपासूनच जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये /-...४

# नवीन शैक्षणिक वर्षात पहिलीसाठी सीबीएसई पॅटर्न

**मुंबई :** राज्यातील राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता पहिलासाठी हा पॅटर्न लागू होणार आहे. पुढच्या वर्षी दोन टप्प्यांत दुसरी आणि तिसरी, चौथीसाठी लागू करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. हा पॅटर्न लागू केल्याने शाळांमध्ये कुठलीही फीवाढ होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतर राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे दादा भुसे यांनी यापूर्वीच म्हटले होते. मंत्री भुसे म्हणाले, पुढच्या वर्षाच्या दोन टप्प्यांत पूर्ण शिक्षण आपण सीबीएससी पॅटर्नवर नेणार आहोत. सीबीएससी पॅटर्नमध्ये आपल्याला ३० टक्क्यांपर्यंतची स्थानिक सवलत आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, मराठी याला प्राधान्य देण्यात येईल. सीबीएससीची पुस्तकेही मराठीत तयार केली जातील. राज्यातील सर्वच शाळांना मराठी विषय बंधनकारक आहे, त्यात मराठीची डिग्री गरजेची असेल. राज्यात शाळांसाठी सीबीएसई बोर्डाचा अभ्यासक्रम स्वीकारण्याबाबत व त्याच्या अंमलबजावणीबाबत विचारविनिमय सुरू आहे. या सगळ्यासंदर्भात सुकाणू समितीकडून विचारविनिमय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे लेखी उत्तर शालेय शिक्षणमंत्र्यांकडून आज विधान परिषद सभागृहात देण्यात आले. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने जानेवारी २०२५ मध्ये मान्यता दिली आहे. मात्र, या सगळ्यांमध्ये विचारविनिमय करून शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न कधी राबवायचा, याबाबत लवकरच निर्णय घेतला जाणार आहे.




# ‘कमवत्या महिलांनी पोटगी मागू नये’

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणीवेळी सक्षम महिलांनी पतीकडून पोटगी मागू नये, नोकरीचा योग्य अनुभव असलेली सुशिक्षित पत्नी फक्त पतीकडून पोटगी मिळवण्यासाठी बेरोजगार राहू शकत नाही, असे म्हटले आहे. उच्च न्यायालयात अंतरिम पोटगी मिळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आली होती. पत्नीने दाखल केलेली ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

दिल्ली उच्च न्यायालयाने या निर्णयावर स्पष्टीकारण देखील दिले. न्यायमूर्ती चंद्रधारी सिंह यांनी म्हटले की, कायदा आळशीपणाला प्रोत्साहन देत नाही आणि कमाईची क्षमता असलेल्या पात्र महिलांनी त्यांच्या पतींकडून अंतरिम पोटगीसाठी दावा देखील करू नये. सीआरपीसीच्या कलम १२५ मध्ये पती-पत्नींमध्ये समानता राखण्याचा आणि पत्नी, मुले आणि पालकांना संरक्षण देण्याचा कायदेशीर हेतू आहे. मात्र, आळशीपणाला प्रोत्साहन दिलेले नाही.

# राज्यात एक एप्रिलपासून जिवंत सातबारा मोहीम


## उताऱ्यावरील मृत व्यक्तींची नावे हटणार

**मुंबई :**

राज्यात जिवंत सातबारा मोहीम राबवण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी तहसीलदारांची समन्वय अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. १० मेपर्यंत राज्यातील सर्व सातबारे अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सध्या फक्त बुलढाण्यात सुरू असलेली जिवंत सातबारा मोहीम एप्रिलपासून राज्यभरात राबवली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत सातबारा उताऱ्यावर असणाऱ्या गावातील सर्व मृत खातेदारांची नावे कमी होणार असून, त्याऐवजी वारसांची नावे लागणार आहे. आवश्यक कागदपत्रांमध्ये वर्षांची नोंद नसल्यामुळे बऱ्याचदा जमीन व्यवहारांमध्ये अनेकांना अडचणी येतात. त्यामुळे राज्य सरकारने जिवंत सातबारा मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

स्थानिक चौकशी करून मंडळ अधिकारी हे वारस ठराव ई-फेरफार प्रणालीमध्ये मंजूर करतील. २१ एप्रिल ते १० मे या कालावधीत तलाठी यांनी ई-फेरफार प्रणालीमध्ये मृत खातेदारांऐवजी वारसाचे नाव नोंदवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. त्यानंतर मंडळ अधिकाऱ्यांनी वारस फेरफारवर निर्णय घेऊन सातबारा दुरुस्त करावे.



### प्रत्येक जिल्ह्यात चावडी वाचक

मोहिमेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात एक ते पाच एप्रिलदरम्यान तलाठी गावात चावडी वाचन करतील. यादरम्यान न्यायप्रविष्ट प्रकरणे सोडून गावनिहाय मृत खातेदारांची यादी तयार करण्यात येणार. ६ ते २० एप्रिलदरम्यान वारसा संबंधित कागदपत्रे तलाठ्यांकडे सादर करता येतील.

# सुनीता विल्यम्स पृथ्वीवर परतल्या

**नवी दिल्ली :** भारतीय वंशांच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे दोन अंतराळवीर तब्बल नऊ महिन्यांनी पृथ्वीवर परत आले आहेत.

५ जून २०२४ रोजी स्टारलायनरमधून आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशनकडे झेपावले होते. तिथे ८ दिवस घालवल्यानंतर ते परतणार होते. मात्र, त्यांच्या अंतराळयानामध्ये बिघाड झाला. त्यामुळे ते दोघेही तिथेच अडकून पडले होते. यानंतर नासाकडून सातत्याने त्यांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते. अखेर अनेक अडचणी पार केल्यानंतर दि.१९ रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे ३.३० वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्याजवळ नासाचे हे दोन्ही अंतराळवीर सुरक्षितपणे खाली उतरले. दरम्यान, नासाने अंतराळवीर जमिनीवर उतरले त्या क्षणाचा व्हिडिओ शेअर केला आहे.



## महत्त्वाचे

### शिव कर्मचारी सेनेच्या प्रदेश सरचिटणीसपदी नागरे



**नाशिक : वार्ताहर**
शिव कर्मचारी सेना संघटनेच्या प्रदेश सरचिटणीसपदी विक्रम नागरे यांची नियुक्ती करण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांनी विक्रम नागरे यांना नियुक्तीचे पत्र देत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेना उपनेते व नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख विजय करंजकर, सहसंपर्कप्रमुख राजू लवटे, महानगरप्रमुख प्रवीण (बंटी) तिदमे उपस्थित होते.

### बँक ऑफ महाराष्ट्रच्या कर्मचाऱ्यांचा संपात सहभाग



**नाशिक : प्रतिनिधी**
बँक ऑफ महाराष्ट्रच्या नाशिकमधील कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग घेतला. देशातील अग्रगण्य असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रमधील ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनच्या कर्मचारी संघटनेने एक दिवसीय संपाचे हत्यार उपसले होते. नाशिक, जळगाव, धुळे आणि मालेगाव येथील कर्मचारी या संपामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. लिपिक भरती, शिपाई भरती आणि तसेच सर्व स्तरावर पुरेशी नोकरभरती व्हावी. तसेच बँक प्रशासनाने बँकेशी असलेल्या करारांचे योग्य पालन करणे या मागण्यांसाठी संप पुकारण्यात आला. नाशिक शहर शाखेबाहेर बँक कर्मचाऱ्याकडून जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी संघटनेचे शेकडो सभासद उपस्थित होते.निदर्शनाचे नेतृत्व जनरल सेक्रेटरी मनोज जाधव,खजिनदार मंगेश रोकडे यांनी केले. अशोक डोकफोडे, दर्शन हिरे, स्वप्नील जानेराव, संतोष बागले, श्रीराम बोरसे यांनी परिश्रम घेतले.

### मधुमेह व उच्चरक्तदाबामुळे किडनीच्या समस्यांमध्ये वाढ : डॉ. केळकर




**नाशिक : प्रतिनिधी**
जीवनशैलीचा दैनंदिन जीवनमानावर होणारा बदल तसेच उच्च रक्तदाब आणि मधुमेहामुळे किडनीच्या समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे प्रतिपादन नारायणी हॉस्पिटलचे किडनीविकार तज्ज्ञ देवीकुमार केळकर यांनी केले. डॉ. देवीकुमार केळकर म्हणाले की, सकाळी उठल्यावर डोळ्याभोवती सूज येणे, चेहरा किंवा पायावर सूज येणे, लघवीमध्ये रक्त किंवा प्रोटीन जाणे, लघवी करताना त्रास होणे यांसारखे लक्षणे दिसल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. वेळीच निदान होऊन योग्य उपचार घेतल्यास पुढील आजार टाळता येणे शक्य असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. भारतनगर ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमात डॉ.केळकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष उत्तमराव कडलग, उपाध्यक्ष आप्पासाहेब जाधव, सुरेश गांगुर्डे, एकनाथ तपकीरे, विष्णू लोहकरे, रामनाथ मोरे उपस्थित होते. डॉ. केळकर म्हणाले की, मधुमेह होऊ नये असा विचार आपण करत असू तर सर्वांत आधी स्वतःचं निरीक्षण करावं लागेल. आपलं वजन, रक्तातील साखरेची पातळी, जीवनशैली यांचा विचार करणे महत्वाचे आहे. यामध्ये घरामध्ये डायबेटिसने मागच्या पिढ्यांमध्येच प्रवेश केला केला आहे अशा लोकांना डायबेटिसचा धोका जास्त असतो. त्यांनी अधिक काळजी घेणे गरजेचे असल्याचेही डॉ. केळकर यांनी सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने संचालक व सभासद उपस्थित होते.

### मानवी शरीर पुरवठा साखळीचे उत्तम उदाहरण : प्रा. प्रेम व्रत

**नाशिक : प्रतिनिधी**
मानवी शरीर हे पुरवठा साखळी व्यवस्थापन प्रणालीतील



कार्यक्षम व उत्तम उदाहरण होय. ऑक्सिजनशिवाय आपण जगू शकत नसलो तरी आपले शरीर ऑक्सिजन साठवत नाही. एका नासिकेतून श्वास घेता आला नाही तर दुसऱ्या नासिकेतून श्वास घेतो. दोन्ही नाकामी झाल्यास आपण तोंडाने श्वास घेतो. ही प्रक्रिया संपूर्ण पुरवठा साखळीतील पुनरावृत्ती व्यवस्थापनाचे उत्कृष्ट उदाहरण असल्याची माहिती आयआयटी रुरकीचे माजी संचालक व शिक्षणतज्ज्ञ प्रा. प्रेम व्रत यांनी दिली. के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन संस्था, नाशिक येथील तृतीय व अंतिम वर्षाच्या यांत्रिक अभियांत्रिकी, रोबोटिक्स आणि ऑटोमेशन अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी पुरवठा साखळी व्यवस्थापन या विषयावर एक विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ. पी. जे. पवार यांनी केला. त्यानंतर शैक्षणिक प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांचे हस्ते मान्यवरांना पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. पी. बी. कुशारे यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक म्हणून प्रा. समीर देशमुख यांनी कामकाज पाहिले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. ए. एस. पाटील यांनी केले.

# मुद्रांक शुल्कातून १३३२ कोटींचा मिळाला महसूल

## १ लाख ३७ हजार दस्तांची नोंदणी

**नाशिक : प्रतिनिधी**
**जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून जमीन, घर, प्लॉट विक्रीच्या व्यवहारात वाढ झाली आहे. यातून वर्षभरात जवळपास १ लाख ५० हजार दस्तनोंदणी होते. यातून दरवर्षी शासनाला जवळपास १५०० कोटी रुपयांचा महसूल मिळतो.**

**७७ टक्के दस्त नोंदणी**
नाशिक जिल्ह्यासाठी देण्यात आलेल्या इस्टांकापैकी ७७ टक्के नोंदणी पूर्ण झाली असून, अद्यापही २३ टक्के बाकी आहे. त्यामुळे एक महिन्यात मोठ्या प्रमाणात नोंदणी केली जाईल अशी शक्यता आहे. असे असले तरीही मागील वर्षीपेक्षा यंदा चार टक्के जास्त नोंदणी झाली आहे.

**दस्तांची दहा महिन्यांत नोंदणी...**
नाशिक जिल्ह्यात गेल्या दहा महिन्यांत तब्बल ५४ हजारहून अधिक मालमत्तांचे व्यवहार झाले असून, त्यापोटी वगळता इतर ठिकाणी फारशी उलाढाल नाही. त्यातच मागील दहा महिन्यांत जिल्ह्यात १ लाख ३७ हजार २४४ इतकी दस्तनोंदणी झाली आहे.

गेल्या दहा महिन्यांत मुद्रांक, दस्तनोंदणीतून नाशिक जिल्ह्याला १३३१ कोटी ६५ लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे. शेती, घर, प्लॉट, गहाणखत खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून शासनाच्या तिजोरीत चांगलीच भर पडत आहे.

**एक एप्रिलपासून रेडिरेकनर दर वाढणार...**
विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने विविध योजना आणल्या. त्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केल्याने सरकारच्या तिजोरीवर भार वाढला आहे. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात अनावश्यक खर्चाला कात्री लावण्याचे काम सुरू आहे. त्यातच मागील काही वर्षांपासून रेडिरेकनरचे दर वाढविले नसल्याने यावर्षी १० टक्के दरवाढीची शक्यता आहे.




❛ शासनाने दिलेल्या उद्दिष्टापैकी ७७ टक्के पूर्ण झाली असून, उर्वरित २३ टक्के मार्च महिन्यात पूर्ण होईल. या महिन्यात मार्च अखेरमुळे मोठ्या प्रमाणात दस्त नोंदणी होत असते. त्यामुळे उद्दिष्टापेक्षा जास्त महसूल गोळा होईल.
**- राजेंद्र गायकवाड, मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक**

**उद्दिष्ट कितीचे?**
नाशिक जिल्ह्यासाठी कोटी रुपयांचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत जवळपास १३३१.६५ कोटींचा महसूल मिळाला असून, त्याची वसुली सुमारे ७७ टक्के झाली आहे. मात्र, मागील पाच वर्षांपासून रेडिरेकनरचे दर जैसे थे असल्याने महसुलात अपेक्षित वाढ होत नसल्याचे चित्र आहे. अनेकदा प्रत्यक्षात असणाऱ्या दरात रेडिरेकनरमध्ये खूप मोठी तफावत दिसते. १७६१ कोटी ६८ लाख रुपयांचे इष्टांक जिल्ह्यासाठी देण्यात आले आहे.

**उच्चांकी महसूल**
घर, प्लॉट, जमिनीचे रेडिरेकनरचे दर आणि प्रत्यक्षात असलेले बाजारमूल्य यात तफावत आहे. शासनाने रेडिरेकनरचे दर पाच वर्षांपासून वाढविले नाही. सध्या चर्चा सुरू आहे. मात्र, प्रत्यक्षात काही आदेश आलेले नाहीत. जिल्ह्यात आतापर्यंत दस्तनोंदणीतून जवळपास १३३१.६५ कोटींचा महसूल मिळाला आहे.

## वज्रेश्वरीच्या आशीर्वादाने राष्ट्राचे संरक्षण होऊन विश्वशांती नांदेल

**नाशिक : प्रतिनिधी**
आई भगवती श्री वज्रेश्वरीच्या चरणी सव्वा लाख सेवेकऱ्यांनी रुजू केलेल्या वज्रचंडी यज्ञ, दुर्गा सप्तशती पठण आणि श्री चक्रराज श्रीयंत्र सेवेमुळे देशाच्या संरक्षणाबरोबरच विश्वशांती नांदेल आणि अखिल मानव समाज सुखी होईल, असा विश्वास अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्गाचे प्रमुख अण्णासाहेब मोरे यांनी व्यक्त केला.

भिवंडी तालुक्यातील श्री क्षेत्र वज्रेश्वरी येथे स्वामी सेवामार्गतर्फे विश्वशांती, जनहित आणि राष्ट्रकल्याणासाठी राष्ट्रीय महासत्संग सोहळा तथा वज्रचंडी यज्ञ, दुर्गा सप्तशती पठण आणि श्री चक्रराज श्रीयंत्र पूजन सेवा पार पडली.

**प्रदीर्घ कालखंडानंतर सर्वोच्च सेवा**
श्री वज्रेश्वरी शक्तिपीठावर रामायण काळात त्यानंतर नवनाथांच्या काळात मोठी सेवा झाली. त्यानंतर प्रदीर्घ काळानंतर परमपूज्य गुरुमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने गुरुपुत्र नितीनभाऊ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली १०८ कुंडात्मक वज्र चंडीयज्ञ, दुर्गा सप्तशती पठण, सवाष्ण कुमारिका पूजन चक्रराज श्री यंत्र पूजन अशी भव्य दिव्य आध्यात्मिक सेवा पार पडली.

**अण्णासाहेब मोरे : वज्रेश्वरी वज्रचंडी यज्ञ**



**गुरुमाऊलींची ग्रंथतुला**
अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त अण्णासाहेब मोरे यांची ग्रंथ, धान्य आणि मिष्टान्नाची तुला करण्यात आली. योगायोग म्हणजे मिष्टान्नाच्या तुलेमध्ये तिरुपतीच्या लाडवाचा प्रसाद होता आणि व्यासपीठावर साकारण्यात आलेली तिरुपती देवस्थानाची प्रतिकृती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. यावेळी गुरुमाता मंदाताई मोरे यांनी परमपूज्य गुरुमाऊलींचे औक्षण केले.



## शिवरायांचा एक तरी गुण आत्मसात करावा : शुक्ल

**नाशिक : प्रतिनिधी**
छत्रपती शिवरायांचा एक तरी गुण प्रत्येकाने आपल्या जीवनात आत्मसात करावा, असे आवाहन शुक्ल यजुर्वेदिय ब्राह्मण संस्थेचे अध्यक्ष सतीश शुक्ल यांनी केले.

शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन ब्राह्मण संस्थेच्या यजुर्वेद मंदिरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन महेश उपासनी व उमा उपासनी या उभयतांच्या हस्ते करण्यात आले. महेश उपासनी यांनी महाराजांबद्दल त्यांचे अनेक पराक्रम सांगत उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर पंडित रवींद्र देव यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे स्वागत ओमकार शौचे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी पं. रवींद्र देव व पं. उपेंद्र देव यांनी मंत्रघोष केला. भानुदास शौचे यांनी प्रास्ताविक केले.

महेश उपासनी यांनीही मनोगत व्यक्त केले. सतीश शुक्ल, राजश्री शौचे, रोहिणी कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सतीश जोशी यांनी आभार मानले.

यावेळी कार्याध्यक्ष तुषार जोशी, कार्यवाह ॲड. भानुदास शौचे, सतीश जोशी, महेंद्र गायधनी, प्रमोद मुळे, उदय जोशी, रामकृष्ण उपासनी, विश्वास पुराणिक, ओमकार शौचे, उपेंद्र देव, रवींद्र देव, सुहास भणगे अवधूत कुलकर्णी, हरीश चोबे, प्रकाश शुक्ल, दीपक गायधनी, दीपक कुलकर्णी, राजश्री शौचे, ऋत्विका शौचे, मंजुषा अगस्ते, रोहिणी जोशी, रोहिणी कुलकर्णी, ज्योती शुक्ल, स्नेहलता जोशी, अनिता कुलकर्णी, शांता जाधव आदी उपस्थित होते.

## एसएमबीटीत दोन क्लिष्ट तावी शस्त्रक्रिया यशस्वी

### कार्डिओलॉजिस्ट प्रा. यान कोवाच यांच्या टीमचे यश

**नाशिक : प्रतिनिधी**
हृदय आजारामुळे श्वसनाच्या त्रासाने अतिशय गंभीर अवस्थेत असलेल्या दोन रुग्णांवर एसएमबीटी हॉस्पिटलच्या हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये क्लिष्ट तावी शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. जगप्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट प्रा. यान कोवाच यांच्या उपस्थितीत या दोन्ही शस्त्रक्रिया झाल्या. एका तावी शस्त्रक्रियेसाठी किमान दीड तासाचा कालावधी लागतो, मात्र एसएमबीटीच्या अत्याधुनिक कॅथलॅबमध्ये अनुभवी आणि कुशल वैद्यकीय टीमच्या सहकार्याने दोन्ही शस्त्रक्रिया अवघ्या तासाभरात पार पडल्या. दोन्हीही रुग्ण सुखरूप असून लवकरच त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जाणार असल्याची माहिती हृदयविकारतज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांनी दिली.




कार्डिओलॉजिस्ट डॉ. यान हे एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये विशेष भेटीसाठी आले होते. त्यांच्या उपस्थितीत तावी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक व हृदयविकारतज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा, डॉ. विद्युतकुमार सिन्हा, सीओओ सचिन बोरसे उपस्थित होते.

तावी झालेल्या रुग्णांचा बरे होण्याचा दर सर्वाधिक असल्याची माहिती घेऊन आपण एसएमबीटीत आल्याचे प्रा. यान म्हणाले. प्रारंभी, एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने प्रा. यान कोवाच यांचे भारतीय परंपरेनुसार औक्षण करण्यात आले. त्यानंतर पुष्पमाला घालून त्यांचे हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी स्वागत केले. अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, सीओओ सचिन बोरसे, हृदयतज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा, हृदयविकार शस्त्रक्रिया विभागप्रमुख विद्युतकुमार सिन्हा, डॉ. लिंडा, डॉ. ऋषिकेश तामसेकर, डॉ. स्नेहल नील, डॉ. सलमान अहमद, डॉ. प्रशांत पवार यांच्यासह आणि कार्डियाक टीमसोबत संवाद साधला. प्रा. यान कोवाच यांच्या भेटीनंतर सायंकाळी नाशिक शहरातील हृदयविकारतज्ज्ञांसाठी विशेष सीएमईचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी हृदयविकारतज्ज्ञ व शस्त्रक्रिया तज्ज्ञ व फिजिशियन्स उपस्थित होते.

**तावी शस्त्रक्रिया म्हणजे काय?**
ओपन हार्ट सर्जरीला तावी शस्त्रक्रिया पर्याय आहे.
ही अत्याधुनिक व्हॉल्व्ह रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया आहे. रुग्णाच्या मांडीतून एक सुई टाकून कॅथेटरच्या सहाय्याने रक्तवाहिनीद्वारे खराब झडपेच्या जागेवर कृत्रिम झडप बसवली जाते.

❛ ग्रामीण भागात हॉस्पिटल असलेले एवढ्या चांगल्या प्रकारे असलेले कार्य खरंच प्रेरणादायी आणि प्रशंसात्मक आहे. पैशांच्या किंवा बिलाच्या अभावी रुग्ण रुग्णालयातून परत जाऊ नये हा हॉस्पिटलचा उद्देश अभिमानास्पद आहे.
**- प्रा. यान कोवाच, कार्डिओलॉजिस्ट**

## नाशिकमध्ये सांध्यसंगीताची अनोखी संगीत मैफल 'मृगतृष्णा'



**नाशिक : प्रतिनिधी**
बसंत पंचमी, होळी, रंगपंचमी, चैत्राची चाहूल आणि गुढीपाडवा अशा सणांचा सुवर्णमध्य साधत नाशिकमधील संगीतप्रेमींसाठी एक सुरेल आणि मनमोहक संगीतमय मैफल रसिकांसाठी आयोजित केली आहे.

नटखट कृष्णाच्या कृष्णलीला, मीरेची भक्ती, प्रेम हाच मुक्तीचा मार्ग असे तत्त्व गाण्यांच्या माध्यमातून व्यक्त करणारी संगीत मैफल म्हणजे 'मृगतृष्णा - प्रेम, भक्ती आणि मुक्तीचा संगम'. मुंबईसह विविध शहरांमध्ये यशस्वी प्रस्तुती केलेली ही संगीत मैफल शनिवार दि. २२ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता सृजन सभागृह, ग्लोबल व्हीजन स्कूल येथे होणार आहे. या कार्यक्रमात शास्त्रीय बंदिशीवर आधारित फिल्मी गीते ठुमरी, राजस्थानी व पंजाबी लोकगीतांवर आधारित बॉलीवूडमधील लोकप्रिय फिल्मी गीते सादर होणार आहेत. लोकसंगीताचा बाज व शास्त्रीय नृत्याचा आधार असलेला नृत्याविष्कारही रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. या मैफलीची संकल्पना गायिका विजयालक्ष्मी मणेरीकर अर्थात कवी 'लक्ष्मीमंगेश' यांची असून, अनिल धुमाळ (कीबोर्ड), हितेश्वर पाटील (तबला), रोहित जाधव (ऑक्टोपॅड), अनुप कुलथे (व्हायोलीन) यांची संगीत साथसंगत लाभणार आहे. तसेच नृत्य सादरीकरणासाठी काजल भरीत यांचा सहभाग असेल.

## आला उन्हाळा, तब्येत सांभाळा

### नैसर्गिक फळे, पेयांवर भर देण्याचा तज्ज्ञांचा सल्ला

**नाशिक : प्रतिनिधी**
**नाशिक पूर्वी थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जात असत. परंतु गेल्या काही वर्षांपासून नाशिकची हवा चांगलीच गरम झाली आहे. परिणामी उन्हाळा असह्य होत असून, प्रचंड उकाडा जाणवत आहे. त्यामुळे उन्हाळ्याचा अनेकांना त्रास होतो. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासू नय, शरीरात डिहायड्रेशन होऊ नये म्हणून पाणीदार पदार्थासह नैसर्गिक फळे आणि पेयांचा आस्वाद घेत उन्हाळ्याला सामोरे जावे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.**

गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा चांगलाच वाढत आहे. बऱ्याच जणांना वेगवेगळे त्रास होत आहेत. उन्हाळी लागणे, गरम होणे, घाम येणे, अस्वस्थ वाटणे, उन्हाळ्यामध्ये वाढत्या तापमानामुळे खूप तहान लागते. आयुर्वेदानुसार, उन्हाळा हा पित्ताचा ऋतू आहे.

या काळात पचनशक्ती मंदावते आणि भूक देखील कमी होते. त्यामुळेच या तीन दोषांचे योग्य संतुलन राखण्यासाठी योग्य आहार घेणे फार महत्त्वाचे ठरते. उन्हाळ्यात बहुतांश वेळेला आपण एरेटेड कोल्ड्रींक्स, आइस्ड टी आणि थंडगार पाणी यांसारख्या थंड ड्रिंक्सना प्राधान्य दिले जात असते. या काळात उसाचा रस, दही, ताक, नारळपाणी, काकडी, कलिंगड, कैरीचे पन्हे, सोलकढी, थंडाई, ताक, सरबते आदी पदार्थ डिहायड्रेशनपासून तर वाचवतीलच शिवाय हे पदार्थ अल्कलाइन गुणधर्माचे असल्यामुळे शरीरातील पीएच संतुलन राखण्यास त्याची प्रचंड मदत होते. त्यामुळे शरीराला उन्हाळ्याच्या दिवसांत हायड्रेट ठेवल्यास उकाड्याचा त्रास कमी होईल.

### या पेयांसोबत होईल उन्हाळा सुसह्य

**थंडाई**
पारंपरिक थंडाई दूध, बदाम, केशर, गुलाबजल आणि वेलची आणि एका जातीची बडीशेपसारख्या मसाल्यांनी बनलेली असते. यामुळे शरीराला बल मिळून उन्हाळा सुसह्य होतो.

**ताक**
दही आणि पाणी आणि चिमूटभर मीठ मिसळून ताक बनवले जाते. बहुतेकदा जिरे आणि धणे वापरून चवीनुसार बनवलेले, ते त्याच्या पाचन फायद्यांसाठी ओळखले जाते. ते शरीराला थंड करण्यास आणि निर्जलीकरण रोखण्यास मदत करते आणि विशेषतः गरम हवामानात शरीरासाठी चांगले ठरते.

**सरबत**
फळे किंवा फुलांपासून गोड चवीचे सरबत बनवले जाते. सरबत थंड पाण्यात मिसळले जाते. ते बहुतेकदा गुलाब, संत्रा किंवा लिंबाच्या चवीने बनवले जाते. हे थंड आणि हायड्रेटिंग पेय तुम्हाला दिवसभर ताजेतवाने ठेवू शकते.

**लिंबू पाणी**
लिंबू पाण्यात ताजे लिंबाचा रस आणि चिमूटभर मीठ असलेले पाणी असते. हे एक हायड्रेटिंग पेय आहे जे विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते आणि तुम्हाला ताजेतवाने वाटते.





❛ अत्यंत थंड ड्रिंक्सचे सेवन करू नये, कारण ते तुमच्या शरीरातील पाचक अग्नी विझवतात. तुम्ही तळलेले, जड किंवा अत्यंत मसालेदार किंवा खारट पदार्थदेखील टाळावे कारण ते पचायला जड असतात. त्याऐवजी पचायला सोपे असलेले पदार्थ खाण्याचा प्रयत्न करा. जेणेकरून या उन्हाळ्यात तुम्ही हलके आणि आनंदी राहू शकाल.
**- क्षितिजा गायकवाड**
आहारतज्ज्ञ

❛ उन्हाळ्यात हायड्रेट राहून ॲक्टिव्ह राहिल्यास शरीरासाठी योग्य राहील. पारंपरिक पदार्थांपासून तयार केलेले पेय दिवसभर ताजेतवाने ठेवू शकते.
**-डॉ. सुनाक्षी चौरसिया**

# सीआयआय यंग इंडियन्सची आजपासून तीनदिवसीय परिषद

**नाशिक : प्रतिनिधी**

**सीआयआय यंग इंडियन्स नाशिक चॅप्टरच्या वतीने दि. २१ ते २३ मार्चदरम्यान पश्चिम क्षेत्र परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेचे उद्घाटन दि. २२ रोजी होणार असून, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.**

या परिषदेला महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेश आणि गुजरातमधील २०० प्रतिनिधी एकत्र येऊन सहभाग घेणार आहेत. यंग इंडियन्स हा ग्रुप हा तरुण भारतीयांमध्ये नेतृत्व, उद्योजकता आणि राष्ट्र उभारणीला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या भारतीय उद्योग महासंघाचा अविभाज्य भाग आहे. देशाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी योगदान देताना, युवा नेत्यांना एकमेकांशी जोडले जाण्यासाठी, सामायिक करण्यासाठी आणि एकमेकांकडून शिकण्यासाठी यंग इंडियन्स हे एक व्यासपीठ उपलब्ध करून देते, अशी माहिती वायआयचे पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष कृणाल शाह यांनी दिली. यावेळी वायआयचे नाशिक अध्यक्ष हर्ष देवधर, सहअध्यक्ष पारुल धाडीच, जनक सारडा, वेदांत राठी, भाविक ठक्कर आदी उपस्थित होते.

गेल्या चार वर्षात, ३५० हून अधिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, ३ लाखांहून अधिक नाशिककरांना प्रभावित करणे आणि ४ राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त करणे यासह उल्लेखनीय टप्पे गाठले आहेत. डब्ल्यू. आर. सी. एम. हा एक महत्वाचा कार्यक्रम असून, पश्चिम भागातील सर्व सदस्यांना एकत्र येणार आहेत. यावर्षी भोपाळ, अहमदाबाद, मुंबई, पुणेसह इतर २० शहरांमधून २०० सदस्य नाशिकला येणार आहेत. हा कार्यक्रम २१ ते २३ मार्च रोजी नाशिकच्या द ट्रीट हॉटेलमध्ये होणार आहे. विशेष म्हणजे, उपस्थित सदस्यांपैकी अनेक प्रसिद्ध उद्योजक आहेत विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दि. २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. युवा नेतृत्व, मेक इन महाराष्ट्र, नाशिक कुंभ डिजिटल करणे याबद्दल यावेळी परिषदेत चर्चा होणार आहे. डब्ल्यूआरसीएम २०२५ ही केवळ एक परिषद नाही ती सर्जनशीलता, आवड आणि नेतृत्व यांचे मिश्रण आहे. नाशिकमध्ये प्रथमच होणारा हा कार्यक्रम आपल्या सर्वांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देईल, असेही कृणाल शाह यांनी सांगितले.

## बस प्रवासामध्ये ३४ लाखांच्या दागिन्यांची चोरी

**पुणे** : डोंबिवली येथील सराफ कारागिराकडील तब्बल ३४ लाख रुपयांचे दागिने खासगी ट्रॅव्हल्सच्या बसमधून प्रवास करताना दोन चोरट्यांनी चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विजापूर ते मुंबई प्रवास करताना ही घटना घडली असून, पाठीमागच्या आसनावर बसलेल्या दोघांनी ते चोरल्याचा संशय आहे. याप्रकरणी भेहराराम कुमावत (वय ४४, रा. डोंबिवली ईस्ट) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

**ग्रामपंचायत कोटमगाव खु ता.येवला जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र.०१/२०२४-२५(प्रथम प्रसारण)**

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

ग्रामपंचायत कोटमगाव खु ता. जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी प्रमाणपत्र, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा दिनांक २१/०३/२०२५ सकाळी १०.०० वा. पासून ते दिनांक २६/०३/२०२५ सायंकाळी ५.०० वा (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालय येथे जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक २७/०३/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालय येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदरच्या निविदा संबधी तक्रार करता येणार निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कोटमगाव खु ता. जि. नाशिक यांच्या कडे राखून ठेवण्यात आले आहे.

कामाचे नाव-1) Constructing Under Ground Drainage PVC Pipe Line At Kotamgaon Kh Tal Yeola Rs-280944/- 2) Constructing Toilet Urinal Child Friendly For Ladies At Kotamgaon Kh Tal Yeola Rs-40000/- 3) Constructing Toilet For Male And Female At Kotamgaon Kh Tal Yeola Rs-40000/- 4) Solid Waste Management Scheme 2024-25 At Kotamgaon Kh Tal Yeola Rs-76030/-

**सही ग्रामसेवक व सरपंच**
**ग्रामपंचायत कोटमगाव खु ता. जि. नाशिक**

---

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मौजे नाशिक शहर-२**, ता.जि.नाशिक यांसी **सर्व्हे नं.४८३/१** या मंजुर ले आउट मधील **प्लॉट नंबर १ व २** यांचे एकुण क्षेत्र ९८३-८१ चौ.मी. यांसी अंतिम **प्लॉट नंबर ०६ टीपी TT** या प्लॉट मिळकतीवर बांधकाम केलेल्या **सात्विक रेसिडन्सी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.नाशिक** या इमारतीतील तळ मजल्यावरील **फ्लॅट नंबर ०१** यांसी एकुण बांधीव (बिल्टअप) **क्षेत्र ६५-०५ चौ.मी.** म्हणजेच ७००-०० चौ.फुट, **गार्डनचे क्षेत्र २७-८८ चौ.मी.** म्हणजेच ३०० चौ.फुट यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

तसेच वर वर्णन केलेली फ्लॅट मिळकतचे मालक व कब्जेदार मी, **श्रीमती तैयबा मोईन फातिमा वाजिद अली खान** असुन सदरील मिळकत मी विक्री काढलेली असल्याने सदरील फ्लॅट मिळकतीचे पुर्वीचे मालकांचे **आर्टीकल ऑफ ॲग्रिमेंटचा मुळ दस्त क्र.०४२५७/२००५** व सदरील सदनिका मिळकतीचा **अंतिम हस्तांतरण पत्र** मुळ **दस्त क्र.३७८०/२०१२** मी **आंबेडकर मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक येथील योगेश जॉब या झेरॉक्स दुकानात दि.१७/०३/२०२५ रोजी रात्री ८ वाजेच्या दरम्यान** घेवुन जात असतांना सदरील रस्त्यात वर नमुद केलेल्या दस्तांची पिशवी हरवलेली आहे त्यानंतर सदरील मुळ दस्तांचा तिडके चौकात व माझ्या घरापासुन ते झेरॉक्स दुकानाच्या रस्त्यात पुन्हा शोध घेण्याचा भरपुर प्रयत्न केला तसेच रस्त्यावरील व तिडके चौकातील लोकांना देखील विचारपुस केली परंतु मला वर नमुद केलेल्या मिळकतीचे मुळ दस्त मिळुन आलेले नाही त्यामुळे माझी खात्री झालेली आहे कि, **वर नमुद आर्टीकल ऑफ ॲग्रीमेंटचा मुळ दस्त क्र.०४२५७/२००५ व अंतिम हस्तांतरण पत्र मुळ दस्त क्र.३७८०/२०१२ गहाळ झालेला/हरवलेला आहे.**

वर नमुद केलेला मुळ दस्त हा कोणत्याही व्यक्तीला मिळुन आल्यास त्यांनी सदरील खरेदीखताचा मुळ दस्त आमचे पक्षकार श्रीमती तैयबा मोईन फातिमा वाजिद अली खान, वय : ५६ वर्ष, धंदा : घरकाम, रा : इमराल्ड रेसिडन्सी, हाजी नगर, उंटवाडी, नाशिक, ता.जि. नाशिक-४२२००८ (मो.नं.९८६०६०२१२१) यांना देण्यात यावा. त्याकरीता सदरील जाहीर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यास कारण घडलेले आहे. नाशिक. दि.२०/०३/२०२५.

**विशाल किसन जाधव, ॲडव्होकेट**
३/४,पुर्नम सोसा.,कान्हेरेवाडी,नाशिक.मो.९६६५००५२३२/९२८४८७७३४४

---

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे गंगापूर** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सर्व्हे क्र.९३/२/अ** यापैकी मंजुर लेआऊट प्लॅन मधील **प्लॉट क्र.३४** यांसी एकुण क्षेत्र २६२-५० चौ.मी. या मिळकती पैकी नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील मंजुर **सबडिव्हीजन लेआऊट प्लॅन नुसार प्लॉट नं.३४/१** यांसी नविन प्लॅन नुसार क्षेत्र ९६-२५ चौ.मी. व यावरील मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे **कुबेर दर्शन रोहाऊस** या नावाने बांधलेल्या रोहाऊस संकुला मधील **रो-हाऊस नं.०१ (एक)** यांसी **एकुण प्लॉट क्षेत्र ९६.२५ चौ.मी.** व त्यावरील **बांधीव क्षेत्र ८२-०२ चौ.मी. + पोर्च क्षेत्र १०-१२ चौ.मी.** (म्हणजेच चटई क्षेत्र ६८-३५ चौ.मी.) यांसी चतु:सिमा मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे. ही मिळकत **नंदिनी सोमनाथ शिंदे व सोमनाथ महादेव शिंदे (मयत)** यांचे खरेदी मालकीची असून **श्रीमती नंदिनी सोमनाथ शिंदे** यांनी सदरहू मिळकत ही संपूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे असे खात्रीने व भरवशाने सांगुन आमचे पक्षकार यांचेकडून रक्कम स्विकारुन **विसार पावती** लिहून देवून मिळकत हस्तांतर करण्याचा व्यवहार निश्चित केलेला आहे.

सबब, उपरोक्त नमुद मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा जसे की, गहाण, दान, लिन, लिज, वारस हक्क, अन्नवस्त्र, खावटी, बक्षिस, खरेदी, साठेखत, तारण, गहाण, कोर्ट वाद, हद्दीचा वाद, जामिनकी अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्या संबंधीत इसमाने अगर संस्थेने आपली लेखी हरकत, कागदोपत्री पुराव्यानिशी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ (पंधरा) दिवसांचे आत** आमचे खालील पत्त्यावर नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पुर्ण करतील. तसेच मुदतीनंतर आलेली हरकत व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली हरकत आमचे पक्षकारांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि.२०/०३/२०२५.

**ॲड.साक्षी बजरंग शिंदे**
ऑफीस : १६/१, मारुती चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक.

---

# जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मी **शकील नवाब शेख** रा.फ्लॅट नं.५, अधव अपार्टमेंट, हॅपी होम कॉलनी, पखालरोड, नाशिक येथील कायमस्वरुपी राहत असुन माझे कुटूंबामध्ये माझी **पत्नी शपक शकील शेख, मुलगा साहील शकील शेख, अमन शकील शेख, मुलगी रोशनी शकील शेख** असे कुटूंबात राहत असुन आमचे पैकी माझा मोठा मुलगा **साहील शकील शेख** याला पुर्वीची पत्नी सोडुन गेलेली असुन तो आजमितीस दुसरी पत्नी करुन आमचे घरातुन निघुन गेलेला आहे. तरी साहील शकील यांनी यापुर्वी बरेच लोकांकडुन हातउसनवार पैसे घेतलेले आहे, असे आम्हांस समजले. सदर व्यवहाराशी आमचे कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीचा संबंध नाही. तरी यापुढे माझे फ्लॅट मिळकतीचा व इतर प्रॉपर्टीमध्ये साहील याचा काहीएक संबंध नाही. त्यांस आम्ही घरातुन बेदखल केलेले आहे. त्यामुळे यापुर्वी व यापुढे साहील याने कोणाशीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला असल्यास अथवा केल्यास तो आमचे वर व आमचे फ्लॅट अथवा इतर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही तसेच कोणीही व्यक्ती अगर इसम यांनी आमचेकडे साहील याने घेतलेल्या रक्कमेची मागणी करण्यास येवु नये, याची नोंद घ्यावी.

कळावे, ही जाहीर इशारा नोटीस. नाशिक. दि.२०/३/२०२५..

::-आमचे मार्फत प्रसिध्द -::

**ॲड.इमरान आर.इनामदार**
ऑ.चेंबर नं.११६, मारुती चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक मो.नं.९८२३०३३९३५

---

# जाहीर समन्स व नोटीस

**ॲड.जे.डी.जमदाडे**

**मा.न्या.मे.सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सो., ईगतपुरी, त्र्यंबकेश्वर, उपविभाग नाशिक**

**आर टी एस अपील नं.२१/२०२५**

**ईगतपुरी त्र्यंबक येथील मे.सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सो., ईगतपुरी, त्र्यंबकेश्वर, उपविभाग नाशिक** यांचे कोर्टात ...

**श्री.राजकुमार धोंडीराम भांगरे** ) अपेलंट
**विरूध्द**
**श्री.महेंद्र बद्रीनाथ सोनवणे व इतर** ) रिस्पॉंडेंट

ज्याअर्थी अपेलंट यांनी सामनेवाले

६) **श्रीमती भिमाबाई भावराव लामटे**
७) **श्री.नाना भावराव लामटे**
८) **श्री.विष्णु भावराव लामटे**
९) **श्रीमती पार्वताबाई पांडुरंग डहाळे**
१०) **श्रीमती भोराबाई पांडुरंग वारघडे**
११) **श्रीमती कवसा निवृत्ती हंबरे**
१२) **श्रीमती हौसा निवृत्ती हंबरे**
१३) **श्रीमती आशा निवृत्ती हंबरे**
१४) **श्रीमती अनुसया निवृत्ती हंबरे**
१५) **श्रीमती अश्विनी निवृत्ती हंबरे**
१६) **श्रीमती लक्ष्मी निवृत्ती हंबरे**,रा.देवगांव, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक.

यांचेविरुध्द अपेलंट यांनी **मौजे देवगांव** या गांवचे शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी **गट क्र.२४८** यांसी लागवडी योग्य क्षेत्र ०४ हे. ६७ आर + पो.ख. ०० हे. २२ आर असे **एकूण क्षेत्र ०४ हे. ८९ आर** यांसी आकार रुपये ०२=७५ पैसे, **पैकी प्रतिवादी नं.१ ते १३ यांचे मालकीचे क्षेत्र ०२ हे. ३३.५ आर + पो.ख. ०० हे. ११ आर** असे एकूण क्षेत्र ०२ हे. ४४.५० आर यांसी आकार रुपये १=३८ पैसे, या मिळकतीबाबत सदरचे अपील दाखल केलेले असून त्याअर्थी सदर अपीलामध्ये आपले काही लेखी अथवा तोंडी म्हणणे द्यावयाचे असल्यास स्वत: किंवा वकीलांमार्फत **दि.०१/०४/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता** समक्ष हजर राहून तुमचे लेखी म्हणणे सादर करावे. उपरोक्त नमुद दिवशी व वेळी सा.वाले करीता कुणीही हजर न राहिल्यास तुमचे काहीएक म्हणणे नाही, असे समजून सा.वाले विरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात येईल. सदरचे समन्स व नोटीस आज दि.१८/०३/२०२५ रोजी माझी सही शिक्यानिशी व कोर्टाच्या सही शिक्यानिशी जाहीर केले आहे. नाशिक. दि.१८/०३/२०२५.

(कोर्टाचा शिक्का)

सही/- **मे.सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सो., ईगतपुरी, त्र्यंबकेश्वर, उपविभाग नाशिक**

---

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जाहीर प्रकटन

नाशिक महानगरपालिका हददीतील सर्व नागरीकांना सदर प्रकटनाव्दारे कळविणेत येते की, नाशिक शहरातील जी घरे मोडकळीस आलेली आहेत अशी घरे / वाडे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४, २६५ व २६६ अन्वये खाली करुन देणे आवश्यक असतांनाही संबंधीत मालक / भोगवटादार खाली करुन देत नाही असे निदर्शनास आले आहे. अशा इमारतींना तातडीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६६ नुसार नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत. घरमालक अथवा भाडेकरुंनी अशा इमारतींचा धोकादायक भाग स्ट्रक्चरल कन्सल्टंटची मदत घेऊन उतरवून घेतांना कोणतीही जिवित अथवा वित्त हानी होणार नाही याची काळजी घ्यावी. धोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, सदर इमारती सत्वर मोकळया कराव्यात, जेणेकरुन जिवित हानी टाळता येईल. नागरीकांनी सदर इमारती मोकळया न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६८ नुसार पोलीसांमार्फत सदर इमारती मोकळया करुन घेण्यात येतील याची नोंद घ्यावी. अशा इमारतींचा भाग उतरवितांना काही दुर्घटना घडणार नाही याची काळजी घ्यावी. धोकादायक इमारती/घरे/वाडे त्वरीत खाली करुन नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

जा.क्र./ननिवि/भूसं/वशि/११०/२०२५, दि.१९/०३/२०२५

जनसंपर्क/जा.क्र./३९५/२०२५
दि. १९/०३/२०२५

पाणी शिळे होत नाही त्यामुळे उरलेले पाणी फेकून देऊ नये.

सही/-
मनिषा खत्री (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

---

# विकणे आहे

**अ) एकदंत नगर, बुरकुले हॉल मागे, अंबड (खुर्द) ता. जि. नाशिक येथील सर्व्हे नं. २७१/अ, प्लॉट नं. १० ते २४, योगेश्वर अपार्टमेन्ट मधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं.४३ क्षे.७६० चौ.फु. व फ्लॅट नं.४५ क्षे.६८५ चौ.फु. एकत्रीत अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षीत किंमत एकुण रु.४०,००,०००/-** (अक्षरी रूपये चाळीस लाख फक्त)

**ब) धनश्री अपार्टमेन्ट, कालिका मंदिर, कुटे मार्ग, नाशिक येथील सर्व्हे नं.६११/४/२, प्लॉट नं. ३+१/ब वरील गोडाऊन क्र. १ क्षे. ९५५ चौ.फु. विकणे आहे. अपेक्षीत किंमत रु.९०,००,०००/-** (अक्षरी रूपये नव्वद लाख फक्त) (अपेक्षीत किंमतीपेक्षा कमी किंमतीचा विचार होणार नाही.)

### निवीदा / बिडर बाबत

१) निवीदा मिळण्याचे, स्विकारण्याचे व उघडण्याचे ठिकाण : मुख्य कार्यकारी अधिकारी, **दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप. बँक लि., परळी-वै. शाखा : नाशिक**
२) निवीदा अंतीम तारीख ०५/०४/२०२५ दुपारी ५.०० वाजे पर्यंत.
३) निवीदा मिळवणेकरीता फीस रु. १,०००/- राहील.
४) निवीदा धारकांनी निवीदेसोबत के.वाय.सी.ची कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.
५) निवीदे सोबत किमान **रु.२५.०० लक्ष** रुपयांचा डी.डी.जोडणे किंवा वर नमुद बँक खात्यावर NEFT व्दारे पाठवणे आवश्यक आहे.
६) निविदा बोलीदार/बिडरच्या उपस्थितीत **दि.०७/०४/२०२५** रोजी दुपारी **१.०० ते २.००** वेळे दरम्यान उघडण्यात येतील आणि बोलीदारांना बोली बोलण्यास संधी दिली जाईल. बोलीधारकांनी बोली **रु.२५.०० लाखाचे** पटीत बोलावी.
७) निविदा ही बयाणा रक्कमेसह **दि.०५/०४/२०२५** रोजी सांय. ५.०० वाजेपर्यंत उपरोक्त नमुद ठिकाणी पोहचली पाहिजे.
८) प्राधिकृत अधिकारी यांना कुठलेही कारण न देता कोणतीही बोली नाकारण्याचा/स्थगीत करण्याचा/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा संपुर्ण अधिकार आहे.
९) स्थावर मालमत्ता विक्री करण्यास बँकेची कुठलीही बांधीलकी/प्रतिनिधीत्व या सुचनेत असणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**संपर्क : श्री. व्ही. एम. खर्चे, मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,परळी-वै. मो.क्र. 9422931261**

**NEFT DETAILS : A/c No. 01000680000009**
**IFSC CODE : HDFC0CVUCBL (5th Letter is Zero)**
**A/c Name : Tender Fees Account**
**Bank Name : The Vaidyanath Urban Co-Op. Bank Ltd.,**

---

## MAHESH SAHAKARI BANK LTD., PUNE

**Head Office : 372/73/74 Market Yard Gultekadi, Pune: 411037**
www.maheshbankpune.in

A 52 year old renowned Co-Op. Bank in Maharashtra having turnover of Rs. 1400 Crores plus, functioning on Core Banking Solutions, operating over at Pune, Mumbai, Ichalkaranji, Latur, Bhiwandi & Nashik invites applications for the following post :--

**• ASST. GENERAL MANAGER •**

***Qualification :*** *Minimum Post Graduate. CAIIB/MBA/ICWA/CA will be preferred.*
***Experience :*** *15 years of Banking experience of which 5 Years in Higher Management level. Experience of work in Audit Dept. is must.*
***Age :*** *Not more than 55 Years. Age limit can be relaxed for Experience Candidates.*

**• BRANCH MANAGER : (for Branches at Pune & Outstation) •**

***Qualification :*** *Graduate in any faculty. CAIIB/MBA/ICWA/CA will be preferred.*
***Experience :*** *5 years as Branch Manager* ***OR*** *8 years Officer in a reputed Bank.*
***Age :*** *Not more than 50 Years.*

**• OFFICER : (for Nashik, Mumbai, Bhiwandi, Ichalkaranji) •**

***Qualification :*** *Graduate with any faculty, Graduate in commerce preferred / JAIIB or equivalent*
***Experience :*** *3 years as officer or 7 years as clerk in a reputed Bank with good computer knowledge.*
***Age :*** *Not more than 35 years.*

**• CLERK : (Apprentice for Nashik Branch) •**

***Qualification :*** *Graduate with any faculty, Graduate in commerce preferred.*
***Age :*** *Not more than 30 years. Having full Computer Knowledge.*

- Good Computer knowledge is must
- Reservation category candidates will be preferred
- Salary shall be commensurate with experience

Apply within 15 days in the name of Mahesh Sahakari Bank Ltd., Pune at our Head Office address, superscribing on the envelope – Application for the post of "____________" or mail us your resume, mentioning the post for application, on **msbhrd@maheshbankpune.in**

---

**इगतपुरी नगर परिषद जि. नाशिक**

## जाहीर निविदा सूचना

तमाम इच्छुक नोंदणीकृत मक्तेदार/पुरवठादार/कंत्राटदार/दुकानदार यांना कळविण्यात येते कि, इगतपुरी नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकरिता पाईपलाईन दुरुस्तीकरिता नविन फ्युजिंग मशिन पुरवठा करणे या कामांकरिता जाहीर ऑफलाईन निविदा **दि. २०/०३/२०२५ ते दि. २७/०३/२०२५** या कालावधीत मागविण्यात येत आहेत. तरी आपण सदर कालावधीत विहित मुदतीत ऑफलाईन पद्धतीने निविदा सादर करावेत. यासाठी आवश्यक सविस्तर माहीती, अटी-शर्ती व कोरे निविदा फॉर्म नगरपरिषद कार्यालय पाणीपुरवठा विभाग या ठिकाणी पाहण्यासाठी उपलब्ध आहे. ठेवला आहे. कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

**-स्वा-**
**मुख्याधिकारी (गट-अ)**
**नगर परिषद इगतपुरी**

---

**इगतपुरी नगरपरिषद, ता. इगतपुरी जि.नाशिक**
**जा.क्र. इगतपुरी नगरपरिषद/११/२०२५** **दि. २१/०३/२०२५**

## जाहीर निविदा

इगतपुरी नगरपरिषदेच्या आण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालयास **सन २०२५-२६** या वर्षाकरिता ग्रंथपुरवठा खालील साहित्य तपशिलाप्रमाणे जाहीर दरपत्रक मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | साहित्य तपशिल | दर प्रती नग |
|---|---|---|
| १ | कांदबरी, कथा, नाटक, बाल वाङ्मय | |
| २ | चरित्र, धार्मिक, संदर्भ ग्रंथ, जनरल व ऐतिहासिक | |
| ३ | स्पर्धा परीक्षा | |
| ४ | इतर | |

**नियम व अटी :-**१) कोरे निविदा विक्री फॉर्म रु.१००/- रोख जमा करून **दि. २१/०३/२०२५ ते दि. २८/०३/२०२५** या कालावधीत कायालयीन वेळेत मिळतील. २) मोहरबंद निविदा अनामत **रुपये १०००/-** सह **दि.२८/०३/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यंत** स्विकारले जातील. ३) या पूर्वी वरील प्रमाणे केलेले कामांचा अनुभव असल्यास अशा दरपत्रक धारकांना प्राधान्य देण्यात येईल. ४) इतर नियम व अटी निविदा फॉर्म नमुन्यांत पहावयास मिळतील. ५) निविदा मंजूर वा नामंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

**(सोमनाथ आढाव)**
**मुख्याधिकारी गट अ,**
**इगतपुरी नगरपरिषद**

---

**इगतपुरी नगरपरिषद, ता. इगतपुरी जि.नाशिक**
**जा.क्र. इगतपुरी नगरपरिषद/११/२०२५** **दि. २१/०३/२०२५**

## जाहीर निविदा

इगतपुरी नगरपरिषदेच्या आण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालयास **सन २०२५-२६** या वर्षाकरिता वर्तमानपत्रे, साप्ताहिक, पाक्षिक, मासिके इ. व दिवाळी अंक पुरवठा करणेबाबत खालील साहित्य तपशिलाप्रमाणे जाहीर दरपत्रक मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | साहित्य तपशिल | दर प्रती नग |
|---|---|---|
| १ | वर्तमानपत्रे, साप्ताहिक, पाक्षिक, मासिके इ. आणि दिवाळी अंक | |

**नियम व अटी :-**२) कोरे निविदा विक्री फॉर्म रु.१००/- रोख जमा करून **दि. २१/०३/२०२५ ते दि. २८/०३/२०२५** या कालावधीत कायालयीन वेळेत मिळतील. २) मोहरबंद निविदा अनामत **रुपये ५००/-** सह **दि.२८/०३/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यंत** स्विकारले जातील. ३) या पूर्वी वरील प्रमाणे केलेले कामांचा अनुभव असल्यास अशा दरपत्रक धारकांना प्राधान्य देण्यात येईल. ४) इतर नियम व अटी निविदा फॉर्म नमुन्यांत पहावयास मिळतील. ५) निविदा मंजूर वा नामंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

**(सोमनाथ आढाव)**
**मुख्याधिकारी गट अ,**
**इगतपुरी नगरपरिषद**

---

ADITYA BIRLA CAPITAL — PROTECTING INVESTING FINANCING ADVISING

# आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय-** इंडियन रेयॉन कंपाऊंड, वेरावल, गुजरात-३६२२६६.
**कॉर्पोरेट ऑफिस:** १२ वा मजला, आर टेक पार्क, निरलॉन कॉम्प्लेक्स, हब मॉलजवळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३. महा.

## ई लिलाव नोटीस

**SARFAESI ACT 2002** (कायदा) व सुरक्षित व्याज (सक्त वसुली) नियम २००२ च्या नियम ८ (६) अन्वये स्थावर मालमत्ता लिलावाव्दारे विक्री करण्यासाठी ३० दिवसाच्या मुदतीची ही लिलाव सूचना (नोटीस) ज्या अर्थी आदित्य बिर्ला फायनान्स लि./सुरक्षित धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील सुरक्षित मालमत्तांच्या कायद्यांच्या कलम १३/२ प्रमाणे त्यावरील कर्जदारांच्या येणे बाकी वसुलीसाठी ताबा घेतलेला आहे. पुढील तक्त्याप्रमाणे असलेली येणेरक्कम व पुढील खर्च/चार्जेस सह वसुलीसाठी सर्वसामान्य जनतेस व विशेषत: कर्जदार/सहकर्जदार यांना या सूचनेव्दारे (नोटीस) कळविण्यात येते की, वसुलीसाठी त्यामध्ये दर्शविलेल्या तारीख व वेळेस ई लिलावाव्दारे तिची ''जशी आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'', व ''जे काही आहे'' या तत्वावर विक्री करण्यात येणार आहे.

**ई लिलावाची तारीख व वेळ : २९/०४/२०२५ स. ११ ते दु. १ वाजेपर्यंत**
**केवायसी व बयाणा रक्कम मिळवायची शेवटची तारीख : २८/०४/२०२५**

| अ.क्र. | कर्जदार व सहकर्जदारांचे नाव | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | बयाणा रक्कम व बोलीवाढ | मागणी सूचना तारीख व एकूण येणे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १. मे. आर.के. ट्रेडर्स ॲण्ड व्हेजीटेबल होलसेलर प्रोपायटर राजेश हरिशचंद्र कांबळे यांचे व्दारे २. श्री.राजेश हरिचंद्र कांबळे, श्री.हरिश्चंद्र कांबळे यांचे पुत्र ३. सौ. अश्विनी राजेश कांबळे श्री.राजेश कांबळे यांच्या पत्नी कर्जदार खाते क्र. ABMUMSTS 000000658747 व ABMUMSTU 000000659301 | लोखंडे मळा नाशिक रोड गांव : दसक, जि. नाशिक येथील स.नं. ३७/१ए/२ए+३७/बी/२, गोसावी नगर, प्लॉट क्र. १२ वर बांधलेल्या श्री स्वामी कुंज अपार्टमेंट या इमारतीतील फ्लॅट क्र.१ स्टील्ट पहिला मजला यांचे क्षेत्र ६५.५० चौ.मी. यांसी चतु:सीमा उत्तरेस : ६ मी. कॉलनी रस्ता, दक्षिणेस : फ्लॅट क्र.२ व जिना पूर्वेस : प्लॉट क्र. ११, पश्चिमेस : श्री.जाधव यांच्या घरालगत | २१,००,०००/- (रुपये एकवीस लाख) | २,१०,०००/- (दोन लाख दहा हजार रुपये) २५,०००/- (पंचवीस हजार रुपये मात्र) | ०८.०७.२०२४ रु. ८४,३२,९७३/- (चौऱ्यांशी लाख बत्तीस हजार नऊश त्र्याहत्तर मात्र) ०४.०७.२०२४ ०५.०७.२०२४ पर्यंत |

विक्रीच्या तपशिलवार अटी व शर्तीसाठी आदित्य बिर्ला फायनान्स लि. च्या वेबसाईटवरील सुरक्षित धनको येथील लिंक वरून संपर्क करावा. : www.adityabirlafinance.com व https://BidDeal.in

संपर्क क्र. : प्राधिकृत अधिकारी, आदित्य बिर्ला फायनान्स लि. १. अपूर्व थॉमस दांथी - **apoorva.danthi@adityabirlacapital.com** मो.नं. ९९३०९०९७२५. आपण नजीकच्या शाखेशी संपर्क करू शकता.
२. मोहीत शर्मा : **mohit.sharma@adityabirlacapital.com** मो.नं. ९८७३९१३९५५.
३. जहीरउल लस्कर, मो. ९७०६००३०७५ ४. परणीत सिंघ, मो. ९७२००२९३३७ ५. श्री.राजेश विरकर, मो. ७३९७९३०२०२

**स्थळ: नाशिक, महाराष्ट्र**
**तारीख: २०/०३/२०२५**

सही/-
**अधिकृत अधिकारी**
**आदित्य बिर्ला फायनान्स लि.**

---

**Chola** *Enter a better life*

# चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड

**कॉर्पोरेट ऑफिस:** चोला क्रेस्ट, सुपर बी, **C54 & C55,** थिरू वि.का. इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई ६०००३२ **T.N.**

## मागणी सूचना (Demand Notice)

**SARFAESI ACT 2002** (कायदा) व सुरक्षित व्याज (सक्त वसुली) नियम २००२ (नियमा) अंतर्गत

खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी **चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेडच्या (सुरक्षित धनको)** यांच्या वतीने त्यांनी कायद्याच्या कलम १३ (१२) व नियम ३ मधील प्राप्त अधिकाराने खालील कर्जदारांना कलम १३ (२) अन्वये मागणी सूचना नोटीस दिली आहे. की त्यांच्या नावासमोर दर्शविलेली रक्कम त्यांनी सूचना मिळालेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करून द्यावी. खालील सही करणार यांना असे लक्षात आले की, ही सूचना स्वीकारण्यास कर्जदार टाळत आहेत म्हणून नियमानुसार ती जाहीर स्वरूपात व चिकटवून दिली जात आहे. सूचनेचा गोषवारा खालील तक्त्याप्रमाणे.

| कर्जदार/सह कर्जदारांचे नाव व पत्ता | कर्ज रक्कम | मागणी सूचना दिनांक व रक्कम | मालमत्ता/सुरक्षित स्थावर वर्णन |
|---|---|---|---|
| कर्ज खाते क्र. HL03SNN000005064 1) **श्री.महेंद्र सुधाकर दिवे** २) **सौ. पल्लवी महेंद्र दिवे** सर्व राहणार- फ्लॅट नं.०९, वैष्णवलक्ष्मी अपार्टमेंट, जयभवानी रोड, नाशिकरोड, कदम लॉन्सजवळ, नाशिक-४२२१०१, महा. व सर्व्हे क्र.८५ (३अे)/३+४+५,प्लॉट नं.१९, जयभवानी रोड, देवळाली शिवार जवळ, लोणकर मळ्याजवळ, नाशिक-४२२१०१. महाराष्ट्र | रु.१२,८२,५४३/- | दि.१७-०३-२०२५ रु.२०,४५,३६३/- (रुपये वीस लाख पंचेचाळीस हजार तीनशे त्रैसष्ठ मात्र) दि.११-०३-२०२५ रोजी. | देवळाली, ता.जि. नाशिक येथील नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे क्र.८५/३/४/५/४ पैकी प्लॉट क्र.१९, त्याचे क्षेत्र १९८ चौ.मी. चतु:सीमा पूर्वेस- ९ मीटर रस्ता, दक्षिणेस- प्लॉट क्र.२०, पश्चिमेस- प्लॉट क्र.१८, उत्तरेस-प्लॉट क्र.८५/३ मंजूर लेआऊटप्रमाणे. परिशिष्ट व प्रमाणे प्लॉट क्षेत्र. श्री, धनपूजा संकुल, नाशिक येथील फ्लॅट क्र.६, तिसरा मजला त्याचे क्षेत्र ५५० चौ.फूट (५१.११ चौ.मी.) मनपा घर ६०६/०१३३/०२/०२/०६ व इंडेक्स क्र.६०६०६३७५ त्यांसी चतु:सीमा-पूर्वेस-खुली जागा व रस्ता, दक्षिणेस- खुली जागा, पश्चिमेस- लॉबी, जिना व फ्लॅट क्र.५, उत्तरेस- खुली जागा. |

कर्जदारांस याद्वारे कळविण्यात येते की, मागणी सूचना व वर नमूद केलेल्या रक्कमा या तारखेपासून ६० दिवसांचे मुदतीत त्यावरील देय व्याज, अधिकचे व्याज, बाऊन्स चार्जेस, इतर खर्च रक्कम भरण्याच्या तारखेपर्यंतचे असा सर्व भरणा करावा. जदारांनी याची नोंद घ्यावी की, चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लि., हे एक सुरक्षित धनको **(Secured Creditor)** असून त्यांनी घेतलेल्या कर्जासाठी या मालमत्ता गहाण ठेवून कंपनीस तारण दिल्या आहेत. कर्जदारांनी दिलेल्या मुदतीत संपूर्ण रक्कम फेडून न दिल्यास सुरक्षित धनको हे कायद्याचया कलम १३ (४) प्रमाणे त्यांना प्राप्त सर्व अधिकारांचा वापर करून या मालमत्ता ताब्यात घेऊन विक्री करणे सह (पण त्यापेक्षाही वेगळे) उपाय करून वसुली करू शकतात. विक्री करण्यापूर्वी सुरक्षित धनको ही मालमत्ता ताब्यात घेऊन तिला सील लावू शकतात. सुरक्षित मालमत्तेची विक्री करून मिळालेली रक्कम घेणे रक्कमेपेक्षा कमी असल्यास उर्वरित रक्कमेसाठी पुढे कायदेशीर कारवाई करू शकतात. हे उपाय इतर कायदेशीर उपायाप्रमाणे केले जाऊ शकतात. कर्जदारांचे लक्ष कायद्याच्या कलम १३ (८). पैसे भरण्याच्या मुदतीसंबंधी व कलम १३ (१३) या मालमत्तेचा व्यवहार सुरक्षित धनकोच्या परवानगीशिवाय कोणाशीही न करणे बंधनकारक आहे. तसे व्यवहार करण्यास मज्जाव आहे. अशा कलमांकडे वेधण्यात येत आहे. असे कोणतेही कृत्य कलम २९ प्रमाणे दंडनीय आहे. या मागणी सूचनांची **(Demand Notice)** प्रत खाली सही करणार यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी व वेळामध्ये उपलब्ध आहेत. कर्जदार त्या घेऊन जाऊ शकतात.

**सही/-**

**स्थळ: नाशिक, महाराष्ट्र**
**तारीख: १७/०३/२०२५**

**चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड** करिता
**प्राधिकृत अधिकारी**

---

## आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण सोहळा उद्या

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागातर्फे 'आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार वितरण सोहळा' उद्या दि. २२ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा गुरुदक्षिणा हॉल, बीवायके कॉलेज कॅम्पस, कॉलेज रोड, नाशिक येथे दुपारी ३ वाजता होणार आहे. या सोहळ्यात जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना गौरविण्यात येणार आहे.ग्रामविकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या कार्याची प्रेरणा इतरांना मिळावी, यासाठी या शासनाच्या वतीने आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार देण्यात येतो नाशिक जिल्हा परिषदेतंर्गत सन २०२२-२३ व सन २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांचा गौरव करण्यासाठी पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

---

**महानिर्मिती** — महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## सुचना-एसआरएम-८४

खालील निविदा **https://eprocurement.mahagenco.in** वर प्रकाशित केल्या आहेत.

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २१०मेगावॅट/डब्ल्यूटीपी/टी-७२५/आरएफएक्स-३०००५५८३९ | कोराडी टीपीएस (२१० मेगावॅट) मध्ये व त्याच्या आसपास विविध हवा व पाण्याच्या नमुन्यांचे सॅम्पलिंग व विश्लेषणाकरिता एक वर्षाचे कार्य कंत्राट. | रु. ६७,७५२.०० / रु. ६,४२५,२४०.६४ |
| २ | ६६०मेगावॅट/सीॲन्डआय/टी-७२६/आरएफएक्स-३०००५५३८७ | ३ × ६६० मेगावॅट, कोराडी टीपीएस येथील गव्हर्निंग सीस्टीमकरिता सर्व्हो व्हॉल्व्हज्चा पुरवठा. | रु. ४१,७२५.०० / रु. ३,८२२,५००.०० |
| ३ | ६६०मेगावॅट/डब्ल्यूटीपी/टी-७२७/आरएफएक्स-३०००५५८९९ | ३ × ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथील वॉटर ट्रीटमेंट प्लान्टमध्ये ॲन्टी कोरोजिव्ह एफआरपी लॅडर्स, वॉकवे रेलिंग सपोर्ट ची रचना, आरेखन व प्रतिष्ठापन तसेच बल्क स्टोअरेज ॲसिड व अल्कली टॅंक्सवर ग्रेटिंग करिता कार्य कंत्राट. | रु. १९,३३७.०० / रु. १,५८३,७००.०० |
| ४ | ६६०मेगावॅट/ईएमटी/टी-७२८/आरएफएक्स-३०००५५९१० | ३ × ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे जशी व जेव्हा आवश्यकता असेल त्यानुसार सबमर्सिबल पंप मोटर्सची दुरुस्ती व रिवाइंडिंगकरिता कार्य कंत्राट. | रु. १२,४२१.०० / रु. ८९२,१५८.०० |
| ५ | ६६०मेगावॅट/सीॲन्डआय/टी-७२९/आरएफएक्स-३०००५५९४६ | ३ × ६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे ओ२ ॲनलायझर कम्प्लीट असेम्ब्लीचे प्रापण. | रु. ४७,९६१.०० / रु. ४,४४६,१००.०० |
| ६ | २१०मेगावॅट/सीएचपी/टी-७३०/आरएफएक्स-३०००५५९९० | सीएचपी २१० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथील महत्त्वाच्या कन्व्हेयर ड्राइव्ह सीस्टीमकरिता आवश्यक महत्त्वाच्या फ्लुईड कपलिंग एफसी - २० चे प्रापण. | रु. ६,३४५.०० / रु. २८४,५००.०० |

ई-निविदेसाठी विक्रेत्यांना त्यांच्या संस्थेची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशिलासाठी संकेतस्थळावर लॉग ऑन करा.
कोणत्याही प्रश्नांकरीता संपर्क साधावा: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१-८४११९५८६२२, ई-मेल आयडी: **eepurchasekoradi@mahagenco.in**

हस्ता/-
मुख्य अभियंता (ओ ॲन्ड एम)
महानिर्मिती,केटीपीएस,कोराडी

# डिलाइट फॉर द डेफ संस्थेचा १३ एप्रिल रोजी वर्धापन दिन

**नाशिक : प्रतिनिधी**

**येथील डिलाइट फॉर द डेफ या संस्थेचा १३ एप्रिल रोजी दहावा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त मूकबधिरांसाठी आनंदाचा क्षण यानिमित्ताने संस्था घेऊन येणार असून, कॉलेज रोड येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या प्रांगणात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

डिलाईट फॉर द डेफही संस्था आहे महाराष्ट्रातील नाशिक आणि नाशिक जिल्ह्यांतील सर्व मूकबधिर आणि अंधमूकबधिर श्रवणक्षम व्यक्तींचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याचे कार्य करते. मूक-कर्णबधिर लोकांना कायदे आणि अधिकार समजण्यास आणि जाणून घेण्यासाठीही संस्था त्यांना मदत करते. मूकबधिर मुलांसाठी चित्रकला, प्रश्नमंजुषा आणि नाटक स्पर्धांचे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार सून, मूक- कर्णबधिर मुलांचे पालक, कायदेशीर कक्ष, कर्णबधिर युवक चर्चासत्र, नेतृत्व प्रशिक्षण कार्यशाळा, इत्यादी आणि महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यांमध्ये नवीन मूक- कर्णबधिर संघटना स्थापन करणार आहे.या उत्सवाला मान्यवर, भागीदार, मूकबधिर संस्था आणि समुदाय उपस्थित राहतील. देशभरातील कर्णबधिर नेत्यांनी जारी केलेल्या मूक- कर्णबधिर जागरुकता कार्यक्रम (वैयक्तिक विकास, नेतृत्व कौशल्य, मूक-कर्णबधिर कार्यक्रम, मूक-कर्णबधिर नेतृत्व सशक्तीकरण) यावर यावेळी चर्चा होणार आहे. मूक- कर्णबधिरांच्या संघटनेला त्यांच्या प्रयत्नांमध्ये समन्वय साधण्यास आणि मूक-कर्णबधिरांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर उपाय शोधण्यात मदत करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती संस्थेचे सोमनाथ तिडके (अध्यक्ष), उपाध्यक्ष शोएब सिध्दीकी, सचिव- जनेट शाह, खजिनदार जालिंदर रणमाळे, सहसचिव विश्वास आवारे, सदस्य दर्शन ढिकले, पंकज यादव यांनी दिली.

पान १ वरून...

## दोघा सख्ख्या भावांची वर्चस्ववादातून हत्या

वातावरण होते. जाधव बंधूंचे निधन झाल्याचे समजताच जिल्हा रुग्णालयात शोकाकूल नातेवाईक तसेच मित्र परिवाराची गर्दी उसळली होती. याप्रकरणी मृतांचे मामा विनोद पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश व प्रशांत रात्री नऊ वाजता आंबेडकरवाडी परिसरात बनकर चौक पिठाच्या गिरणीजवळ दोघे व नितीन हटकर, मयूर भोये, आदित्य, विनोद पवार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्यासाठी चर्चा करत होते. या दरम्यान रात्री ९.३० वाजता उमेशला आईचा फोन आला. घरी जेवणासाठी बोलावल्याने उमेश घरी जाऊ लागला. सार्वजनिक शौचालयाजवळच त्यास काही संशयित मारहाण करत असल्याने दिसून अले. हे पाहून प्रशांत हा भावास वाचवण्यासाठी पळाला. तेव्हा शस्त्रधारी मारेकऱ्यांनी उमेशसह प्रशांतवर धारधार हत्यारांनी हल्ला चढवला.तसेच मध्ये कोणी आले तर संपवून टाकू, अशी धमकी मारेकऱ्यांनी दिली. त्यामुळे जाधव यांच्यासोबतचे सहकारी भेतीने बाजूला झाले. उमेश व प्रशांत यांच्यावर धारदार शस्त्राने वार केल्याने ते गंभीर जखमी झाल्यानंतर मारेकरी दुचाकीने पळून गेले. दोघांना खासगी व नंतर जिल्हा रुग्णालयात नेले असता उपचारापूर्वी त्यांची प्राणज्योत मालवली.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीसांनी तातडीने तपासाची सूत्रे हलवली.

## बस्तरमध्ये चकमकीत २४ नक्षलींचा खात्मा

चकमक सुरू झाली. विजापूरचे एसपी जितेंद्र यादव म्हणाले की, चकमक सुरू आहे. ती संपल्यानंतरच संपूर्ण परिस्थिती स्पष्ट होईल. येथे दंतेवाडा एसपी गौरव राय यांनी सांगितले की, हिरोली येथून सैनिक बाहेर पडले आहेत. चकमक सुरू आहे.

### छत्तीसगडमध्ये ३१ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले

दरम्यान, छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवर एक महिन्यांपूर्वी झालेल्या चकमकीत १००० हून अधिक जवानांनी ३१ नक्षलवाद्यांना ठार केले होते. विजापूरच्या इंद्रावती नॅशनल पार्क परिसरात ही चकमक झाली होती. या चकमकीत डीआरजी आणि एसटीएफचा प्रत्येकी एक जवान शहीद झाला, तर दोन जवान जखमी झाले होते.

## आदित्य ठाकरेंना अटक करा

चौकशी करावी लागते. काल सतीश सालियन यांनी मविआच्या काळातील मंत्र्यावर आरोप केले. त्यामुळे त्या नेत्याला सामान्य व्यक्तीप्रमाणे न्याय लावावा, अशी मागणी केली. नितेश राणे यांच्या या मागणीला शिंदे गटाचे मंत्री शंभुराज देसाई यांनी समर्थन दिले.अजितदादा गटाचे आमदार अमोल मिटकरी आणि शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी दिशा सालियन प्रकरणात नव्याने दाखल करण्यात आलेल्या याचिकेतील आरोपांमध्ये तथ्य नसल्याचे म्हटले आहे. दिशा सालियान या प्रकरणात सीआयडीच्या तपासात काहीही राजकीय नेत्यांचा सहभाग नव्हता. कोणाकडे काही पुरावे असतील तर द्यायला हवे होते. त्यावेळी महाविकास आघाडीचे सरकार होते. मात्र, मागचे तीन वर्ष तर आमचे सरकार होते, असे सांगत नितेश राणेंच्या आरोपांवर प्रश्न उपस्थित केला. रोहित पवारांकडूनही आदित्य ठाकरेंची पाठराखण करण्यात आली आहे. आदित्य ठाकरेंना मी जवळून ओळखतो. मला वाटते कितीही काही केले तरी आदित्य ठाकरेंचा काहीही संबंध नाही. एसआयटीचे नेमके झालं तरी काय? एसआयटी शांत सर्वच शांत आहे. यात महाराष्ट्राची बदनामी केली जात आहे, असे रोहित पवार यांनी म्हटले.

## पवईतील बहुमजली इमारतीस आग

**मुंबई :** पवई येथील गोपाल शर्मा इंटरनॅशनल स्कूल नजीकच्या साई सॅफायर या २२ मजली इमारतीच्या सतराव्या मजल्यावर गुरुवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास आग लागली. आग आणि धुरामुळे इमारतीत अडकलेल्या ५० ते ६० रहिवाशांची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुटका केली. त्यामुळे मोठी हानी टाळली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही. मात्र, मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली.


**ग्रामपंचायत चांदशी ता. जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०३/२०२४-२५**

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (याशासननिर्णया नुसार)

ग्रामपंचायत चांदशी ता. जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅन कार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा २१/०३/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक २६/०३/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक २७/०३/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्यानंतर सदरच्या निविदासंबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत चांदशी ता. जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

कामाचे नाव १) Rain Water Harvesting At Grampanchayat Chandshi Est. Amt.149923 /- 2)Constructing Toilet Block २) (महिला ग्राम. संघ कार्यालय) Grampanchayat Chandshi Est. Amt. 239321/-

**सरपंच ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत चांदशी ता. जि. नाशिक**

**ग्रामपंचायत वासाळी ता. जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५**

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)

ग्रामपंचायत वासाळी ता. जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी साहित्य पुरवठा लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदर च्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी/शॉपएक्ट, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅन कार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा २१/०३/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक २६/०३/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक २७/०३/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना पुरवठादार स्वतः हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्यानंतर सदरच्या निविदासंबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत वासाळी ता. जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

साहित्याचे नाव- १)सिमेंट(प्रती बॅग) २)खडी (प्रती ब्रास) ३) वाळू (प्रती ब्रास) ४) दगड (प्रती ब्रास) ५) मुरूम (प्रती ब्रास) ६)वीट (प्रती नग) ०७)स्टील (प्रती कि. ग्रा.) ०८) वॉश सॅन्ड (प्रती ब्रास)

**सरपंच ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत वासाळी ता. जि. नाशिक**

**ग्रामपंचायत पिंपळगाव भटाटा ता इगतपुरी, जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

प्रशासक, ग्रामपंचायत पिंपळगाव भटाटा ता इगतपुरी, जि. नाशिक येथे १) गॅबरेज सेगरेशन शेड बांधणे. - १,५०,७६९ २) जि.प शाळा पिंपळगाव भटाटा ग्रील व गेट बसवणे. -१,९०,०००/- ३) जि.प शाळा गंगाडवाडी ग्रील बसवणे.-१,६०,०००/- ४) नळ कनेक्शन करणे. पिंपळगाव भटाटा - १,०५,६०१.या विकास कामकरिता बंद लिफाफा पद्धतीने नोंदणीकृत ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामासाठी कोरे निविदा संच ग्रामपंचायत पिंपळगाव भटाटा ता इगतपुरी, जि. नाशिक येथे रोख/ऑनलाइन रक्कम भरून दि. २०/०३/२०२५ ते २६/०३/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून, निविदासंबधी सर्व माहिती, अटी व शर्ती सदर निविदा संचात उपलब्ध आहे. प्राप्त निविदा दि. २७/०३/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता उघडण्यात येईल.तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार प्रशासक, ग्रामपंचायत पिंपळगाव भटाटा ता इगतपुरी, जि. नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

**सही /- ग्रामपंचायत अधिकारी सही / प्रशासक**
**ग्रामपंचायत पिंपळगाव भटाटा ता इगतपुरी, जि. नाशिक**

**ग्रामपंचायत आहुर्ली ता इगतपुरी, जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

प्रशासक, ग्रामपंचायत आहुर्ली ता इगतपुरी, जि. नाशिक येथे १) भूमिगत गट्टर करणे.-३,९९,५५६/- २) गॅबरेज सेगरेशन शेड बांधणे.-१,५०,७६९/-.या विकास कामकरिता बंद लिफाफा पद्धतीने नोंदणीकृत ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामासाठी कोरे निविदा संच ग्रामपंचायत आहुर्ली ता इगतपुरी, जि. नाशिक येथे रोख/ऑनलाइन रक्कम भरून दि. २०/०३/२०२५ ते २६/०३/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध असून, निविदासंबधी सर्व माहिती, अटी व शर्ती सदर निविदा संचात उपलब्ध आहे. प्राप्त निविदा दि. २७/०३/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता उघडण्यात येईल.तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार प्रशासक, ग्रामपंचायत आहुर्ली ता इगतपुरी, जि. नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

**सही /- ग्रामपंचायत अधिकारी सही/ प्रशासक**
**ग्रामपंचायत आहुर्ली ता इगतपुरी, जि. नाशिक**

**इगतपुरी नगरपरिषद, ता. इगतपुरी जि.नाशिक**

**जा.क्र. इगतपुरी सार्वजनिक वाचनालय/११/२०२५ दि. २१/०३/२०२५**

**जाहीर निविदा**

इगतपुरी नगरपरिषदेच्या सार्वजनिक वाचनालयाकडील ग्रंथसंपदेचे जपवणूक करणेकामी तपशिलाप्रमाणे जाहीर दरपत्रक मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | साहित्य तपशिल | दर प्रती नग |
|---|---|---|
| १ | अ. पुस्तकांची माहिती संगणक प्रणाली मध्ये नोंदविणे पुरविणे कामी परिपूर्ण संगणक .....पुरविणे | |
| | ब. सभासदांना ग्रंथ शोधण्यासाठी मोबाईल ॲप पुरविणे | |
| | क. वाचनालयातील पुस्तकांना बारकोडिंग करणे | |
| | ड. नामातील पुस्तकांची परिगणना करणे. | |
| | इ. वाचनालयातील पुस्तकांची मांडणी करणे. | |
| | उ. वाचनालयातील कालपरत्वे जीर्ण पुस्तके बाद करणेकामी अहवाल सादर करणे. | |

**नियम व अटी :-**१) कोरे निविदा विक्री फॉर्म रु.५००/- रोख जमा करून **दि. २१/०३/२०२५ ते दि. २८/०३/२०२५** या कालावधीत कायालयीन वेळेत मिळतील. २) मोहरबंद निविदा अनामत **रुपये ५०००/-** सह **दि.२८/०३/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यंत** स्विकारले जातील. ३) या पूर्वी वरील प्रमाणे केलेले कामांचा अनुभव असल्यास अशा दरपत्रक धारकांना प्राधान्य देण्यात येईल. ४) इतर नियम व अटी निविदा फॉर्म नमुन्यांत पहावयास मिळतील. ५) निविदा मंजूर वा नामंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

**(सोमनाथ आढाव)**
**मुख्याधिकारी गट अ,**
**इगतपुरी नगरपरिषद**


* मुंबई : स्वच्छ आणि सुंदर शहरासह मुंबईकर निरोगी राहावेत, या हेतूने महानगरपालिका प्रशासनाने विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे.


**ग्रामपंचायत कार्यालय नगरसूल तालुका- येवला, जिल्हा - नाशिक**

**सूचना क्रमांक ०४-२०२४-२५**

ग्रामपंचायत नगरसूल ता. येवला जिल्हा नाशिक यांचेकडील विकास कामाकरिता खालील कामाची निविदा योग्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ऑनलाइन २०/०३/२०२५-२७/०३/२०२५ पर्यंत मागविण्यात येत आहे. उपरोक्त निविदा **http://www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर ऑनलाइन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. अधिक माहिती करिता **http://www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर भेट द्यावी .

NAME OF WORK

1) PROVIDING WATER SUPPLY PIPELINE., 2) REPAIRS TO WATER SUPPLY PIPELINE, 3) CONST.INTERNAL CEMENT CONCRETE ROAD, 4) SOLID WASTE AND LIQUID WASTE MANAGEMENT UNITS

**सही/- सरपंच सही/-ग्राम. विकास अधिकारी**

**ग्रामपंचायत कार्यालय गोंदे दुमाला, तालुका इगतपुरी, जि. नाशिक**

**जाहीर निविदा क्र. ५/२०२४-२०२५**

ग्रामपंचायत कार्यालय **गोंदे दुमाला, तालुका इगतपुरी, जि. नाशिक** खालील कामाची निविदा ई टेंडरिंग पद्धतीने मागवीत आहे.

सदर निविदा मा. शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावरून १९/०३/२०२५पासून डाउनलोड करता येईल. या निविदेसंबंधीची सर्व माहिती व अटी/शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. ही निविदा फक्त इंटरनेटवरूनच खरेदी करता येईल. तसेच इंटरनेटवरून भरता/दाखल करता येईल. सर्व मक्तेदार/पुरवठादार Digital Signature यांनी रजिस्ट्रेशन / रिनीवल करणे आवश्यक आहे

**कामाचे नांव :** 1) PROVIDING SOLAR POWER PACK SYSTEM Z.P PRIMERY SCHOOL BUILDING 2 )PROVIDING SOLAR POWER PACK SYSTEM AT GRAMPANCHYAT OFFICE GONDE DUMALA TAL IGATPURI DIST NASHIK 3 ) ग्रा.पं गोंदे दुमाला येथील महिला व मुलींकरिता कौशल्य प्रशिक्षण शिबिर आयोजन करणे. (मनुष्य व साधनसामग्रीसह)

**-/ग्रामविकास अधिकारी -/प्रशासक**

**ग्रामपंचात टाकळी (विंचूर) टाकळी (विंचूर). ता.निफाड जि.नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०५/ २०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत टाकळी (विंचूर), ता.निफाड जि. नाशिक येथे १५ वित्त अयोग व स्वछ भारत मिशन योजने अंतर्गत घनकचरा व्यकस्थापन करणे या कामासाठी दिनांक २०/०३/२०२५ पासून ई-निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. ई-निविदा शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदारांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत टाकळी (विंचूर). ता.निफाड जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /- ग्रामपंचायत अधिकारी सही/-सरपंच**
**ग्रामपंचायत टाकळी (विंचूर) , ता.निफाड जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय फुलेनगर, ता. नांदगाव, जि.नाशिक**

**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत कार्यालय, फुलेनगर ता. नांदगाव जि. नाशिक

ग्रामपंचायत फुलेनगर ता. नांदगाव जि.नाशिक खालील कामाचे नोंदणी कृत ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद बी-१ निविदा दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**वित्त आयोग व इतर निधी अंतर्गत (सन २०२५-२६)**
**२०/०३/२०२५ ते २५/०३/२०२५ या कालमर्यादित**

**अटी व शर्ती -** १. निविदा फी व माहितीपत्रक कार्यालयात ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २. सिलबंद निविदा ग्रामपंचायत कार्यालय येथे उघडण्यात येईल. ३. निविदा स्वीकारण्यात अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहेत.

**सही/ग्रामसेवक सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय फुलेनगर, ता. नांदगाव, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय जोपुळ, ता.दिंडोरी (नाशिक)**

**जाहीर लिलाव**

ग्रामपंचायत जोपुळ, ता. दिंडोरी, जि. नाशिक हद्दीतील सन २०२५/२०२६ या सालासाठी **दि.२७/०३/२०२५ वार गुरुवार सकाळी ठिक १०.३० वा. ग्रामपंचायत कार्यालय जोपुळ, ता.दिंडोरी, जि. नाशिक** येथे आठवडे बाजार लिलाव करण्यात येणार आहे. तरी ईच्छुकांनी उपस्थित राहावे.

| लिलावाचे ठिकाण | कालावधी |
|---|---|
| आठवडे बाजार लिलाव | ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ |

**वरील प्रमाणे लिलाव घेण्यात येणार असून लिलावाच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.**

**दि.२१/०३/२०२५**
**ठिकाण :- जोपुळ**

**सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत जोपुळ**
**ता.दिंडोरी, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय दहेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**(प्रथम प्रसिद्धी) जाहीर ई निविदा सूचना २०२४-२५**

ग्रामपंचायत कार्यालय दहेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे स्वच्छ भारत मिशन, १५वा वित्तआयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई - निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक १८/०३/२०२५ पासून ते २५/०३/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील. ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय दहेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**सही/- ग्रामपंचायत अधिकारी सही/- सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय दहेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

**टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की.

खालील **परीशिष्ट अ** मध्ये वर्णन केलेली मिळकत ही **छाया विलास पांगारकर, विलास नागवेव पांगारकर व विशाल विलास पांगारकर,** यांचे मालकीची व कब्जे यहीवाटीची अशी मिळकत असून त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध व बिनबोजाची आहे. असे सांगुन आमचे पक्षकार यांचे सोबत विक्री व्यवहार निश्चित केलेला आहे.

सबब, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा करार, मदार, साठेखत, खरेदीखत, विसारपावती, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, लिन, लिज, कोर्ट जप्ती, अन्नवस्त्र, दावा, दरखास्त, अर्ज वगैरे स्वरुपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास **१५ (पंधरा)** दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी कागदपत्रांनिशी व लेखी पुराव्यानिशी समक्ष येवून हरकत नोंदवावी व खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजणेत येईल, परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही टायटल व्हेरीफीकेशन काभी जाहीर नोटीस.

**परिशिष्ट अ**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे वावी** तालुका सिन्नर जिल्हा नाशिक या गावचे ग्रामपंचायत हद्दीतील व शिवारातील शेतजमिन मिळकत यांसी **गट नंबर ९५/३ यांसी एकुण क्षेत्र ०१ हे. २० आर.+ पो.ख. ०० हे. ०३ आर. यांसी आकार ०४ रु. ६६ पै** .ही संपुर्ण मिळकत यांसी चतु:सिमा रेकॉर्ड प्रमाणे..

**तारीख - ११/११/२०२४**

**सही/-**
**आमचे मार्फत प्रसिद्ध**
**ॲड.मयुर विलास पांगारकर, ३ रा मजला, श्रीजी युनीपार्क, शिंगाडा तलाव नाशिक - ०१. मो. ८८८८८८०१८२**

**दि वणी मर्चन्टस को. ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय परिस शिवाजी रोड, कसबेवणी शाखा वणी यांचेतर्फे**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१. मिळकतीचे वर्णन - तुकडी जिल्हा परिषद नाशिक, पोट तुकडी तालुका, पंचायत समिती दिंडोरी पैकी मौजे कसबेवणी, या गांवचे शिवारातील बिनशेती गट नं. १६०/२/प्लॉट / ९ यांसी क्षेत्र ०१.६०.०० आर.चौ.मी.** सदर मिळकतीवर ग्रामपंचायत रेकॉर्डप्रमाणे बांधीव मिळकतीचे वर्णन **खुली बखळ जागा १६०.०० चौ.मी.** त्यामध्ये घर एक आर.सी.सी. बांधकाम भरमजला माडीचे खालील मजल्यावर हॉल १ वन रूम किचन संडास बाथरूमसह ३० ३३ वरील १ रूम किचन संडास बाथरूमसह ३० १६ बाकी खुली बखळ जागा बांधकाम चौ. फुट १४७० यांसी एकुण क्षेत्रफळ १७२२ चौ. फुट यांसी ग्रामपंचायत मिळकत नं. २८०५ यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

२. वर कलम १ यात नमूद मिळकत **श्री. दिनेश शिवाजी पवार** यांचे मालकीची व कब्जेवहीवाटीतील असून सदर मिळकत निर्बंध व बिनबोजाची असल्याचे सांगून कर्जदार श्री. दिनेश शिवाजी पवार यांनी आमचे पक्षकार दि वणी मर्चन्टस को. ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय परिस शिवाजी रोड, कसबेवणी शाखा वणी यांचेकडे उपरोक्त मिळकतीवर त्यांचेकरीता तारण कर्जाची मागणी केलेली आहे. सबब, उपरोक्त नमूद मिळकतीच्या स्वामित्व व निर्वेधपणाची खात्री करणेकामी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द केली आहे.

३. सबब, वर कलम १ मध्ये नमूद मिळकतीवर वर नमूद मिळकत मालकाव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणतेही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध जसे की, गहाण, दान, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, साठेखत, जनरल मुखत्यारपत्र लिज, लिन, अगर तत्सम प्रकारचा हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व साक्षांकीत कागदपत्रांसह हरकती नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या, मुदतीनंतर आलेल्या, लेखी व साक्षांकीत कागदपत्रांसह न आलेल्या हरकती उपरोक्त मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही व सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून आमचे पक्षकार वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर पुढील कार्यवाही करतील, यांची नोंद घ्यावी. कळावे. ही जाहीर नोटीस ता.२०/०३/२०२५

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**दि वणी मर्चन्टस को. ऑप. बँक लि. मुख्य कार्यालय परिस शिवाजी रोड, कसबेवणी शाखा वणी, ता. दिंडोरी**

**सही/-**
**श्री.सागर मधुकर वाघमारे, (ॲडव्होकेट)**
**ऑफीस - गाळा नं. ३५/क, दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समिती संकुल, निळवंडी रोड, दिंडोरी, ता. दिंडोरी जि.नाशिक मो. ९८६०९५७१८१**

**ई. निविदा सूचना क्र. १२/१३ सन -२४-२५**

ग्रामपंचायत जोपुळ ता.दिंडोरी हे जिल्हा परिषद कडिल योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाची ई-निविदा मागवित आहे.

| अ नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू |
|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विहिरिस कंपाउंड बांधणे | ४९९६६४ |
| २ | विहिरिस संरक्षक जाळी बसविणे | २१९८६० |

१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाइन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदेसंदर्भात निविदा नोटीस प्रसिध्दी, सूचना, शुध्दीपत्रके इत्यादी माहीती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. वरील कामाची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. सदर संकेत स्थळावरून दि.१९/०३/२०२५ रोजी ०९ ०० वा. ते दिनांक- २६/०३/२०२५ चे ०९ -०० वा. पर्यंत अधिग्रहित ( ऊन्नथछङ्जअऊ करता येतील.

**ग्रामपंचायत अधिकारी उपसरपंच सरपंच**
**ग्रामपंचायत जोपुळ ता. दिंडोरी जि. नाशिक**

**टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका **दिंडोरी** पैकी **मौजे मावडी** गांवचे ग्रामपंचायत हद्दीतील व शिवारातील शेतजमीन मिळकत यांसी भूमापन क्रमांक व उपविभाग ३५५ यांसी एकूण क्षेत्र हेक्टर १६.३८.०० आर चौ. मी., पो ख क्षेत्र हेक्टर ०.९४.०० आर चौ. मी. यांसी आकार रु. १२.७५ पैसे यापैकी हकिमुद्दीन फिदा हुसेन कांचवाला व इतर २ यांचे स्वतंत्र खरेदीमालकीचे व कब्जेवहीवाटीतील क्षेत्र हे. २.००.०० आर. चौ. मी. आकार १ रु. ५६ पै. व क्षेत्र हे २.०७.०० आर. चौ.मी. पो ख क्षेत्र हेक्टर ०.१०.०० आर चौ. मी. आकार १ रु.६१पै. यांसी चतु:सिमा गांव नकाशाप्रमाणे...

वर वर्णन केलेली शेतजमीन मिळकत ही **हकिमुद्दीन फिदाहुसेन कांचवाला, जुमाना हकिमुद्दीन कांचवाला व रशिदा युसुफ तशरीफवाला** यांचे स्वकष्टार्जीत खरेदीमालकीची व कब्जे वहिवाटीतील आहे. सदर शेतजमीन मिळकत मालक यांना प्राप्त झालेल्या हक्क व अधिकारातील शेतजमीन मिळकत त्यांनी निर्वेध व बिनबोजाची असल्याचे सांगितलेले आहे. तथापी प्रस्तुत नोटीस ही टायटल व्हेरिफिकेशनकामी प्रसिध्द करीत आहोत.

तथापी, उपरोक्त शेतजमीन मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिन, लिज, तारण, करार, मदार, साठेखत, गहाणखत, कोर्ट मनाई हुकुम, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, जामिन, जप्ती, कोर्टवाद अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी साक्षांकित कागदोपत्री पुराव्यासह प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत आमचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकत नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास शेतजमीन मिळकत निर्वेध आहे असे समजुन निर्वेधपणाबाबतचा दाखला देण्यात येईल व मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द होणारी हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**ही जाहीर नोटीस.**
**दिनांक- १८/०३/२०२५.**

**आमचे मार्फत प्रसिध्द**
**सही/- ॲड. प्रकाश भास्कर बोडखे**
**ठक्कर बाजार नवीन सीबीएस, नाशिक मो. ९८२३३८२२५३**

**ग्रामपंचायत कार्यालय साकोरे, ता. नांदगाव जि.नाशिक**

**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत कार्यालय, साकोरे, ता. नांदगाव, जि.नाशिक

ग्रामपंचायत साकोरे, ता. नांदगाव, जि.नाशिक खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद बी-१ निविदा दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**वित्त आयोग व इतर निधी अंतर्गत (सन २०२५-२६)**
**२०/०३/२०२५ ते २५/०३/२०२५ या कालमर्यादित**

**अटी व शर्ती** -१. निविदा फी व माहितीपत्रक कार्यालयात ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २. सिलबंद निविदा ग्रामपंचायत कार्यालय येथे उघडण्यात येईल. ३. निविदा स्वीकारण्यात अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहेत.

**सही/ग्रामसेवक सही/- सरपंच**
**ग्रा.पं. साकोरे, ता.नांदगाव, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत पाडळी,ता.सिन्नर, जि. नाशिक.**

**जाहीर निविदा सूचना क्रमांक ४ सन २०२४-२०२५**

सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत पाडळी तालुका सिन्नर जिल्हा नाशिक येथे १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत साहित्य खरेदी व कामांकरिता बंद लिफाफा जाहीर निविदा व दरपत्रक सु.बे.अ.नोंदणीकृत मक्तेदाराकडून व पुरवठादाराकडून मागविण्यात येत आहे. **दिनांक. २१/०३/२०२५ ते २५/०३/२०२५ पर्यंत**

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | निधीचे नाव |
|---|---|---|---|
| १) | गावांतर्गत भूमिगत गटार करणे. | २,५०,०००/- | १५ वा वित्त आयोग |
| २) | ग्रा.पं शेजारी जाळी/भिंत बांधणे. | १,८२,५५९/- | १५ वा वित्त आयोग |
| ३) | गावात CCTV कॅमेरे बसविणे | १,००,०००/- | १५ वा वित्त आयोग |

१. निविदा सादर करताना अ तांत्रिक लिफाफा ब व्यापारी स्वरूपात दोन्ही लिफाफे सीलबंद लिफाफ्यातून सादर करावयाची आहे.
२. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, बांधकाम नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, इन्कम टॅक्स रिटर्न, कामाचा दाखला, तांत्रिक मनुष्यबळ व साधन सामग्री आवश्यक
३. एकदा निविदा दरपत्रक सादर केल्यावर मागे घेता येणार नाही. सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावयाचा कालावधी दिनांक. २१/०३/२०२५ ते २५/०३/२०२५ पर्यंत
४. निविदा उघडण्याची संभाव्य तारीख दिनांक २६/०३/२०२५ रोजी राहील.
५. निविदा स्वीकारणे किंवा नाकारणे हा अधिकार ग्रामपंचायत पाडळी ता. सिन्नर यांच्याकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**सही/- सरपंच सही /- ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत पाडळी, ता. सिन्नर, जि. नाशिक**

**ग्रामपालिका घोटी बु.ता.इगतपुरी, जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना सन-२०२५-२०२६**

याद्वारे घाटी बु. ग्रामपालिकेला सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता कार्यालयीन कामकाजासाठी खालीलप्रमाणे स्टेशनरी व छपाई या कामाच्या सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजे नग |
|---|---|---|
| १ | न.नं. ५ कॅशबुक :- २ क्वॉयरचे, ४ क्वॉयरचे, ६ क्वॉयरचे, १३ क्वॉयरचे | अनुक्रमे ६,१, १व १ नगर |
| २ | न.नं. ६ वर्गीकरण रजिस्टर ४ क्वॉयरचे | २ नग |
| ३ | न.नं. ७ सामान्य पावती पुस्तक | ५० नग |
| ४ | न.नं. ९ घरपटटी करमागणी रजिस्टर ९ क्वॉयरचे | ६ नग |
| ५ | घरपटटी वसुली पोटकिर्द ४०० पानी | ५० नग |
| ६ | न.नं. १० घरपटटी पावती पुस्तके | ५० नग |
| ७ | जागा / गाळाभाडे वसुली पोटकिर्द २०० पानी | १ नग |
| ८ | न.नं. ११ किरकोळ मागणी रजिस्टर १४ क्वॉयर | १ नग |
| ९ | न. नं. १७ ॲडव्हान्स अनामत रजिस्टर ४ क्वॉयरचे | १ नग |
| १० | न. नं. १९ हजेरी रजिस्टर २ क्वॉयरचे | १ नग |
| ११ | न.नं. १९ फॉर्म | १ नग |
| १२ | प्रोसिडींग बुक ६ क्वॉयर व ४ क्वॉयर (मोठी साईज) | प्रत्येकी १ नग |
| १३ | घरपटटी बिलबुके | ८० नग |
| १४ | खास पाणीपटटी मागणी रजिस्टर १८ क्वॉयर | ५ नग |
| १५ | खास पाणीपटटी बिलबुके | ५२ नग |
| १६ | बाजार वसुली पावती पुस्तके | १०० नग |
| १७ | बाजार वसुली पोटकिर्द ४ क्वॉयरचे | १ नग |
| १८ | नोटीस बुके | ५० नग |
| १९ | २ क्वॉयरचे रजिस्टर | आवश्यकतेनुसार |
| २० | टी.सी.एल. रजिस्टर | आवश्यकतेनुसार |
| २१ | जन्म, मृत्यु विवाह नोंद रजिस्टर | आवश्यकतेनुसार |
| २२ | ४ कलर लेटरहेड | आवश्यकतेनुसार |
| २३ | लॉग बुक | आवश्यकतेनुसार |
| २४ | बॉक्स फाईल, स्प्रिंग फाईल, फोलीओ फाईल न.न. १२ व्हाऊचर फॉर्म, ए ४ पेपर रिम, लेजर पेपर रिम, कार्बन पेटी, कॅलक्युलेटर, टाचणी बॉक्स, स्टॅपलर, स्टॅम्प पेंड, पचिंग मशिन, टोचा टॅग बडल. | आवश्यकतेनुसार |

वरीलप्रमाणे साहीत्य ग्रामपालिकेला आवश्यक आहे. पुरवठादार यानी वरीलप्रमाणे साहीत्याचे दर बंद लिफाफ्यातून ग्रामपालिका कार्यालय घोटी बु. येथे ७ दिवसात पोहचतील अशा पध्दतीने पोस्टाने किंवा समक्ष स्वतः आणुन दयावेत. साहीत्यात वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. निविदा मजुर वा नामजुर करण्याचे अधिकार ग्रामपालिका राखुन ठेवत आहे.

**सही/- ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपालिका घोटी बु।।** (शिक्का) **सही/- प्रशासक ग्रामपालिका घोटी बु।।**

**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे.
**संपर्क-९८६०१३६५३६**

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे. श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. **८२३७३११२११**

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

---

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

### पाहिजेत

भरवज, ता. इगतपुरी, जि.नाशिक येथे इलेक्ट्रीक रिक्षासाठी ड्रायव्हर पाहिजे. **संपर्क- ९३२६१३८६५९**

---

महात्मा नगर (नाशिक) येथे बंगल्यासाठी विवाहित चौकीदार जोडप्याची गरज आहे. माणसाला ड्रायव्हिंगचा अनुभव असल्यास मदत होईल. स्त्रीला घरकामात मदत करावी लागेल. बंगल्याच्या परिसरात राहण्याची सोय केली जाईल. वयोमर्यादा: ४० वर्षांपर्यंत. **९६५७०४९९९१** वर संपर्क साधावा.

---

त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/ ८४८४८१०५५३

---

बा.ब.बहुउद्देशीय संस्था संचलित, डिस्कव्हरी पब्लिक स्कूल, वडाळीभोई, खंडेराव मंदिराजवळ, ता.चांदवड, जि.नाशिक
**मुख्याध्यापक-** १ पद, **शिक्षक-** ९ पद, **सफाई कामगार**-१ पद, सिक्युरिटी गार्ड-१ पद, **वाहनचालक (वाहनासह)**-५ पद
**मुलाखत- वरील स्थळी**
दिनांक २१/०२/२०२५
ते दिनांक २५/०२/२०२५.
वेळ स.११ ते ४
**संपर्क- ९४२२२५३०८४/ ९३७०४२२१२२**

### पाहिजेत

नामांकीत डेअरी प्रॉडक्ट कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजे आहे.
संपर्क- **77750001666**

---

आश्रमशाळा, कन्येशाळेसाठी त्वरित लेडीज शिक्षिका पाहिजेत, निराधार, घटस्फोटीत, विधवा महिलांना प्राधान्य.
व्हॉटस्अप-**8862008788** वर फोटोसहीत त्वरित माहिती पाठवा.

### विकणे आहे

बोरगड नाशिक येथील १५३ वार जागेत ४ BHK कॉर्नर रो बंगलो त्वरित विकणे आहे.
संपर्क : **९५६१०४९४६१**

### देणे आहे

विराज व्हरटेक्स, कॉलेज रोड ऑफिस भाड्याने देणे आहे
६०० स्केअर फुट, १ कार पार्किंग, स्वयं संचालित **संपर्क** - ९३७३२७१८७५ / ९३२३९०३५३९

### वधू पाहिजे

**मराठा वधू पाहिजे, वर वय २८, उंची ५.६ इंच, रंग गोरा, नोकरी, संपर्क- ९३५९८०७२३१**

### नावात बदल

मै. अलकल अशोक जठार मेरे पती नाम-जठार अशोक काशिनाथ, सैन्य संख्या 14352428 W रॅन्क- Ex/HAV, युनिट 67 MED, REG7 मेरे पती के आर्मी रेकॉर्ड मे मेरा नाम अलका और जन्मतिथी 19/05/1969 गलत दर्ज है. मेरा सही नाम **अलका अशोक जटार और जन्मतिथी** 03/09/1970 है. ॲफिडेव्हिट संख्या 245/ 6415 6126 81003 51529 तारीख 12/03/2025

### Name changed

I ALKA ASHOK JATHAR IS WIFE OF NAME- JATHAR ASHOK KASHINATH, ARMY NO- 14352428 W, RANK EX/HAV, UNIT 67 MED REGT, IN MY HUSBAND ARMY SERVICE RECORD, MY NAME IS ALKA AND DATE OF BIRTH 19/05/1969 WHICH IS WRONG. MY CORRECT NAME IS **ALKA ASHOK JATHAR AND DATE OF BIRTH 03/09/19** 70. AFFIDAVID NO-2451641561 268100351529 Dt - 12/03/2025

## महत्त्वाचे

### सक्षमीकरणासाठी महिलांनी संघटित होणे गरजेचे : पगारे



**नाशिक : प्रतिनिधी**
ग्रामीण महिलांच्या सार्वत्रिक सक्षमीकरणासाठी महिलांनी संघटित होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास विभागाचे उपायुक्त चंद्रशेखर पगारे यांनी केले. जागतिक महिला दिनाच्या औचित्याने कृषी व पशुधन आधारित शासकीय योजनांचे शिबिर आणि ग्रामसंघ पदाधिकारी व प्रवर्तक शासकीय योजना जोडणी व समन्वयन शिबिराचे आयोजन आंबेवाडी येथे आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून एनजीओ फोरमचे अध्यक्ष मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, प्रेम फाउंडेशनचे अध्यक्ष राजू शिरसाठ, अफार्म संस्थेचे कृषी विकास अधिकारी रुपेश ढगे, अनुसया सदगीर, उपसरपंच विनायक आव्हाड, आकाश भोळे,महिला व बाल विकास विभाग नाशिक, किशोर कोल्हे,आकाश शिंदे सुभाष कडू, सुनील तोकडे, अविनाश भागवत, कृष्णा लंगडे उपस्थित होते. सक्षमीकरणविषयक उपक्रमांची माहिती संस्था प्रमुख राजू शिरसाठ यांनी दिली. मेळाव्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक शंकर केकरे,अनिता कोरडे, बुधाबाई केकरे, लीलाबाई खाडे, ज्योती केकरे, स्वाती झोले, विश्वास कोरडे, अरुण केकरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**
बॉश इंडिया फाउंडेशन आणि मायको एम्प्लॉईज यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, २१ मार्च रोजी दुपारी १२ ते संध्याकाळी ६ या वेळेत मायको एम्प्लॉइज फोरम, राजे संभाजी स्टेडियम शेजारी, सिंहस्थनगर, सिडको, नाशिक येथे होणार आहे. कार्यक्रमात महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी, आर्थिक साक्षरता आणि शासकीय योजनांची माहिती, तसेच विविध स्पर्धात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व सहभागी महिलांसाठी चहा व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली असून, प्रवेश सर्वांसाठी मोफत आहे. या कार्यक्रमाचा लाभ परिसरातील महिलांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### रंगपंचमीला रामकुंडात पाणी खेळत असताना मंगळसूत्राची चोरी

**पंचवटी : वार्ताहर**
रंगपंचमीनिमित्त रामकुंडात पाणी खेळत असताना पाणी उडवणाऱ्या मुलांनी मंगळसूत्राची चोरी केल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत माहिती अशी की, रंगपंचमी निमित्त फिर्यादी महिला दिव्या तुषार सोनार (२४) व्यवसाय गृहिणी, रा. हनुमंत लोखंडे मळा, म्हसोबा मंदिराजवळ, जेलरोड, नाशिकरोड या दि.१९ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास रामकुंड गोदावरील नदीपात्रात पाण्यात खेळत असताना ३० हजार रुपये किमतीचे ११.२१ वजनाचे काळे मणी असलेले सोन्याचे मंगळसूत्र काढून नेले. याबाबत पंचवटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सुनिल शेवाळे करत आहे.

### सातपूरला हॉटेल व्यावसायिकास मारहाण करीत केली लूट



**सिडको : विशेष प्रतिनिधी**
सातपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील त्र्यंबकेश्वर रोडवरील समृद्धनगर भागातील अज्जू दा ढाबा या ठिकाणी रंगपंचमीच्या दिवशी बुधवारी भर दुपारी राडा झाल्याची घटना घडली आहे. याबाबत सातपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ढाब्याच्या पुढे असलेल्या टपरीचालकाला सिगारेट व काही वस्तू घेत टवाळखोरांनी दमदाटी केली. यानंतर टपरीचालकाने हॉटेलचालक अजय डिंगोरे यांना फोन करत माहिती दिली. अजय डोंगरे हे ढाब्यावर आले असता टपरीचालकाने मारहाण झाल्याचा प्रकार सांगितला. यानंतर अजय हे विचारणा करण्यासाठी गेले असता अजय यांना संशयित कृष्णा नागरे, निखिल पवार, गौरव भालेराव, मयूर भालेराव, राजेंद्र मिश्रा व ऋषिकेश नागरे यांनी मारहाण करत जखमी केल्यायाची तक्रार सातपूर पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आली आहे. हॉटेलच्या गल्यातील पाच हजार रुपये व कामगारांना मारहाण केले असल्याचेही फिर्यादीत अजय यांनी म्हटले आहे. घटनेचा अधिक तपास पोलिस अधिकारी राजेश न्हाळदे करत आहेत.

### अवैध ऑनलाइन जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; एक जण ताब्यात

**सटाणा : प्रतिनिधी**
जायखेडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नामपुर येथे बस स्टॅन्डजवळील देशी दारू दुकानाच्या पाठीमागे पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या ऑनलाईन पद्धतीने चक्री नावाचा जुगार खेळत असताना जायखेडा पोलिसांनी छापा टाकला. रोख रकमेसह कॅम्पुटर साहित्य व टीव्ही असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, जायखेडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नामपुर येथे बस स्टॅन्ड जवळील देशी दारू दुकानाच्या पाठीमागे पत्र्याच्या शेडमध्ये लोकांकडुन पैसे घेवुन पैसावर कॉम्पुटरवर ऑनलाइन गेम चक्री नावाचा जुगाराचा खेळ खेळताना व खेळवितांना भटू युवराज पाटील (वय ३८) रा. मालेगाव कॅम्प, तालुका मालेगाव याला पकडण्यात आले. या छाप्यात एलसीडी मॉनिटर, सीपीयू, किबोर्ड, टीव्ही, वाय फाय कनेक्शन व रोख रक्कम असे एकूण १८.३८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यांचा विरुध्द कलम १२(अ) कायदा प्रमाणे कायदेशीर फिर्याद जायखेडा पोलीस स्टेशन मध्ये दाखल करण्यात आली आहे. सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पाटील, पोलीस हवालदार सोनवणे पोलीस हवालदार शिलावट व पोलीस शिपाई पंकज गुंजाळ यांच्या पथकने केली आहे.

### मविप्र पॉलिटेक्निक महाविद्यालयातील 'जॉब फेअर'मध्ये १६० विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महाविद्यालय आणि बॉश इंडिया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जॉब फेअर'च्या माध्यमातून तब्बल १६० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे. या मेळाव्यासाठी एकूण २० कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे बारावी, डिप्लोमा, इंजिनिअरिंग व ग्रॅज्युएशन अशा विविध प्रकारचे शिक्षण घेतलेल्या एकूण ५५० विद्यार्थ्यांनी मेळाव्याला हजेरी लावली.

# ग्रामपंचायत निवडणुकींची प्रक्रिया गतिमान

## २६ मार्चपर्यंत सोडत निश्चिती केली जाणार

**नाशिक : प्रतिनिधी**
**नागरिकांच्या मागास प्रवर्गअंतर्गत रिक्त असलेल्या परंतु अतिरिक्त ठरणाऱ्या जागा आता खुल्या प्रवर्गात वर्ग केल्या जातील. त्यानुसारच त्यातील ५० टक्के महिलांचे आरक्षणही चक्राकार पद्धतीने सोडतीद्वारे निश्चित केले जाणार आहे. २६ मार्चपर्यंत ही सोडत निश्चिती केली जाणार आहे.**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला अद्याप मुहूर्त लागला नसताना राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रक्रिया गतिमान केली आहे. याअंतर्गत आता अनेक दिवसांपासून भिजत पडलेला नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या जागांच्या संदर्भातील महत्त्वाच्या बाबीवरही आयोगाने न्यायालयाच्या आदर्शने निर्णय घेतला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चितीसाठी सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेच्या अनुषंगाने न्यायालयाने नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा निश्चितीसाठी समर्पित मागासवर्ग आयोगाची स्थापना केली होती. या आयोगाने टक्केवारीमध्ये जागांच्या निश्चितीचे प्रमाण जाहीर केले. समर्पित आयोगाच्या अहवालानुसार ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या जागासाठी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची शिफारस लागू होते किंवा नाही याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर सोपवित त्यांना तपासणी करवी, असे आदेशित केले. तसेच समर्पित मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील रिक्त असलेल्या जागा भरण्यापूर्वी त्या अतिरिक्त ठरत असल्यास या जागा अनारक्षित करून त्या खुल्या प्रवर्गातून भरून घ्याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

त्यानुसार आता जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूक, चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणुका होऊ न शकलेल्या अथवा मयत व इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या राज्यातील १६७३ जागांच्या पोटनिवडणुकांसाठी नुकतीच आयोगाने प्रक्रिया सुरू केली आहे. यात नागरिकांच्या मागासन प्रवर्गासाठी रिक्त असलेल्या जागांची टक्केवारीनुसार प्रमाण तपासून अतिरिक्त ठरत असल्यास त्या जागा सर्वसाधारण प्रवर्गात वर्ग केल्या जातील. त्यानंतर या सर्वसाधारण प्रवर्गातून महिलांच्या टक्केवारीनुसार ५० टक्के आरक्षण निश्चित केले जाईल. यासाठी चक्राकार पद्धतीने सोडतीची प्रक्रिया राबवून आरक्षण काढले जाईल. तसे आदेशही आयोगाने देताना महिलांसाठी राखीव झालेल्या जागांची सुधारित अधिसूचना काढली जाईल, त्या प्रसिद्धी देण्याचे ही आदेश आयोगाने दिले आहेत. त्याचा कार्यक्रमही जाहीर केला आहे. यात सोडत २४ मार्च रोजी जाहीर होणार आहे. पूर्वीच्या अधिसूचनेत आवश्यक बदल करून सुधारित अधिसूचना ही २६ मार्च रोजी प्रसिद्ध केली जाईल.

### गरज असलेल्या गावांत विशेष ग्रामसभा

ज्या ग्रामपंचायतीमध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यानुसार अतिरिक्त ठरलेली जागा सर्वसाधारण प्रवर्गात निश्चित झाली आहे, अशा गरज असलेल्या ठिकाणी काल (दि.२०)विशेष ग्रामसभा आयोजित करत सोडतीची नोटीस देण्यात आली.

### नाशिकमध्ये २६९ रिक्त जागा

नाशिकमध्ये ग्रामपंचायत सदस्य, त्यात सार्वत्रिक आणि पोटनिवडणूक सदस्य तसेच थेट सरपंच अशा एकूण रिक्त जागा २६९ आहेत. २६५ सदस्य आहेत. ४ थेट सरपंच आहेत. सदस्यांमध्ये अनुसूचित जाती १०, अनुसूचित जमाती १८६, नामप्रच्या २८, सर्वसाधारण ४१ जागा आहेत. तर ४ थेट सरपंच हे अनुसूचित जमातीच्या आहेत.

# समृद्ध ग्रामयोजनेद्वारे २९६ कामे सुरू

## ३२ हजारांहून अधिक बांधांवर वृक्षलागवड

**नाशिक : प्रतिनिधी**
औद्योगिकीकरण, वाढत्या शहरीकरणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा होणारा ऱ्हास व यातून मानवी जीवनावर होणारा परिणाम आगामी काळात नुकसानीचा ठरू शकतो. त्यामुळे पर्यावरणावर होणारा परिणाम रोखण्यासाठी वृक्ष लागवडीची गरज आहे.

बांधावर फळबाग लागवड वृक्षलागवड,वृक्षसंवर्धन व संगोपन रस्ता दुतर्फा वृक्षलागवडीची कामे नरेगा अंतर्गत घेता येतात. जिल्ह्यात बांधावर वृक्ष लागवड १ हजार ३८, फळबाग लागवड ८९८ वृक्षसंवर्धन व संगोपन, ६०२ बांबू लागवड असे २९६ प्रकारची कामे ग्रामपंचायतीमार्फत सुरू आहे.

पर्यावरण संतुलित समृद्ध ग्रामयोजना लोकसहभागातून चांगल्या प्रकारच्या शासन सहकार्याने उच्च प्रतीच्या मूलभूत सुविधांचा हा कार्यक्रम आहे. पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करणे, राज्य शासनाच्या विविध योजनांची सांगड घालून समन्वय करणे, ग्रामीण भागात शहरी भागाप्रमाणे सुविधा निर्माण करणे हा या योजनेचा उद्देश आहे. ही एक अत्यंत महत्त्वाची योजना असून, सर्वांनी यात सहभागी होण्याची गरज आहे.

दरी गावात एक लाख वृक्षारोपण ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आले आहे. ३५० हेक्टरवर बांबू लागवड करण्यात आली आहे.

गावातील मायना डोंगरमध्ये उपलब्ध शासकीय क्षेत्रापैकी जवळजवळ ४५० एकर क्षेत्रावर महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत ९००० व राह फाउंडेशन - मुंबई यांच्या व माध्यमातून ६२८९६ असे एकूण ७१८९६ वृक्षलागवड करण्यात आलेली आहे. यात देशी, आयुर्वेदिक, फळांच्या विविध जाती,जंगली वृक्षलागवड करण्यात आलेली आहे. यासोबत संपूर्ण क्षेत्रात दुभती जनावरांसाठी पोषक असलेल्या वाळा गवताची लागवड करण्यात आलेली आहे.

नजीकच्या वर्षात पाणीटंचाई समस्या दूर होईल, असा विश्वास दरी ग्रामस्थांना आहे.

### आज वनदिन



जिल्ह्यातील चांदवडच्या दुष्काळी भागातील ६०० एकर निकृष्ट डोंगररांगांवर राह फाउंडेशनने वृक्षारोपण सुरु केले. ७०,००० रोपे लावून, या प्रदेशातील दुष्काळापासून मुक्तीकडे हा महत्त्वाचे पाऊल आहे. रोपटे मोठे व्हावेत आणि ते स्वत: उभे राहू शकतील यासाठी ५ वर्षे त्यांची संगोपन करणे, ही बांधिलकी राह फाउंडेशनने घेतली आहे.

# धरणांमधील गाळ काढण्यासाठी सीएसआर निधीची मदत

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आढावा बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**
जिल्ह्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना प्रभावीपणे राबविली जात असून, या योजनेच्या जिल्ह्यात विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांसाठी निधीची आवश्यकता आहे. यासाठी बँकांसोबतच औद्योगिक वसाहतीतील कंपन्या व जिल्हा उद्योग केंद्रांतर्गत येणाऱ्या आस्थापनांच्या सामाजिक दायित्व निधीची (सीएसआर) मदत घेण्यात येऊन निधी प्राप्तीसाठी संबंधित यंत्रणांनी पाठपुरावा करावा, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना आढावा बैठकीत अपर



जिल्हाधिकारी श्री. पारधे बोलत होते. यावेळी बैठकीस सदस्य सचिव तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी रा.हि. झुरावत, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता वैशाली ठाकरे, वरिष्ठ भू-वैद्यानिक किरण कांबळे, नंदकुमार साखला, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, बँक प्रतिनिधी, एम.आय.डी. सी चे प्रतिनिधी, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी श्री. पारधे म्हणाले की, धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करून धरणांची पाणी साठवण क्षमता वाढविणे व काढलेल्या गाळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतजमिनीची उत्पादकता वाढविणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. एका जलसाठ्यातील गाळ काढण्यासाठी एकापेक्षा अधिक अशासकीय संस्थांचे अर्ज असल्यास संस्थेची कार्यक्षमता तपासून समितीने संस्थेची निवड करावी.

### २४ लाख घनमीटर गाळ काढला जाणार

सन २०२५-२६ साठी जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील धरणांमधून मृद व जलसंधारण विभागामार्फत एकूण ५७ कामे, जि.प. लघुपाटबंधारे विभागाकडून १९१ कामे व मालेगाव पाटबंधारे विभागाकडून ४ कामे अशी एकूण २५२ काम हाती घेण्यात येणार असून, यातून एकत्रितपणे अंदाजित सुमारे २४ लाख ४० हजार ४४५ घ.मी. गाळ काढला जाणार असल्याची माहिती जिल्हा जलसंधारण अधिकारी झुरावत यांनी दिली.

# हाय सिक्युरिटी नंबरप्लेटसाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ

## परिवहन आयुक्तांनी काढले प्रसिद्धीपत्रक



**पंचवटी : सुनील बुनगे**
**हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत निर्देश देण्यात आले होते. त्यास मुदतवाढ देत ३० एप्रिल २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचेही आदेश काढले होते. परंतु जुन्या वाहनांना ही नंबरप्लेट बसविण्याचे काम कमी झाल्याने त्यास मुदतवाढ देण्यात आली असून, ३० जून २०२५ मुदतवाढ देण्याचे प्रसिद्धीपत्रक परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भीमनवार यांनी काढले आहेत.**

वाहनांच्या नंबरप्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट ( उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी ) बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार परिवहन विभागाच्या २३ डिसेंबर २०२४ रोजी परिपत्रकानुसार जिल्ह्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित वाहनांच्या वाहनधारकांनी त्वरीत आपल्या वाहनाची हाय सिक्युरिटी अंबर प्लेट नंबरप्लेट बसविण्याची कार्यवाही असे आदेश परिवहन परिपत्रक क्र.६८/२०२४/ पआका/का.११/२०२४/ जा.क्र १४८७९, दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी काढण्यात आले होते. परंतु

जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी अंबर प्लेट बसविण्याचे काम फारच कमी प्रमाणात झाले असल्याने जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी अंबर प्लेट बसविण्यासाठी दिनांक ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे प्रसिद्धीपत्रक राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी काढले आहेत. तसेच याबाबत जनजागृती करण्यासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. त्याचप्रमाणे स्थानिक वाहन वितरक, ऑटोरिक्षा / टॅक्सी/बस / ट्रक संघटनाची बैठक घेऊन याबाबत सर्वांना माहिती द्यावी, असे आदेश देखील दिले आहेत.

# सिंहस्थ कुंभमेळ्याबाबत पोलिसांची कार्यशाळा

**पंचवटी : वार्ताहर**
**आगामी नाशिक, त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२६/ २७ च्या दृष्टीने पोलिस विभाग सक्रिय झाला असून, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२० रोजी गंगापूर रोडवरील आय.एम.आर.टी. कॉलेज सभागृहात आपत्ती व्यवस्थापनाबाबत कार्यशाळा पार पडली.**



यावेळी पोलिस उपायुक्त गुन्हे प्रशांत बच्छाव पोलीस उपआयुक्त गुन्हे, पोलिस उपायुक्त परिमंडळ १ किरणकुमार चव्हाण, परिमंडळ पोलिस उपायुक्त परिमंडळ श्रीमती मोनिका राऊत, परिमंडळ पोलिस उपायुक्त मुख्यालय वाहतूक चंद्रकांत खांडवी तसेच सर्व सहाय्यक पोलिस आयुक्त सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, पोलिस ठाण्यातील गोपनीय अंमलदार, सिंहस्थ कुंभमेळा कक्ष प्रभारी अधिकारी अंमलदार, अपर पोलिस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच यापूर्वी सिंहस्थ कुंभमेळ्यात काम केलेले सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व अंमलदार उपविभागीय पोलिस अधिकारी महाराष्ट्र पोलिस अकादमी असे सर्व अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेत आपत्ती व्यवस्थापना बाबत रिजिलेंट इंडिया संस्थेचे राजीव चौबे तसेच इंन्टॅक संस्थेच्या श्रीमती रितु शर्मा, जय गोखले यांनी यापुर्वी आलेल्या अडचणी व त्यावर करण्यात आलेल्या उपाययोजना तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित व चांगला होण्यासाठी काय काय उपायोन करणे आवश्यक आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच सादरीकरण केले. त्यांनतर पोलिस दलातुन सेवानिवृत्त झालेले अनुभवी पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी आपले अनुभव व त्यांना आलेल्या अडचणी सांगुन त्यावर काय उपाययोजना केल्या पाहिजे याबाबत व यापूर्वी सिंहस्थ कुंभमेळा २०१५-१६ मध्ये काम केलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

त्याप्रमाणे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सर्वांकडून प्राप्त झालेल्या सूचनांबाबत यादी तयार करुन नाशिक महानगरपालिका, स्थानिक राजकीय नेते व स्थानिक नागरिक यांच्याशी समन्वय साधून त्यात काय सुधारणा करता येतील याबाबत सूचना केल्या. तसेच

याबाबत अंमलबजावणी करण्याच्या व नाशिक शहरातील सर्व शाळा, महाविद्यालयाचे एन.सी.सी., आर.एस.पी., एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी प्रोत्साहन देण्याबाबत तसेच सर्व पोलिस ठाण्यातील गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक व आमदारांना सिंहस्थ कुंभमेळा सेल स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.


### बालिकेच्या फुफ्फुसातून काढली धारदार पिन

#### डॉ. स्वप्निल साखलांच्या टीममुळे जीवदान

**नाशिक : प्रतिनिधी**



**अत्यंत गुंतागुंतीच्या स्थितीत असलेल्या चार वर्षीय बालिकेच्या फुफ्फुसात अडकलेली धारदार पिन नारायणी हॉस्पिटलमधील प्रसिद्ध फुफ्फुस विकार तज्ज्ञ डॉ. स्वप्निल साखला व त्यांच्या टीमने यशस्वी शस्त्रक्रिया करून काढली. त्यामुळे या मुलीला जीवनदान मिळाले.**




याबाबतची माहिती अशी : चार वर्षांच्या मुलीचे डेंटल रुट कॅनलची प्रक्रिया सुरू असताना तिला खोकला आला व यामुळे धारदार पिन गिळली. ही पिन तिच्या फुफ्फुसात जाऊन अडकली. या घटनेमुळे मुलीसह तिचे कुटुंबीय चिंतातुर झाले होते. तातडीने व प्रभावी उपचार कोठे करता येऊ शकते, याची माहिती घेत असताना त्यांना नाशिक येथील प्रसिद्ध फुफ्फुसविकार तज्ज्ञ डॉ. स्वप्निल साखला यांच्याबद्दल माहिती मिळाली. यानंतर दीडशे किलोमीटरचे अंतर पार करून नातेवाईक त्या मुलीला नाशिकला घेऊन आले. नारायणी हॉस्पिटल येथे रात्री मुलीला दाखल केल्यानंतर डॉ.स्वप्निल साखला, डॉ. अभिनंदन मुथा, डॉ. तुषार नेमाडे यांच्यासह हॉस्पिटमधील निष्णात टीमने ब्रॉन्कोस्कोपीद्वारे मुलीच्या फुफ्फुसात अडकेलेली धारदार पिन सुखरुप काढण्यात यश मिळविले. विशेष म्हणजे कुठलीही चिरफाड न करता व रक्तस्राव न होऊ देता ही पिन काढल्याने मुलीच्या तब्येतीत अतिशय झपाट्याने सुधारणा होऊ शकली. त्यामुळे तिच्या जीवाला निर्माण झालेला धोका टळला.

# प्रभाग २५ मध्ये पाण्याचा अपव्यय

## पाण्याची नासाडी, मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष

**सिडको : विशेष प्रतिनिधी**
**प्रभाग क्रमांक २५ मधील सावतानगर भागात असलेल्या सुभाषचंद्र बोस परिसरात नळाला पाणी येण्याच्या वेळी चेंबरच्या ढाप्यातून मोठ्या प्रमाणात पाणी गळत असल्याने हजारो लिटर पाणी वाया जात आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा अपव्यय सुरूच असून, नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही समस्या सुटलेली नाही.**



परिसरातील रहिवाशांनी नाशिक महानगरपालिकेकडे तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप कोणतीही उपाययोजना झालेली नाही. सकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणात पाणी चेंबरमधून वाहून जात असल्याचे चित्र रोजच पाहायला मिळते. एकीकडे शहरातील अनेक भागांत पाणीटंचाई आहे, तर दुसरीकडे महापालिकेच्या हलगर्जीपणामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

स्थानिक रहिवाशांनी सांगितले की महापालिका प्रशासनाला वारंवार कळवूनही समस्या सोडवली जात नाही. अनेक भागांत पाण्याची मोठी टंचाई आहे, अशा परिस्थितीत ही गळती थांबवण्यासाठी त्वरित उपाययोजना करणं आवश्यक आहे. शहरातील जलसाठ्यांवर वाढत्या लोकसंख्येचा ताण आहे, त्यामुळे पाण्याचा अपव्यय थांबवण्यासाठी महापालिकेने तातडीने लक्ष घालून गळती दुरुस्त करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



गेल्या काही दिवसांपासून आमच्या परिसरामध्ये जेव्हा नळाला पाणी येते. त्याच वेळेला चेंबरमधून पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर वाहताना दिसत आहे. यासंदर्भात मनपाकडे तक्रार केलेली आहे. परंतु अद्याप त्यावर ठोस अशी उपाययोजना करण्यात आलेली नाही. यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. सदर प्रकार लवकर थांबवावा.
**– नितीन अमृतकर,** शिवसेना पदाधिकारी तथा स्थानिक रहिवासी

महत्त्वाचे

## ओझरला अपघातात मोटारसायकलस्वाराचा मृत्यू

**ओझर : वार्ताहर**

येथील मुंबई-आग्रा महामार्गावर असलेल्या ओझर येथील गडाख कॉर्नरसमोरील उड्डाणपुलावर मोटारसायकल स्लिप होऊन झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वारास गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. दिनांक १४ मार्च रोजी दुपारनंतर साडेचार वाजेच्या सुमारास विशाल विष्णू रणधीर (वय २८, रा. जळगाव (गा.), ता. मालेगाव, जि. नाशिक, हल्ली रा. मानसदर्शन अपार्टमेंट, जानोरी रोड, दहावा मैल, ओझर) हा एचएएलकडून दहावा मैलकडे त्याच्या मोटारसायकलने (एमएच ४१ बीसी २६३८) गडाख कॉर्नर उड्डाणपुलावरून जात असताना गडाख कॉर्नरच्या समोर उड्डाणपुलावर त्याची मोटारसायकल स्लिप झाल्याने झालेल्या अपघातात तो खाली पडल्याने त्याच्या डोक्यास, कपाळावर, डाव्या खांद्यास, उजव्या हातास गंभीर मार लागला असता त्यास रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु औषधोपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या संदर्भात विष्णू उत्तम रणधीर यांनी काल रोजी तक्रार नोंदविल्यावरून ओझर पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास हवालदार कराड करीत आहेत.

## अंबालाल नहार यांचे निधन


**नाशिक :**



नासिक येथील रविवार कारंजा जैन स्थानकचे मार्गदर्शक सुश्रावक अंबालाल रामचंद्र नहार( वय ८८ )यांचे काल गुरूवार दि.२० पहाटे हृद-यविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली.जावई, सुन,नात सुन नातवंडे पतवंडे अशा मोठा परिवार आहे. सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अभय नहार यांचे ते वडील होते.तर निमा अध्यक्ष आशिष नहार यांचे ते आजोबा होते. अंबालालजी रामचंद्र नहार हे लहानपणापासून खूप हुशार व व्यापारी दृष्टिकोन असणारे व्यक्तिमत्व. ते अत्यंत गरिबीतून व कष्टाने वाडीवऱ्हे येथून रोज साइकल वरून दुध आणून नाशिक शहरात विक्री करीत असत. व आज त्यांनी आपल्या कष्टाने समाजात अनेक कामे करून कंस्ट्रक्शन व्यवसायात सुद्धा चांगले प्रतिष्ठा मिळवली. ते दुध विक्री चे व्यवसाय करीत असताना त्यांनी गूळ व्यवसाय सुरू केले व त्यात त्यांनी अनेक व्यापारी घडवले व आपली वेगळी ओळख तयार केली. हे करीत असताना १९८० ला जमिनी च्या व्यवसायाला सुरवात केली व त्यांना खरी साथ मिळाली ती त्यांचे मित्र कांतीलाल साखला,अर्जुन हिरणी व डॉ. के टी धाडीवाल यांची. जमीन व्यवसायात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली व नहार डेव्हलपर्स चे ते संस्थापक अध्यक्ष झाले. सामाजिक क्षेत्रात सुद्धा त्यांनी आपले भरपूर योगदान दिले व ते जैन श्रावक संघाचे अनेक वर्ष विश्वस्त होते.

## निधन वार्ता

### इसहाक शेख




**वडाळागाव : प्रतिनिधी**

श्रीरामपूर येथील रहिवासी शहर मुस्लिम पंच कमिटी तसेच लायन्स रोटरी क्लबचे पदाधिकारी इसहाक लाल मोहम्मद शेख (वय ८५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुली, मुले, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.नाशिक शहरातील सामाजिक कार्यकर्ते हमीद खान यांचे ते काका होत.

### काळू सोनवणे


**वडाळागाव : प्रतिनिधी** साईनाथनगर येथील



रहिवासी काळू शिवाजी सोनवणे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडं असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय सोनवणे व नंदकिशोर सोनवणे यांचे ते वडील होत.

### प्रकाश दियालानी

**नाशिक :** गंगापूर रोड येथील रहिवासी प्रकाश



सुंदरदास दियालानी (७१) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. उमंग फर्निशिंगचे संचालक भगवान दियालानी व मोती दियालानी यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

### हज्जन नजमा बानो

**जुने नाशिक : वार्ताहर** येथील दूधबाजारातील बॉम्बे स्वीट्सचे संचालक तथा शहरातील मध्यवर्ती मदरसा म्हणून प्रसिद्ध जामिया अहले सुन्नत सादिकुल उलूमचे सचिव हाजी युनूस रजवी यांच्या पत्नी हज्जन नजमा बानो मोहम्मद युनूस रजवी (७८) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, पाच मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# लासलगाव रेल्वे स्थानकातील देवगिरी, शालिमार व जनता एक्स्प्रेसचे थांबे पूर्ववत सुरू करा

## माजी उपमुख्यमंत्री भुजबळ यांची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी

**लासलगाव : वार्ताहर**

कोविड-१९ च्या कार्यकाळात लासलगाव रेल्वे स्थानकात देवगिरी, शालिमार व जनता एक्स्प्रेसचे थांबे बंद करण्यात आले आहेत. हे थांबे पुन्हा पूर्ववत करण्यात यावेत, अशी मागणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व मुंबई विभागाचे मुख्य व्यवस्थापक धर्मवीर मीना यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, लासलगाव येथे आशिया खंडातील सर्वात मोठे कांद्याचे मार्केट आहे. या मार्केटमधून देशभरात तसेच परदेशात विविध ठिकाणी कांदा निर्यात केला जातो. यासाठी लासलगाव रेल्वे स्थानकातून मोठ्या प्रमाणात कांद्यासह शेतमालाचे रॅक भरले जातात. त्याचप्रमाणे या रेल्वे स्थानकातून मोठ्या संख्येने प्रवासी वाहतूक देखील होते. लासलगाव कांदा बाजारभाव हा एक बेंचमार्क म्हणून काम करतो, जो संपूर्ण आशियाई बाजारपेठेत कांद्याच्या किमतींवर परिणाम करतो. ३१ मार्च २०१६ रोजी केंद्र सरकारच्या अंतर्गत भौगोलिक संकेत नोंदणीकडून लासलगाव कांद्याला भौगोलिक संकेत (जीआय) दर्जा क्रमांक २५८ प्रदान करण्यात आला. तथापि, कोविड पुनरुज्जीवनानंतर लासलगाव येथे १७०५७/१७०५८ देवगिरी एक्स्प्रेस, १८०२९/१८०३० शालिमार एक्स्प्रेस आणि १३२०१/१३२०२ जनता एक्स्प्रेसचा व्यावसायिक थांबा अचानक रद्द करण्यात आला, ज्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि प्रवाशांना मोठा त्रास होत आहे. लासलगाव एपीएमसी मार्केटमध्ये येत आहेत. मिशन ३००० मेट्रिक टन अंतर्गत एक्सपोनेन्शियल किसान रेल्वे कांदा लोडिंग प्रदान करूनही लासलगाव (एलएस) उत्तर भारत आणि लगतच्या व्यावसायिक जिल्ह्यांशी जोडण्यापासून वंचित आहे, ज्यामुळे मतदारसंघातील शेतीची समस्या वाढत आहे, ज्यासाठी तुमच्या हस्तक्षेपाची आवश्यकता आहे.

**या गाड्या पुन्हा नियमित सुरू करण्याची मागणी**

मतदारसंघातील प्रवाशांना प्रवाससाठी लासलगाव येथे १७०५७/१७०५८ देवगिरी एक्स्प्रेस, १८०२९/१८०३० शालिमार एक्स्प्रेस आणि १३२०१/१३२०२ जनता एक्स्प्रेसचे व्यावसायिक थांबे पूर्ववत करण्याची तातडीने आवश्यकता आहे. त्यामुळे लासलगाव रेल्वे स्थानकातील देवगिरी, शालिमार व जनता एक्स्प्रेसचे थांबे पूर्ववत सुरू करा, अशी मागणी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.

# अवैध मद्य वाहतूकप्रकरणी एकावर गुन्हा

## ६० हजारांचा मुद्देमाल जप्त; चांदवड पोलिसांची मोठी कारवाई

**चांदवड : वार्ताहर**

**चांदवड पोलिसांनी अवैध मद्य वाहतुकीवर मोठी कारवाई करत एकाला ताब्यात घेतले आहे. तालुक्यातील परसूल शिवारातील तिसगाव फाट्यावर पोलिसांनी ही कारवाई करून दारू वाहतूक करणाऱ्या वाहनासह एकूण ६० हजार १०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

चांदवड पोलिसांना तालुक्यातील चांदवड-परसूल रोडवर देशी आणि विदेशी दारूची अवैध वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मंगळवारी (दि.१८) दुपारी ३.१५ वाजेच्या सुमारास परसूल शिवारातील तिसगाव फाट्यावर सापळा रचला. पोलिसांनी एका मारुती सुझुकी ओमिनी कारला (क्र. एमएच १५ सीडी ४४९७) थांबवून तपासणी केली असता, त्यात १० हजार १०५ रुपये किमतीची देशी आणि विदेशी दारू आढळून आली. पोलिसांनी दारूसह ५० हजार रुपये



किमतीची कार जप्त केली.

याप्रकरणी पोलिसांनी नवनाथ सुभाष भगरे (३१, रा. सावरगाव, ता. निफाड) याला ताब्यात घेतले आहे. पोलिस शिपाई शिवनाथ शेळके यांनी चांदवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिस हवालदार ए. जी. शिरसाठ या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या कारवाईमुळे चांदवड परिसरात अवैध मद्य वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# येवला नगर परिषदेतर्फे श्वानांचे होणार निर्बीजीकरण

**येवला : प्रतिनिधी**

शहरात मोठ्या प्रमाणावर भटकी श्वानांची संख्या वाढली असून, याबाबत अनेक नागरिकांच्या नगर परिषदेत तक्रारी येत आहे तसेच भटक्या श्वानांचा शहरातील नागरिकांना तसेच शाळकरी मुलांना मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे. येवला नगर परिषदेने भटक्या व पाळीव श्वानांचे निर्बीजीकरण करण्याचा येवला नगर परिषदेने निर्णय घेतला आहे. भटकी श्वानांची संख्या आटोक्यात राहावी याकरिता नगर परिषदेने अनुभवी एजन्सीची नेमणूक केली आहे. आतापर्यंत ९२ श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात आले. नागरिकांनी त्यांच्याकडे असलेल्या पाळीव प्राण्यांची



नोंद नगर परिषदेकडे करावी तसेच श्वानांचे ऑपरेशन थेटरपर्यंत पोहोचण्यासाठी येवला नगर परिषदेत सहकार्य करावे व तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात येईल तसेच निर्बीजीकरण न करणाऱ्या आलेल्या श्वानमालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विखरणी येथे दारुबंदीसाठी महिलांची ग्रामसभा



**येवला : प्रतिनिधी**

तालुक्यातील विखरणी येथे सर्रास दारू विक्री होत असून, तरुणपिढी व्यसनाधीन झाली आहे. जिल्हा परिषद शाळेच्या आजूबाजूला दारू विक्री होत असल्याने लहान मुलांवरही त्याचा परिणाम होत आहे. या विरोधात येथील महिलावर्ग आक्रमक झाल्या. ग्रामपंचायतीच्या सरपंच ज्योती मोहन शेलार यांच्या अध्यक्षतेखाली महिलांची विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती.

ग्रामसभेस येवला तालुका पोलीस निरीक्षक संदीप मंडलिक, पंचायत समितीचे माजी सदस्य मोहन शेलार उपस्थित होते. दारूमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करत गावात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीला आळा घालण्यात यावा, अशी एकमुखी मागणी महिला ग्रामस्थांच्या वतीने तालुका पोलीस निरीक्षक मंडलिक यांच्याकडे करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून अवैधरीत्या दारू विक्री होत असल्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. पोलिसांनी वारंवार कारवाई करूनसुद्धा गावात चोरी छुप्या पद्धतीने दारू विक्री सुरू असल्याचा आरोप महिलांनी केला. दारू विक्री होत असताना व्हिडिओ पाठवा व बक्षीस मिळवा, असा अनोखा ठराव पास करण्यात आला तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीवर कडक कारवाई करण्यात येईल, असा ठराव देखील मंजूर करण्यात आला. या सभेसाठी तालुका पोलिस निरीक्षक संदीप मंडलिक, पंचायत समितीचे माजी सदस्य मोहन शेलार, सरपंच ज्योती शेलार, श्रावण वाघमोडे, तंटामुक्ती अध्यक्ष अशोक कोताडे, राधा पवार, सुभाष शेलार, सुरेखा रोठे, सोपान पगार, मुक्तार दरवेशी, मदिना दरवेशी, चंद्रकला घुमरे, पुष्पा भिलोरे, अनिता खुरसणे, अंबादास पगार, जालिंदर शेलार, सुखदेव शेलार, सम्राट बंदरे, देवाजी बिडगर, दिलावर शहा, नाना बिडगर, सागर शेलार, महेश बिडगर, गजानन घुमरे, अकिल दरवेशी, शकिला दरवेशी, शमीमा दरवेशी, ज्योती बंदरे, रश्मी शेलार, ज्योती आवारे यांच्यासह महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ओझरच्या देवभूमी जनशांती धामात नाथषष्ठीनिमित अभिषेक पूजन

**ओझर : वार्ताहर**

ओझर येथील निष्काम कर्मयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज आश्रमातील देवभूमी जनशांती धाम येथे नाथ षष्ठीनिमित्त शांतिब्रह्म श्री एकनाथ महाराज यांच्या मूर्तीस ब्रह्मवृंदांच्या पवित्र मंत्रघोषात अभिषेक पूजन संपन्न झाले.

कठोर तपस्वी जगद्गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या स्मरणार्थ अनंत विभूषित जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी ओझर येथे लक्षवेधी असे देवभूमी जनशांती धामाचे निर्माण केले आहे. येथे १७५ पेक्षा जास्त देवीदेवतांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. त्यात महाराष्ट्रातील अनेक संतांच्या मूर्तींचीही प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, येथील प्रत्येक मंदिरावर सोन्याचे कळस आहेत. या धामात वर्षभर विविध देवीदेवता व संतांचे उत्सव, पुण्यतिथी, जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरे करण्यात येतात. संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांची पुण्यतिथी (नाथषष्ठी) उत्सवानिमित्त पहाटे ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात श्री संत एकनाथ महाराज यांच्या श्री मूर्तीचे अभिषेक पूजन संपन्न झाले. याप्रसंगी देवानंदगिरी महाराज, दयानंद महाराज (कल्याण), ज्ञानेश्वर (मामा) भुसे, के. टी. काशीद, प्रदीप धोंडगे, पंडित मोरेश्वर शास्त्री जोशी, पंडित निखिल शास्त्री जोशी, बाळासाहेब शेजवळ, सुभाष भडके, जयेश डोमसे, संगीताताई रूमने, सुरेखाताई कांबळे, सिंधुताई खतवडकर आदी उपस्थित होते. यावेळी जय बाबाजी, जय भानुदास, जय एकनाथ महाराज असा जयघोष करण्यात आला. उपस्थित भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले.

# जिल्हा तालीम संघाच्या अध्यक्षपदी ॲड. गोरखनाथ बलकवडे

**पिंपळगाव बसवंत : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा तालीम संघाची निवडणूक दिनांक १६ रोजी भगूर येथे बलकवडे बँकेच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. अध्यक्षपदी छत्रपती पुरस्कारविजेते ॲड. गोरखनाथ बलकवडे, तर महासचिवपदी सुवर्णपदक विजेते उत्तमराव डळवी, तसेच महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या प्रतिनिधीपदी ॲड. गोरखनाथ बलकवडे व प्रा. रवींद्र मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा तालीम संघाची आगामी तीन वर्षांची कार्यकारिणी निवडताना त्यात

**उपाध्यक्षपदी** - बाळासाहेब जाधव, निफाड, वाळू आप्पा नवले, सुरगाणा, सुधाकर. त्र्यंबक पगार, कळवण, शिवाजीराजे फोकणे, इगतपुरी तसेच

**कार्याध्यक्षपदी**- दीपक पाटील, मालेगाव, लालचंद सोनवणे, बागलाण,









दिनकर पाटील, दिंडोरी तसेच सचिवपदी- प्रा. मधुकर वाघ, सिन्नर, लक्ष्मीकांत पाटील, देवळा, नामदेव गवळी, नाशिक, तसेच

**कोषाध्यक्षपदी**- विजय गांगुर्डे, चांदवड, संघटकपदी. राजेंद्र पवार, कळवण, शरद शेवाळे, बागलाण, रामदास बिन्नर, चांदवड, तसेच तांत्रिक कमिटीच्या अध्यक्षपदी- चेतक बलकवडे, भगूर यांची निवड करण्यात आली. जिल्हा संघ जाहीर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा दिनांक २६ ते ३० मार्च २०२५ दरम्यान कर्जत, जि. अहिल्यानगर येथे होणाऱ्या कुस्ती स्पर्धेसाठी खालील पहिलवानांची निवड झाली असून, ते नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

**गादी विभाग**

१) ५७ किलो, आकाश पगारे, (चांदवड) २) ६१ किलो, अनिल सोनवणे, ३) ६५ किलो, बाळू जुंद्रे, (इगतपुरी) ४) ७० किलो, भाऊसाहेब सदगीर, (नाशिक) ५) ७४ किलो, पवन सूर्यवंशी (सिन्नर) ६) ७९ किलो, संदीप बिन्नर, (चांदवड) ७) ८६ किलो, संग्राम गिडगे (नांदगाव) ८) ९२ किलो, विशाल माळी (इगतपुरी) ९) ९७ किलो, आदित्य धिवरे (मालेगाव) १०) केसरी गट- ऋषिकेश दोंदे (नाशिक)

**माती विभाग**

१) ५७ किलो, रोहित परदेशी, (मालेगाव) २) ६१ किलो, पवन ढोसर, (सिन्नर) ३) ६५ किलो, ओम कातोरे (इगतपुरी) ४) ७० किलो, दीपक देवकर (मालेगाव) ५) ७४ किलो, दुर्गेश भोर, (इगतपुरी) ६) ७९ किलो, हरीश पवार (मालेगाव) ७) ८६ किलो, हर्षद तोकडे (इगतपुरी) ८) ९२ किलो, लक्ष दोंदे, (नाशिक) ९) ९७ किलो, अनिल कोकणे, (इगतपुरी) १०) केसरी गट- गौरव देवरे (मालेगाव) वरील पदाधिकारी व कुस्तीगिरांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. कर्जत येथे होणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत जो पहिलवान नाशिक जिल्ह्याला सुवर्णपदक मिळवून देईल त्याला सिन्नर तालुका तालीम संघाच्या वतीने ११,०००/- रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल, अशी घोषणा डळवी यांनी केली आहे.



ओझर हॉस्पिटलमध्ये महाआरोग्य शिबिरात मोफत आरोग्य तपासणीसाठी नागरिकांची झालेली गर्दी.

# ओझरला महाआरोग्य शिबिरात ६४८ जणांची तपासणी

**ओझर : वार्ताहर**

येथील ओझर हॉस्पिटलतर्फे सर्व वयोगटातील नागरिकांसाठी आयोजित मोफत महाआरोग्य शिबिरास ओझरकर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात एकुण ६४८ नागरिकांची विविध आरोग्य तपासणी करण्यात आली.


महाआरोग्य शिबिरात नागरिकांच्या बीपी, इसीजी, पीएफटी, एक्स-रे, बीएसएल, एचबीए वन सी, यूरिक ॲसिड नेत्रतपासणी, रक्त तपासणी आदी ११ तपासण्या मोफत करण्यात आल्या. त्यामध्ये शिबिरात डॉ. रवींद्र कदम (बालरोगतज्ज्ञ), डॉ. प्रांजल मकरंदे (मधुमेह व हृदयरोगतज्ज्ञ), डॉ. संकल्प मकरंदे (अस्थिरोग व सांधेरोपणतज्ज्ञ), डॉ. पंकज सूर्यवंशी (अतिदक्षता विभाग तज्ञ), डॉ. अपूर्वा मानकर (नेत्ररोगतज्ज्ञ ), डॉ. जयश्री सूर्यवंशी (आयुर्वेद व पंचकर्म तज्ञ), डॉ. श्रुतिका शेलार (फिजिओथेरपिस्ट) आदींनी रुग्णांची तपासणी करून मोफत सल्ला देत मार्गदर्शन केले.

शिबिराप्रसंगी नावनोंदणी केल्यानंतर रुग्णाला पाहिजे त्या विभागात तपासणीसाठी पाठविण्यात येत होते. अतिशय शिस्तबद्ध व शांततेत शिबिर संपन्न झाले.

ओझर येथे एखाद्या शिबिराला इतक्या मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद हा एक उच्चांक या शिबिराच्या निमित्ताने ओझर हॉस्पिटल आयोजित महाआरोग्य शिबिरात केला आहे. ओझरकर नागरिकांनी शिबिराला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल डॉ. प्रशांत टर्ले यांच्यासह संचालक मंडळाने आभार मानले.

# चांदवड बसस्थानकातील शौचालयात बेशुद्ध पडून महिलेचा मृत्यू

**चांदवड : वार्ताहर**



चांदवड बसस्थानकातील शौचालयात बेशुद्ध पडून राजदेरवाडी येथील २३ वर्षीय सुवर्णा राकेश यशवंते या महिलेचा मंगळवारी दि. १८ रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास मृत्यू झाल्याची घटना घडली. याबाबतची खबर मृत महिलेचा दीर राहुल भाऊसाहेब यशवंते (रा. राजदेरवाडी) यांनी चांदवड पोलिसांत दिली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नातेवाइकांनी रुग्णालयात गोंधळ घातल्याने तणाव निर्माण झाला होता.

मिळालेल्या माहितीनुसार सुवर्णा यशवंते यांची तब्येत बरी नसल्याने त्यांना त्यांचे पती राकेश आणि सासू सरुबाई यांनी उपचारासाठी चांदवड येथे आणले होते. यावेळी आई सरुबाई व पती सुवर्णा यांना बसस्थानकावर सोडून राकेश पैसे काढण्यासाठी बँकेत गेला असता, सुवर्णा बस स्थानकातील शौचालयात गेली. बराच वेळ होऊनही त्या न परतल्याने पती राकेश हा सुवर्णाला बघण्यासाठी बस स्थानकातील बाथरूमकडे गेला असता त्याला बाथरूमचे दार आतून लावलेले असल्याचे आढळले. काही वेळ वाट पाहूनही दार न उघडल्याने राकेश याने बसस्थानकातील वाहतूक नियंत्रक व सफाई कर्मचारी यांना बोलावून बाथरूमचे दार तोडले असता, त्या बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्या. तात्काळ त्यांना खासगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. उत्तरीय तपासणीसाठी महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी चांदवड उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. मात्र, शवविच्छेदनास विलंब झाल्यामुळे नातेवाइकांनी रुग्णालयात गोंधळ घातला आणि तणाव निर्माण झाला. यावेळी पोलीस निरीक्षक कैलास वाघ, एपीआय आखेगावकर, पोलीस कर्मचारी यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. शवविच्छेदन दुसऱ्या दिवशी सकाळी करण्यात आले आणि मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. राजदेरवाडी येथे महिलेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी चांदवड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलिस हवालदार स्वप्नील जाधव या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## महत्त्वाचे

### लघुउद्योग भारती शाखेतर्फे जीएसटी कर्जमाफी योजना विषयावर चर्चासत्र

**नाशिक : प्रतिनिधी**



उद्योगवृद्धीतून राष्ट्रवृद्धी या उपक्रमांतर्गत १६ व्या भागात जीएसटी कर्जमाफी योजना या विषयावर माहितीपर चर्चासत्र गुरुवार, २० रोजी आयोजीत केले होते. कार्यक्रम नामको बँक लि., ट्रेनिंग हॉल, सातपुर येथे संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर अनुश्री हर्डीकर, अतिरिक्त कमिशनर, केंद्र जीएसटी नाशिक, निखिल तापडिया, अध्यक्ष लघु उद्योग भारती, उर्वीश जोशी उद्योगवर्धन समन्वयक नाशिक उपस्थित होते. प्रारंभी निखिल तापडिया यांनी लघु उद्योग भारतीचे कार्य, राबविले जाणारे उपक्रम, भविष्यातील वाटचाल या विषयी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुप्रिया देवघरे यांनी केले तर आभार सुजाता बच्छाव यांनी व्यक्त केले. अनुश्री हर्डीकर यांच्याशी देवेंद्र बेलन, सी.ए. यांनी या विषयावर चर्चात्मक संवाद साधला. याप्रसंगी उपस्थित उद्योजकांच्या या संदर्भातील प्रश्नांचे हर्डीकर यांनी समाधान केले. याप्रसंगी ज्येष्ठ उद्योजक सुहास वाणी, नलिनी कुलकर्णी' विजय अनिकीवी यांच्यासहित अनेक नामवंत उद्योजक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उर्वीश जोशी समन्वयक, उपाध्यक्ष अविनाश मराठे, देवेन गोसावी, प्रशांत कुलकर्णी, ख्याती उपाध्याय व लघुउद्योग भारती नाशिकचे पदाधिकारी, कार्यकारिणीने परिश्रम घेतले.

### कपालेश्वर मंदिरातील दोन पेट्यांमध्ये ३ लाख ४९ हजार



**पंचवटी : वार्ताहर**

संस्थान श्री कपालेश्वर महादेव मंदिराच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त मोठ्या प्रमाणात दानपेट्यांमध्ये जमा झालेले दान व रंगपंचमीमुळे दान रक्कम खराब होऊ नये म्हणून धर्मादाय उपआयुक्त यांच्या न्यायालयात दानपेट्यांची मोजणी करण्याचा अर्ज करण्यात आला होता. त्यानुसार मा. धर्मादाय उपआयुक्त साहेब यांच्या आदेशान्वये आज दि.२० मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता मंदिरातील पहिल्या व दुसऱ्या पेट्यांमधील रक्कम मोजण्यात येऊन ३ लाख ४९ हजार ७७ रुपये इतके जमा झाले आहेत. तर तिसऱ्या दानपेटीतील रक्कम २६ मार्च रोजी मोजण्यात आहे. यावेळी धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षक विलास बी. पाटील व नंदकुमार राऊत यांच्या निरीक्षणाखाली दानपेट्यांचे सील उघडण्यात येऊन पहिली व दुसरी दानपेटी ही मोजणी करून पुन्हा सील करण्यात आली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष ॲड. अक्षय कलंत्री, सचिव रावसाहेब कोशिरे, खजिनदार श्रीकांत राठी, व्यवस्थापक सुनील शिनगाण, गोकुळ शेवाळे, कविता मांडगे, आशा केदारे, गुरव प्रतिनिधी अनिल भगवान, देवस्थान समिती समन्वयक ऋषी डोगमाने, तनिष्क कोशिरे आदी उपस्थित होते. सदरील दोन्ही दानपेट्यांची मोजणी ८ तासांच्या विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली. दानपेटी क्र.१ मध्ये एकूण २ लाख ७८ हजार ५९७ तर दानपेटी क्र. २ मध्ये एकूण ७० हजार ४८० रुपये प्राप्त झाले आहेत. तिसऱ्या दानपेटीची मोजणी दिनांक २६ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता सुरू करण्यात येणार आहे.

### शिंदे येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात कार्यशाळा



**शिंदे : प्रतिनिधी**

येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये धूलिवंदन व रंगपंचमीनिमित्त नैसर्गिक साहित्याचा वापर करून नैसर्गिक रंग निर्मितीची कार्यशाळा घेण्यात आली. विद्यालयाच्या प्राचार्या एस. आर. वाळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कलाशिक्षक सालीक पटेल व जाट यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक देसाई, विजय बडे, एस. डी. जाधव, सालिक पटेल, जाट, देवरे, गोविंद यांनी परिश्रम घेतले.

### दरोड्यातील फरार म्होरका सात वर्षांनंतर जेरबंद



**शिलापूर :** सात वर्षांपासून फरार असलेल्या दरोडेखोर टोळीचा म्होरक्यास नाशिकरोड रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नाशिकरोड रेल्वे स्टेशन येथे गुन्हा दाखल झालेला होता. या गुन्ह्यामध्ये सात आरोपी यापूर्वीच अटक करण्यात आले होते. परंतु गुन्ह्यांतील म्होरक्या सुरेश काळे रा. आरोळी वस्ती, जामखेड जिल्हा अहिल्यानगर हा सात वर्षांपासून फरार होता. सहायक फौजदार संतोष उफाडे पाटील यांनी गुप्त माहितीवरून त्यास ताब्यात घेऊन अटक केली. पोलीस अधीक्षक स्वाती भोर, उपअधीक्षक सूर्यकांत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सचिन बनकर, पीएसआय सोनवणे,तपास पथकाचे प्रमुख सहायक फौजदार संतोष उफाडे पाटील, धनंजय नाईक, शैलेश पाटील, राज बच्छाव, सुभाष काळे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# ..तर रुग्णालयाचा परवाना रद्द

## नियमांचे उल्लंघन; मनपाच्या ४५ रुग्णालयांना नोटिसा

**नाशिक : प्रतिनिधी**

खासगी रुग्णालयाकडून रुग्णांच्या नातेवाइकांची अनेकदा आर्थिक पिळवणूक होत असल्याचे आरोप होत असतात. या प्रकाराला चाप लावण्यासाठी रुग्णालयांनी दर्शनी भागात दरपत्रक व रुग्णहक्क सनद प्रवेशद्वाराच्या बाजूलाच लावण्याचे निर्देश आहेत. मात्र, याकडे शहरातील खासगी रुग्णलयांकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याचे समोर येतात.

दरम्यान, याप्रकरणी मनपाचा आरोग्य विभागाकडून शहरातील खासगी रुग्णालयांची तपासणी केली. यावेळी ४५ रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्क सनदसह दरपत्रक लावलेच नसल्याचे निदर्शनास आले आहे.

याप्रकरणी महापालिकेने संबंधित रुग्णालयांना नोटीस बजावत दहा दिवसांच्या आता नियमांचे पालन करण्याचा अल्टीमेट दिला आहे. अन्यथा थेट रुग्णालयाचे परवाने रद्दचा इशारा देण्यात आला आहे.

मनपाच्या आरोग्य विभागाच्या पथकाने शहरातील ५%१ रुग्णालयांची तपासणी केली. स्वच्छता, रुग्णसेवा, परवाने, वैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट, अग्निसुरक्षेच्या उपाययोजनांची तपासणी केली. या तपासणीत ४५ रुग्णालयांनी नियम पायंदळी तुडवल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आरोग्य विभागाने संबंधित रुग्णांना अंतीम नोटीस देत ३१ मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शुश्रूषा अधिनियम सुधारित २०२१ नुसार खासगी रुग्णालयांनी रुग्णालयाच्या दर्शनी भागात रुग्णालयाचे दरपत्रक व रुग्ण हक्क सनद लावणे बंधनकारक आहेत. मात्र, शहरातील ९० टक्के रुग्णालयांत या नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप सतत केले जातात. महापालिकेने यापूर्वी शहरातील ५८० खासगी रुग्णालयांना याबाबतची सूचनापत्रे पाठवून दरपत्रक लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. करोनाच्या दुसऱ्या लाटेत खासगी रुग्णालयांकडून रुग्णांची लूट करुन त्यांचे आर्थिक शोषण केल्याच्य अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

दरम्यान नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. परवाने निलंबित करणे, रुग्णालये बंद करण्याबरोबरच कायदेशीर कारवाईचे अधिकार मनपाला आहे. आरोग्य विभागाच्या पाहणीत

> सहा महिन्यांनी खासगी रुग्णालयांची तपासणी केली जाते. यात नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.
>
> **- डॉ. तानाजी चव्हाण,** वैद्यकीय अधिकारी, मनपा

२% रुग्णालयांमध्ये ठळक आरोग्यसंहिता लावलेली नाही. रुग्णालयाच्या दर्शनी भागात संहिता लावणे बंधनकारक आहे. तर ६ रुग्णालयांकडे पर्यावरणाचा दाखला नूतनीकरण प्रमाणपत्र अद्ययावत नाही. ६ रुग्णालयांचे फायर ऑडिटच झालेले नाही. अग्निसुरक्षेच्या उपाययोजना करणे आवश्यक असल्याने सदर परवानगी घेणे बंधनकारक आहे. याप्रकरणी आरोग्य विभागाने संबंधितांना नोटिसा बजावल्या आहेत.

# नाशिक शहरात शनिवारी पाणीबाणी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक शहराचा शनिवारी (दि.२२) संपूर्ण दिवसाचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच रविवारी (दि.२३) सकाळी कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे नाशिककरांना दोन दिवस पाणी वापरण्यासाठी कसरत करावी लागणार आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून शहरातील पाणीपुरवठा वारंवार खंडित केला जात असल्याचे चित्र असून, यामुळे मात्र नागरिकांचे हाल होत आहेत.

नाशिक स्मार्ट सिटी अंतर्गत नाशिक शहरामधील विविध जलशुद्धीकरण केंद्र व जलकुंभ येथे स्काडा प्रणाली बसविण्याचे काम प्रगतीपथावर असून, त्याअनुषंगाने पंचवटी जलशुद्धीकरण केंद्र व विविध जलकुंभ (पाण्याच्या टाक्या) येथे २२ मार्च रोजी करावयाच्या विविध कामाच्या अनुषंगाने शटडाऊन नियोजित केलेले आहे.

तसेच पाणीपुरवठा विभागातील विविध ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य वितरण वाहिन्या तसेच उपवितरण वाहिन्यांची दुरुस्ती तसेच व्हॉल्व्हची दुरुस्ती, व्हॉल्व्ह बदलणे इत्यादी देखभाल दुरुस्तीचे काम आवश्यक आहे. त्यामुळे संपूर्ण नाशिक महानगरपालिका क्षेत्रात शनिवार २२ मार्च रोजीचा संपूर्ण दिवसाचा पाणीपुरवठा होऊ शकणार नाही व रविवार सकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

दरम्यान, शहरातील सिडकोसह पाथर्डी परिसरात नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या समस्येचा सामना करावा लागतो आहे. त्यातच शनिवारी व रविवारी पाणीपुरवठा होणार नसल्याने नागरिकांना पाणीबाणी परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे.

# तत्कालीन आयुक्तांच्या मर्जीने शिक्षकांच्या बदल्या

## समायोजन प्रकरणात शिक्षणाधिकारी पाटील यांना वरदहस्ताची चर्चा

**नाशिक : प्रतिनिधी**



वादग्रस्त ५५ कोटींच्या भूसंपदनावरून आरोप झालेले तत्कालीन आयुक्त डॉ. अशोक करंजकर आता शिक्षक समायोजन बदल्यांवरून चर्चेत आले आहे. अतिरिक्त आयुक्तांच्या स्वाक्षरी आवश्यक असताना त्यांना बाजूला करून थेट तत्कालीन आयुक्त करंजकरांनी शिक्षक समायोजनच्या फाईलींवर स्वाक्षऱ्या केल्याचे समजते आहे. त्यामुळे डॉ. करंजकर अडचणीत येण्याची शक्यता आहे.

विधिमंडळाच्या निर्देशानुसार जी चौकशी समिती नेमली आहे, त्या समितीकडून करंजकरांना चौकशीसाठी बोलवले जाऊन त्यांचा जबाब नोंदवला जाण्याची शक्यता आहे. मात्र, आता शिक्षक समायोजन प्रकरणात शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांना करंजकरांचाच वरदहस्त असल्याने नियम धाब्यावर बसवून शिक्षक बदल्या केल्याची जोरदार चर्चा पालिका वर्तुळात रंगली आहे.

दरम्यान, शिक्षक समायोजन प्रक्रियेत अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रदीप चौधरी यांची स्वाक्षरी घेऊनच पुढील प्रक्रिया होणे अपेक्षित होते. मात्र शिक्षण विभागाने तसे केले नाही. मुळात शिक्षण विभागाचे कामकाज अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी (शहर) यांच्या अंतर्गत येते. प्रक्रियेनूसार समायोजनची फाईल मंजुरीसाठी शिक्षणाधिकारी बी. टी.पाटिल यांच्याकडून अतिरिक्त आयुक्त चौधरी यांच्याकडे येणे अपेक्षित होते. त्यांच्या स्वाक्षरीनंतर अंतिम मंजुरीसाठी फाइल आयुक्त डॉ. करंजकर यांच्याकडे जाणे अपेक्षित होती. मात्र, समायोजन फाईल्स मंजुरीचा प्रवास अतिरिक्त आयुक्त चौधरी यांना बाजूला करुन झाला. करंजकर यांनी पाटील यांच्याकडून थेट फाईल्स मागवत स्वाक्षरी केल्या. त्यामुळे एकप्रकारे नियम डावलत ही प्रक्रिया पार पाडल्यामुळे डॉ. करंजकर यांच्यावर संशय बळावला आहे. चौकशी समितीच्या तपासणीत हा मुद्दा समोर आला आहे. दरम्यान, आवश्यकता वाटल्यास चौकशी समिती करंजकर यांनाही चौकशीला बोलावू शकते. मनपा शिक्षण समायोजन प्रक्रियेतील सावळ्या गोंधळाची अतिरिक्त आयुक्तांकडून चौकशी सुरू असून, पंधरा दिवसांत अहवाल द्यायचा आहे. महापालिकेतील शाळांमध्ये जिल्हा परिषद व इतर असे एकूण ५२ शिक्षकांचे समायोजन नियम डावलून झाले व त्यात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आहे. शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी विधान परिषदेत लक्षवेधी मांडली असता मंत्री उदय सामंत यांनी अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमत पंधरा दिवसांत चौकशी अहवाल सादर करा, असे आदेश दिले. त्यानूसार चौकशी सुरू असून, मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांचे अधिकार काढून घेत त्यांना कार्यमुक्त केले. तसेच त्यांनी नेमलेल्या केंद्रप्रमुखांची नियुक्ती रद्द करत जोरदार दणका दिला. परंतु चौकशी पुढे सरकत असताना या प्रकरणाचे नवे धागेदोरे समोर येत असल्याचे समजते. या प्रकरणात माजी आयुक्त डॉ. करंजकर यांचे नाव समोर येत असल्याने हा चर्चेचा विषय झाला आहे.

# उपायुक्तांवर हप्तेखोरीचे आरोप करणाऱ्या कर्मचाऱ्याचा घूमजाव

## मानसिक स्वास्थ्य ठीक नसल्याचे कारण

**नाशिक/सिडको : प्रतिनिधी**



अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. मयूर पाटील आपल्याकडून दर महिन्याला दहा हजार रुपये, कोंबडी, बोंबील, सूरमई मासे, ताजी फळे व भाजीपाला मागत असल्याचा गंभीर आरोप सिडको विभागीय कार्यालयातील कर्मचारी राजेंद्र उगले यांनी केल्यानंतर महापालिका वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान, चोवीस तास होत नाही तोच या अधिकाऱ्याने यूटर्न घेत आपले मानसिक स्वास्थ ठीक नसल्याचे सांगत त्यांनी याप्रकरणी पाटील यांच्यावरील केलेले आरोप चुकीचे असून, याप्रकरणी आपण माफी मागत असल्याचे सांगितले.

मंगळवारी सिडको विभागाच्या विभागीय अधिकारी जयश्री बैरागी यांच्यासमोर उपायुक्त पाटील यांच्यावर उगले यांनी गंभीर आरोप करून एकच खळबळ उडवून दिली होती. मात्र, उगले यांच्याबाबतच नागरिकांच्या अनेक तक्रारी असल्याने त्यांची बदली केल्याच्या रागातूनच त्यांनी हे आरोप केल्याचे उपायुक्त पाटील यांनी म्हटले होते. तसेच आपण कधीही कोणाकडून काहीही मागितले नसल्याचे सांगत उगले यांचे आरोप फेटाळून लावले होते. अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांकडून हप्ते वसुलीबाबत अनेकदा दबक्या आवाजात चर्चा होते. परंतु कर्मचाऱ्यानेच वरिष्ठांवर आरोप केल्याने अतिक्रमण विभाग ढवळून निघाला होता. याप्रकरणी उगले यांनी माफी मागितली असली तरी शहरातील शालिमार, सीबीएस, मेनरोड, नाशिकरोड, सिडको आदींसह परिसरात अतिक्रमण विभागातील काही कर्मचारी फुटपाथवरील अतिक्रमणधारकांकडून हप्ते वसुली करत असल्याचे आरोप अनेकदा केल जातात. त्यामुळे याप्रकरणी चौकशीची मागणी होते आहे.

> **हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच!**
>
> रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या पथविक्रेत्यांकडून मनपा कर्मचाऱ्यांकडून रुपये वीस रुपये रोज घेतले जातात. परंतु पैसे भरल्याची पावती दिली जात नाही. यासंदर्भात विभागीय अधिकारी यांच्या निदर्शनात आणूनही संबंधित कर्मचाऱ्यावर कुठलीही कारवाई होत नाही. उलट त्याच ठिकाणी त्या कर्मचाऱ्याला पाठवले जाते. जे व्यवसाय करतात त्यांना पथविक्रेता लायसन्स दिलेले नाही व जे व्यवसाय करत नाही अशा व्यक्तींना महानगरपालिकेने पथविक्रेता लायसन दिलेले असल्याचे आरोप होत आहेत. याप्रकरणी देखील सखोल चौकशीची मागणी होते आहे. रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांकडून लूट सुरू असून, पैसा पालिकेच्या तिजोरीत न जाता काहींच्या खिशात असल्याचेही आरोप होत आहेत.

# अवैध गर्भपात प्रकरणी हलगर्जीचा ठपका

## आरोग्याधिकारी डॉ. चव्हाणांच्या चौकशीचे आदेश

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेचे शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांची शिक्षक समायोजन प्रकरणात चौकशी सुरू असताना आता आरोग्याधिकारी डॉ. तानाजी चव्हाण यांच्याही चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. शहरातील गंगापूररोडवरील पंड्या रुग्णालयात गर्भलिंगनिदान होत असल्याच्या संशयावरून आरोग्य पथकाने केलेल्या कारवाईत हलगर्जी केल्याचा आरोप शिंदे सेनेच्या आ. मनीषा कायंदे यांनी लक्षवेधीद्वारे केला आहे. त्यानुसार डॉ. चव्हाण यांच्यासह सहायक आरोग्याधिकारी डॉ. प्रशांत शेटे यांची चौकशी केली जाणार आहे.

याबत माहिती अशी की, गंगापूररोड परिसरात डॉ. पंड्या रुग्णालय गेल्या ३० वर्षांपासून अनधिकृत असल्याचा दावा पालिकेने केला होता. महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडे या रुग्णालयाची नोंदणीच नसल्याची बाब समोर आली होती. तसेच महापालिकेने टाकलेल्या धाडीत रुग्णालयात अवैधरीत्या गर्भपात करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचे १८ कीट सापडले.

विशेष म्हणजे रुग्णालयातील फ्रीज, कपाटाची लॉकर यात अवैध गर्भपाताच्या गोळ्या आढळून आल्याने खळबळ उडाली होती. शिवाय या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या कोणत्याही नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत. १९९४ पासूनच्या गर्भपाताच्या नोंदी असल्या तरी रुग्णांचे मात्र रेकॉर्डच नसल्याचे समोर आले आहे. सन १९९२-९३ पासून रुग्णालय सुरू आहे. याप्रकरणी डॉ. पंड्या यांच्यावर गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेनंतर शहरातील अवैध गर्भपात केंद्राचा मुद्दा समोर आला होता. याप्रकरणी महापालिकेने हलगर्जीपणा केल्याचा आरोप विधिमंडळात उपस्थित केलेल्या लक्षवेधीत मांडण्यात आला आहे. ज्यावेळी मनपाच्या पथकाने पंड्या रुग्णालयावर कारवाई केली, त्या पथकात वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण, सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत शेटे, वरिष्ठ शल्यचिकित्सक डॉ. नितीन रावते, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रिना काळदाते, भूलतज्ज्ञ डॉ. स्नेहल भट, डॉ. गौरी करर्दीकर, डॉ. अजिता साळुंखे आदींसह होते. मात्र, मनपाच्या पथकाने छापा टाकत कारवाई करताना त्यावेळी हलगर्जी केल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाच्या आ. मनीषा कायंदे यांनी विधिमंडळात करत डॉ. चव्हाण यांच्या चौकशीची मागणी केली आहे. याप्रकरणी आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी डॉ. चव्हाण यांच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

# एसटीपी प्रकल्प, मलजल वाहिन्यांसाठी खा. वाजेंची बॅटिंग

## संसदेत पाणीप्रश्न पेटला; केंद्र सरकारवर प्रश्नांची सरबत्ती

**नाशिक : प्रतिनिधी**



जलशक्ती मंत्रालयाच्या २०२५-२६ साठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीबाबत लोकसभेतील चर्चासत्राच्या दरम्यान नाशिकचे खा. राजाभाऊ वाजे यांनी नाशिकसह महाराष्ट्राचा पाणीप्रश्न पेटवला. नाशिक शहरात बुधवारी (दि. १९) रंगपंचमीचा उत्साह साजरा होत असताना संसदेत पाणीप्रश्न पेटल्याचे बघायला मिळाले. नदीजोड प्रकल्प, जलसंधारण, गोदावरी प्रदूषण ते नाशिक शहराचे प्रलंबित आणि बहुप्रतीक्षित एसटीपी प्रकल्प, मलजलवाहिन्या आदींबाबत खा. वाजे यांनी तडाखेबंद भाषण करत केंद्र सरकारवर प्रश्नांची सरबत्ती केली.

संसदेत खा. राजाभाऊ वाजे बोलताना म्हटले की, पाण्याची शेती आणि उद्योगासाठीचे महत्त्व विशद करताना जलसिंचन, नदी पुनर्जीविकरण, शुद्ध पाणी पुरवठा, भूजल पुनर्भरण आदी संबंधीच्या योजनांबाबत विस्तृत भाष्य केले. यासाठीच्या योजनांची अंमलबजावणी योग्यरीत्या व्हावी याकरिता सरकारने विशेष लक्ष द्यावे. महाराष्ट्र हे कृषी क्षेत्रातील प्रगतिशील राज्य असले तरी राज्यात केवळ २३ टक्के क्षेत्र सिंचनाखाली असल्याचे नमूद करतानाच पश्चिम भागात वाहून जाणारे पाणी वळवून नदीजोड प्रकल्पांना केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने गती देण्याची मागणी खा. वाजे यांच्याकडून करण्यात आली.

या अनुषंगाने केंद्र सरकारने महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांना राष्ट्रीय प्रकल्प घोषित करून केंद्राने त्यासाठी ९० टक्के निधी उपलब्ध करून द्यावा, अशी देखील मागणी करण्यात आली. गोदावरी प्रदूषणावर बोलताना खासदार राजाभाऊ वाजे यांनी शहरातील तब्बल २९हून अधिक मलजलवाहिन्यामधून वाहणारे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता सरळ गोदावरीत सोडले जात असल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून देतानाच, शहरातील मलनिस्सारण केंद्रांची (एसटीपी) तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता असून, नव्याने मखमलाबाद आणि कामटवाडे येथे नवीन मलनिस्सारण केंद्र उभारण्याची गरज असल्याचं नमूद केलं. तसेच, औद्योगिक प्रदूषित पाण्यावर पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अत्याधुनिक सीईटीपी प्रकल्प उभारण्याची देखील मागणी यावेळी करण्यात आली. यासाठीचा आवश्यक असलेला ९०३ कोटींचा निधी केंद्र सरकारने तात्काळ वितरित करावा, अशी विनंती खा. वाजे यांनी केली.

> **राष्ट्रीय प्रकल्प करण्याची मागणी**
>
> - **दमनगंगा, एकदरे - गोदावरी लिंक : नाशिकच्या विकासासाठी अतिरिक्त ५ टीएमसी पाणी मिळून, मराठवाड्याचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात येईल.**
> - **गारगाई, वैतरणा, कडवा, देवनदी लिंक : सिन्नर व उत्तर अहिल्यानगरच्या दुष्काळमुक्तीसाठी विशेष महत्त्वपूर्ण.**
> - **वैनगंगा, नळगंगा लिंक : विदर्भातील पाणीप्रश्नावर मात करणे होणार शक्य.**
> - **नार-पार, गिरणा लिंक : कसमादे, जळगाव आणि उत्तर मराठवाड्याचा भाग बागायती होण्यास मदत.**

> **भूजलपातळी होतेय कमी**
>
> देशातील अनेक भागात भूजल पातळी धोकेदायक स्थितीत पोहचली असून, काही भागात भूजल नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. अशा स्थितीत अटक भूजल योजनेची प्रभावी अंमलबजावणी होऊन त्यासाठी नवीन तंत्र विकसित करण्यावर भर द्यावा तसेच शेतकऱ्यांना कमी पाणी वापर करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. तसेच भूजल उपसा नियंत्रणात यावा यासाठी कठोर कायदे असावेत, अशी देखील मागणी यावेळी खासदार राजाभाऊ वाजे यांनी केली.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक



« अवैध मद्य वाहतूकप्रकरणी एकावर गुन्हा
« पान ६

# गांवकरी

» ओझरला महाआरोग्य शिबिरात ६४८ जणांची तपासणी
» पान ६



■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५


# नाशिक बाजार समितीवर अखेर भाजपचा झेंडा

## सभापतिपदी कल्पना चुंभळे बिनविरोध : ७३ वर्षानंतर महिलेला संधी

**पंचवटी : वार्ताहर**

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती देवीदास पिंगळे यांच्याविरोधात अविश्वास ठराव मंजूर झाल्यानंतर नवीन सभापती निवडीसाठी बुधवारी (दि.१९) सभा पार पडली. बाजार समिती स्थापन झाल्यानंतर बाजार समितीच्या ७३ वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिला सभापतिपदाचा मान कल्पना चुंभळे यांना मिळाला. तर भारतीय जनता पक्षाचे संकटमोचक गिरीश महाजन यांच्या खेळीने अखेर भारतीय जनता पक्षाचा झेंडा बाजार समितीवर फडकला. सभापती निवडीनंतर चुंभळे समर्थकांनी गिरीश महाजन यांच्या नावाने घोषणा देत गुलाल उधळून व फटाक्यांची आतषबाजी करून डीजेच्या तालावर ठेका धरला.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती देवीदास पिंगळे यांच्यावर अविश्वास ठराव दाखल केल्यानंतर ठराव १५/० ने मंजूर करण्यात आला. त्यानंतर पुन्हा शिवाजी चुंभळे यांच्यासमवेत गेलेले सहलीवर गेलेले संचालक सभेच्या पूर्वसंध्येला मंगळवारी (दि.१८) नाशिकमध्ये दाखल झाले. बुधवार (दि.१९) रोजी बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीत सकाळी ११ वाजता प्राधिकृत अधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली व बाजार समितीचे सचिव प्रकाश घोलप यांच्या उपस्थितीत सभापतिपदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. सभेस सर्व संचालक उपस्थित होते.

सभा सुरू झाल्यानंतर काही वेळातच मावळते सभापती देवीदास पिंगळे यांनी संचालकांनी गद्दारी केल्याचा आरोप करीत निवडणूक प्रक्रियेवर बहिष्कार टाकत आपल्या सोबतचे उत्तम खांडबहाले आणि निर्मला कड या दोन संचालकांसोबत सभागृहाच्या बाहेर निघून गेले. कल्पना चुंभळे यांनी सभापतिपदासाठी तीन अर्ज दाखल केले होते. ते तीनही अर्ज वैध झाले. त्यानंतर त्यांनी दोन अर्ज मागे घेतल्याने निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. मंगरुळे यांनी कल्पना चुंभळे यांची सभापतिपदी निवड झाल्याचे जाहीर केले.



पंचवटी : सभापतिपदी कल्पना चुंभळे विराजमान झाल्यानंतर जल्लोष करताना संचालक. (छाया : सुनील बुनगे)

### नूतन सभापती अन् संचालक उवाच...

१) गिरणारे, शिंदे, पळसे या उपबाजार समितींसाठी विशेष तरतूद केली जाणार.
२) बाजार समिती परिसरातील स्वच्छतागृहांची दुरुस्ती, नागरिकांसाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था. हरसूल आणि त्र्यंबकेश्वर बाजारांचा विकास. या दुर्लक्षित बाजारांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणार.
३) पारदर्शक कारभार ठेवत बाजार समिती भ्रष्टाचारमुक्त करण्याचा निर्धार.
४) नाशिक रोड मार्केटचा विस्तार करत व्यापारी आणि ग्राहकांसाठी अधिक चांगल्या सुविधा निर्माण करणार.
५) खत प्रकल्प रद्द करून, बाजार समितीवर आर्थिक भार टाकणारा खत प्रकल्प सर्वानुमते रद्द करण्याचा निर्णय.
६) महिला सक्षमीकरण- पहिल्यांदाच महिला सभापतीची निवड; व्यापारी व महिलांसाठी भयमुक्त वातावरण निर्माण करणार.
७) पेठ तालुक्यात नवीन मार्केट -शेतकऱ्यांच्या सोयीसाठी नवीन मार्केटचा प्रस्ताव मांडणार.
८) जागतिक दर्जाची बाजार समिती-आधुनिक सुविधांसह नाशिक बाजार समितीला जागतिक स्तरावर नेण्याचे लक्ष्य.

त्यानंतर बाजार समितीच्या आवारात रंगपंचमी साजरी करीत चुंभळे गट रंगात चिंब झाला. तर पिंगळे गटाच्या नऊ संचालकांनी पिंगळे यांच्या मनमानी अन् हुकूमशाही कारभाराचा दाखला देत एकप्रकारे उठाव करत सत्तांतर घडविण्याचे काम केले आहे. यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी सभापती कल्पना चुंभळे, संचालक शिवाजी चुंभळे, राजाराम धनवटे, प्रल्हाद काकड, धनाजी पाटील, तानाजी करंजकर या संचालकांसह पिंगळे यांच्या गटातून निवडून आलेले ज्येष्ठ संचालक संपतराव सकाळे, उपसभापती विनायक माळेकर, युवराज कोठुळे, भास्कर गावित, जगन्नाथ कटाळे, सविता तुंगार, चंद्रकांत निकम, जगदीश अपसुंदे, संदीप पाटील आदींसह समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

❛ बाजार समितीचा विकास करणार आहे. शेतकरी, हमाल, मापारी, आडते वर्गाला सोबत घेऊन कामकाज करू. पेठ, गिरणारे उपबाजार समितीचा जागा घेऊन, ज्या मतदारांनी निवडून दिले त्यांना न्याय देणार आहे.

- **विनायक माळेकर,** उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती

❛ बाजार समितीच्या पहिल्या महिला सभापतीचा मान मिळाल्यानंतर कल्पना चुंभळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे आणि भाजप संकटमोचक गिरीश महाजन यांचे आभार व्यक्त केले. यावेळी शेतकऱ्यांना न्याय देण्याबरोबरच महिलांना सुविधा उपलब्ध करण्यात येतील तसेच पिंगळे यांच्या कार्यकाळातील भ्रष्ट कारभाराची चौकशी करून, दोषींवर कारवाई करणार आहे. बंद पडलेली स्वच्छतागृह सुरू करणार आहे. पाणपोई सुरू करून वाहनतळाचा प्रश्न मार्गी लावणार आहे. तसेच पद गेल्यावर पत राहत नाही. त्यामुळे बिनबुडाचे आरोप केले जातात.

- **कल्पना शिवाजी चुंभळे,** नवनिर्वाचित सभापती, नाशिक बाजार समिती

❛ नाशिक बाजार समितीत ३० ते ३५ वर्षे कारभार करताना शेतकरी हिताचे निर्णय घेतले आहे. हमाल, व्यापारी, मापारीसह सर्वच घटनांना न्याय दिला आहे. आपल्यावर चुकीचे आरोप सुरू आहे. केवळ आर्थिक कारणाने माझ्या नावावर निवडून आलेल्या संचालकांनी माझ्यासह ज्या मतदारांनी त्यांना निवडून दिले, त्यांच्यासोबत गद्दारी केली आहे. माझ्या मते, सर्व चुकीच्या प्रवृत्तीचे लोक एकत्र आले आहेत. त्यांच्या चुकीच्या आर्थिक प्रस्तावाला नकार दिल्याने संचालक हे चुंभळे गटात गेले. भविष्यात नावारूपास असलेली बाजार समिती डबघाईस जाण्याची शक्यता आहे.

- **देवीदास पिंगळे,** माजी सभापती

### पिंगळे यांचे ९ संचालक लावले गळाला

बाजार समितीचे माजी सभापती शिवाजी चुंभळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना असा प्रवास करत पत्नी कल्पना चुंभळे, पुत्र अजिंक्य यांच्यासोबत नुकताच भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे, भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली नाशिक बाजार समिती हातात घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या अन् ते यात यशस्वी देखील झाले. पिंगळे यांच्या गटातील ९ संचालकांना आपल्या गळाला लावत पुन्हा बाजार समिती हातात घेऊन भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवला.

## महत्त्वाचे

### अतिक्रमण उपायुक्त पाटील यांची बदली

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेचे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त मयूर पाटील यांची शासनाने बदली केली आहे. नवापूर नगरपरिषद येथे मुख्य कार्यकारी अधिकारी पदी बढती देण्यात आली आहे. गुरुवारी(दि.२०) सायंकाळी त्यांच्या बदलीचे आदेश निघाले. दरम्यान, पाटील हे गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या कारभारावरून चांगलेच चर्चेत होते. त्यांनी अनेक ठिकाणची अतिक्रमणे हटवत कारवाई केली. गेल्या वर्षी शहरातील अतिक्रमणाचा मुद्दा विधानसभेत गाजल्यानंतर अतिक्रमण उपायुक्त नेर यांच्याकडून हा पदभार काढून घेत मयूर पाटील यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली. मागील दीड एक वर्षापासून ते कामकाज पाहत होते. त्यांच्या काळात द्वारका येथील विवादित दर्ग्याच्या अतिक्रमणावर बुलडोजर फिरवण्यात आला. त्यांनी नाशिक मनपात तीन वर्षे सेवेचा कालावधी पूर्ण झाला होता. मागील एक वर्षापासून ते बढतीच्या प्रतीक्षेत होते. अखेर शासनाने त्यांना बढती देत त्यांची नवापूर नगर परिषद येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली केली आहे. यापूर्वी त्यांनी सिडको विभागीय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यानंतर मनपातील जाहिरात घोटाळा समोर आल्यानंतर त्यांच्याकडे जाहिरात व करसंकलन विभागाच्या प्रभारी उपायुक्तपदही होते.

# गोदाकाठी स्नानासाठी नागरिकांची गर्दी

## खंडोबा मंदिर, म्हसोबा पटांगण, गौरी पटांगण रंगांनी माखले

**पंचवटी : वार्ताहर**

होळी व धूलिवंदनानंतर नाशिककरांचे लक्ष रहाडी खोदण्याकडे लागते. रंगपंचमीला रहाडीत उड्या घेऊन भिजणे, स्प्रिंकलर व शॉवर खाली भिजत रेन डान्स करणे म्हणजे स्वर्ग सुख... अशी भावना नाशिककरांमध्ये असते. दर वर्षी रहाडीत धप्पा मारण्यासाठी हजारो नाशिककरांची गर्दी होती. तर गोदाकाठी स्नानासाठी नागरिकांची गर्दी केल्याचे चित्र बघायला मिळाले.

रहाडीव्यतिरिक्त गोदाघाटाच्या खंडोबा मंदिर पटांगण, म्हसोबा पटांगण, गौरी पटांगण या परिसरात गाण्याच्या तालावर रेन डान्स करीत पाण्यात रंग भिजून इतरांवर पिचकाऱ्यांच्या सहाय्याने फेकण्याबरोबरच कोरडे रंग लावण्यात येत होते. शनिचौक, दिल्ली दरवाजा, तिवंधा, मधली होळी या ठिकाणच्या रहाडीत धप्पा देण्यासाठी हजारोंच्या संख्येने गर्दी झाली होती. रास्ते आखाडा तालीम संघ व शनि चौक मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पूजा करण्यात आली. तसेच नैवेद्य अर्पण करून आरती करण्यात आली. त्यानंतर रहाड खुली करण्यात आली. पंचवटी परिसरातील ठिकठिकाणी रंगांची दुकाने थाटलेली होती. पंचवटीतील शनी चौकात पेशवेकालीन रहाड आहे. या ठिकाणी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी पोलिस उपायुक्त परिमंडळ (एक) किरणकुमार चव्हाण, पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड आदी उपस्थित होते. या रहाडीत मानकरी वंशपरंपरेने अविनाश दीक्षित यांनी विधिवत पूजन करून रहाडीत उडी घेतली. त्यानंतर वास्तुविशारद शेखर ढिकले यांनी उडी घेतली. त्यानंतर शनी चौक, सरदार चौक, रास्तेआखाडा मंडळाचे भोरे, महांकाळे, मंदार जानोरकर, नंदकुमार मुठे, ढिकले आदींनी रहाडीत उड्या घेतल्या.



# गोदावरीचे पाणी अधिकाऱ्यांनी पिऊन दाखवावे

## दिनकर पाटील आक्रमक : नागरी सत्कार सोहळा

**नाशिक : प्रतिनिधी**

प्रदूषण नियंत्रण मंडळाने गोदावरीचे पाणी स्वच्छ असल्याचा अहवाल दिला आहे. ज्या अधिकाऱ्यांनी हा अहवाल दिला आहे, त्यांनी गोदावरीचे पाणी पिऊन दाखवावे, असे आव्हान देत आगामी काळात प्रदूषणमुक्त गोदावरीसाठी मनसे आक्रमक होणार असल्याचे सूतोवाच मनसे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी केले.

मनसेच्या प्रदेश सरचिटणीसपदी दिनकर पाटील यांची नियुक्ती करण्यात आल्यानंतर गुरुवार दि.२० रोजी कालिदास कलामंदिर येथे पाटील यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

सत्कार सोहळ्यास प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, प्रदेश उपाध्यक्ष महिला सेना सुजाता डेरे, जिल्हा उपाध्यक्ष संतोष शहाणे, सचिन सिन्हा, सत्यम खंडाळे, धीरज भोसले, योगेश दाभाडे बंटी कोरडे, ज्ञानेश्वर बगडे, विशाल भावले, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष गणेश मोरे, कौशल पाटील, शशी चौधरी, उमेश भोई, महेश लासुरे,अनंत सांगळे, मनोज घोडके,बबलू ठाकूर ,ज्योती शिंदे, अर्चना जाधव, वैशाली सोनवणे, आरती खिराडकर, अरुणा पाटील, कामिनी दोंदे, स्वाती मगर, पद्मिनी वारे, वैशाली पोतदार,तुषार गांगुर्डे, विजय अहिरे, मिलिंद कांबळे, रामदास खैरनार, प्रकाश गोसावी व पदाधिकारी उपस्थित होते.

आगामी काळात नाशिक शहरात सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. या पार्श्वभूमीवर लाखो भाविक येणार आहेत. या भाविकांना गोदावरीचे पाणी तीर्थ स्वरूपात प्राशन करता यावे, यासाठी येणाऱ्या काळात मनसे आंदोलन करण्यात येऊन प्रशासनाला गोदावरी स्वच्छ करण्यास भाग पाडू, जर कुंभमेळ्यापर्यंत गोदावरी स्वच्छ नाही झाली तर सिंहस्थाच्या काळात साखळी उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला. पाटील यांनी मनसेत राज ठाकरे यांनी दिलेल्या जबाबदारीबद्दल आभार व्यक्त करत आगामी काळात मनसे सर्वसामान्य नागरिकांच्या मुद्यावर आंदोलन करणार असल्याचेही सांगितले. सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक शहराध्यक्ष सुदाम कोंबडे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी पक्ष स्थापनेपासून पक्षाने केलेल्या कामाचा आढावा घेतला. तसेच दिनकर पाटील यांच्याही कार्याचा आढावा घेतला. यावेळी रतनकुमार इचम, सलीम मामा शेख, अंकुश पवार, सुदाम कोंबडे, सुजाता डेरे, नामदेव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.



### मनपात पुन्हा सत्ता आणणार

आगामी महानगरपालिका निवडणुकीनंतर नाशिक मनपावर पुन्हा मनसेचा झेंडा फडकवणार असल्याचा निर्धार करत कार्याकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे काम केले. त्यामुळे आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने मनसेकडून नागरी सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने कार्यकर्त्यांना ॲक्टिव्ह करण्याचा प्रयत्न करण्यात आला.


दिव्यत्वाची जेथे प्रचिती
तेथे कर माझे जुळती!



विनम्र अभिवादन!!!

कादवा परीसराचे भाग्यविधाते
कर्मवीर राजाराम सखाराम वाघ
यांना ५२ व्या स्मृति दिनाच्या निमित्ताने संस्थेचे सर्व विश्वस्थ, सभासद, सर्व कर्मचारी, सर्व विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी व पालक यांच्यावतीने विनम्र अभिवादन...

१) बी. के. कावळे माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय राजारामनगर
२) कादवा इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेज लखमापूर
३) माध्यमिक विद्यालय, अवनखेड
४) रा. स. वाघ माध्यमिक विद्यालय सोनजांब
५) प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा भनवड
६) कादवा पूर्व प्राथमिक (बालवाडी) राजारामनगर
७) प्राथमिक विद्यामंदिर राजारामनगर
८) कादवा इंग्लिश मीडिअम स्कूल राजारामनगर
९) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय राजारामनगर
१०) कादवा तंत्रनिकेतन राजारामनगर
११) कादवा नर्सिंग स्कूल राजारामनगर

सचिव | उपाध्यक्ष | अध्यक्ष

कर्मवीर रा. स. वाघ शैक्षणिक व आरोग्य संस्था
राजारामनगर, पो. मातेरेवाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक

नाशिक, शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५




# नाशिककरांवर रंगवर्षाव !

नाशिक : दिल्ली दरवाजा येथील रहाडीत रंगोत्सवाचा आनंद घेताना आबालवृद्ध तर दुसऱ्या छायाचित्रात आधुनिक पद्धतीने साकारलेल्या रेन डान्सवर थिरकताना तरुणाई. (छाया : रविकांत ताम्हणकर)

## रहाडींमध्ये धप्पा; डीजेच्या तालावर थिरकली तरुणाई

**नाशिक : प्रतिनिधी**
**'रंग बरसे भिगे चुनरवाली रंग बरसे', 'आला होळीचा सण लय भारी, चल नाचूया', 'बलम पिचकारी जो तुने मुझे मारी', 'आज गोकुळात रंग खेळतो हरी', रंग लेके खेलते ओ गुलाल लेके खेलते' अशा उत्साहदायी आणि प्रत्येकास ठेका धरायला भाग पाडणाऱ्या गाण्यांच्या तालावर थिरकत रंगांची मुक्त उधळण करत आणि रहाडींमध्ये डुंबून नाशिककरांनी रंगपंचमीचा आनंद घेतला.**

रंगपंचमीनिमित्त शहरात विविध मंडळांनी केलेल्या वर्षानृत्याचा (रेन डान्स) तरुणाईने मनोसक्त थिरकत रंगोत्सवाचा आनंद घेतला. रंग, पिचकाऱ्या, रंगीबेरंगी फुगे या सर्वांचा रंगपंचमी साजरी करण्यात बच्चेकंपनीतही उत्साह दिसून आला. नाशिककरांची रंगपंचमी ऐतिहासिक असते. जुन्या नाशिकमध्ये पेशवेकालीन रहाडी आहेत. रंगपंचमीसाठी त्यापैकी सात रहाडी खुल्या झाल्या होत्या. यंदा शिवाजी चौक साती आसरा मंदिराजवळील रहाड कित्येक वर्षांनंतर डुंबण्यासाठी खुली झाली. विधिवत पूजनानंतर सर्व रहाडी डुंबण्यासाठी खुल्या झाल्या. या रहाडी रंगाच्या पाण्याने



भरण्यात आल्या होत्या. प्रत्येक रहाडीभोवती त्या त्या मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सुरक्षेची व्यवस्था केली होती. कॉलेजरोड, मेनरोड, रविवार कारंजा, भद्रकाली, पंचवटी परिसरात ठिकठिकाणी थिरकत्या गाण्यांवर वर्षानृत्याचे आयोजन करण्यात आले होते.




### बाजारपेठेत संचारले चैतन्य

बाजारपेठेत मोदी पिचकारी, योगी पिचकारी, मोटुपतलू पिचकारी असे विविध प्रकार १५ रुपयांपासून पुढे दीड हजार रुपयांपर्यंत उपलब्ध होते. नैसर्गिक रंग १०० रुपये किलो दराने विकले गेले. सिकंदर ही रंगाची बाटली ६० रुपये, फवारणी रंग १०० रुपये अशी विक्री झाली. त्यामुळे मोठी आर्थिक उलाढाल झाल्याने बाजारपेठेत चैतन्य संचारले होते.

### कडेकोट पोलिस बंदोबस्त

नागपूर येथील दंगलीच्या पार्श्वभूमीवर नाशिक पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. मेनरोड, रविवार कारंजा, दहीपूल, भद्रकाली या भागाकडे येणाऱ्या रस्त्यांवरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. प्रत्येक रहाडीच्या ठिकाणी प्रभारी पोलीस निरीक्षकासह इतर कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त, राज्य राखीव दलाचे जवान असा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दंगल नियंत्रण पथकही तैनात होते.

### नैसर्गिक रंगांना मागणी

पर्यावरणपूरक रंगपंचमी खेळण्यासाठी नैसर्गिक रंगांना मागणी दिसून आली. याशिवाय, पाण्याचे फुगे तसेच सोनेरी रंगांचाही अनेक ठिकाणी वापर झाला. युवकांचे गट दुचाकीवरून रस्त्याने फिरताना दिसून आले. दुपारनंतर शहरातील सर्व रस्ते रंगीत झाले होते.

फटाक्यांची आतषबाजी, हलकडीच्या तालावर रंगांची उधळण

## येवला शहरात रंगले सामने; बघण्यासाठी नागरिकांची गर्दी



(छायाचित्र : विलास पगारे, येवला)

**येवला : प्रतिनिधी**
**सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची प्रचंड आतषबाजी आणि हलकडीच्या तालावर नाचत एकमेकांवर रंगीबेरंगी रंगांचा वर्षाव करत उत्साही वातावरणात येवलेकरांनी रंगांचे सामने खेळण्याचा मनसोक्त आनंद घेतला.**

### रंगांची उधळण

रंगपंचमीनिमित्ताने शहरातील विविध भागात दिवसभर रंगांची उधळण करण्यात आली. या रंगोत्सवात शहरातील नागरिकांनी डीजेच्या तालावर नाचत एकमेकांवर रंगांचा वर्षाव करण्यात आला. रंगपंचमीनिमित्ताने शहरातील सर्व व्यवसाय बंद होते. या रंगपंचमी उत्सवात विविध राजकीय, सामाजिक, तसेच पत्रकार बांधवांनी सहभाग घेत एकमेकांवर रंगांची उधळण केली. तर महिला भगिनींचाही उत्साह पहावयास मिळाला.

येवल्यात रंगोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. दिवसभर बच्चेकंपनीसह महिला, पुरुष, युवक, युवती आदींनी एकमेकांवर रंगांची उधळण केली तर सायंकाळी पाच वाजता शहरातील टिळक मैदान येथे रंगपंचमी उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माजी नगराध्यक्ष भोलानाथ लोणारी, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर झळके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच भोलानाथ लोणारी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रंगांच्या सामन्याचे उद्घाटन करण्यात आले. तसेच प्रभाकर झळके यांच्या हस्ते पैलवान राजेंद्र लोणारी, सामाजिक कार्यकर्ते दिनेश परदेशी तसेच उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. यानंतर रंगांच्या सामन्याला प्रारंभ करण्यात आला. सदर सामन्यात शंभरपेक्षा अधिक रंगांनी भरलेले ट्रॅक्टर सहभागी झाले होते.

ट्रॅक्टरवर युवक रंगांचा वर्षाव करण्यासाठी सहभागी झाले होते. मैदानात दुतर्फा रंगांच्या सामन्याला प्रारंभ होताच असंख्य युवकांनी एकमेकांवर विविध रंगांचा वर्षाव करीत आनंद व्यक्त केला. रंगांचे सामने बघण्यासाठी बाहेरगावावरून असंख्य पाहुणे दाखल झाले होते. तसेच शहरातील डी.जे. रोड या ठिकाणी रंगांचा दुसरा सामन्याला सायंकाळी ७ वाजता प्रारंभ करण्यात आला. या रंग उत्सवात रंगाने भरलेले असंख्य युवक सहभागी झाले होते. ट्रॅक्टरवर ठेवलेल्या रंगांचे टिपडे या माध्यमातून युवकांनी विविध रंगांचा एकमेकांवर वर्षाव करत तरुणाई विविध रंगांनी माखली. पोलिस निरीक्षक धीरज महाजन यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



## पोलिस आयुक्त, विभागीय आयुक्त यांच्या विविध ठिकाणी भेटी

**पंचवटी : वार्ताहर**
रंगपंचमीनिमित्त शहरात चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक आणि विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी शहरातील विविध मंडळे व ठिकठिकाणी असलेल्या रहाडींच्या ठिकाणी भेटी दिल्या. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी रंगपंचमीनिमित्त भद्रकाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जुने पेशवेकालीन रहाड, मधली होळी तालीम संघ व शिवाजी चौक तसेच पंचवटी हद्दीतील शनि चौक तसेच शाहू खैरे यांच्या मंडळाच्या ठिकाणी भेटी देत पाहणी केली.



## चांदशीत हास्य क्लबतर्फे रंगपंचमी

**पंचवटी : वार्ताहर**

चांदशी येथे नंदनवन हास्य क्लब तसेच सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघातर्फे स्वतंत्ररीत्या रंगपंचमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सदस्यांनी एकमेकांवर रंगांची उधळण केली.

रंगपंचमी म्हणजे रंगांचा सण, जिथे लोक एकमेकांना रंग लावून आनंद साजरा करतात. या सणाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे आणि तो नकारात्मक ऊर्जेवर विजय दर्शवतो, असे हास्य क्लबचे ज्येष्ठ सदस्य अनिल धटिंगण, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विजय बिरारी आणि शरद मंडलिक यांनी सांगितले. बी. बी. मोरे, शंकरराव खरात, विनय भुसे, प्रियदर्शन टांकसाळे, कमल उगले, मीरा पाटील, अनुराधा देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. अर्चना टांकसाळे आणि मृदुला वझे यांच्या गायनाने आगळी रंगत आली.

## अवघा रंग एक झाला.. रंगी रंगला श्रीरंग

### इस्कॉन मंदिरात भक्तिपूर्ण रंगोत्सव!

**नाशिक : प्रतिनिधी**
**द्वारका परिसरातील श्री.श्री. राधा मदनगोपाल (इस्कॉन) मंदिरात रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मंदिरातील श्री.श्री. राधा-मदन गोपालजी यांचा विशेष शृंगार करण्यात आला. राधा-मदनगोपाल यांच्या मूर्तीच्या सजावटीसाठी विविध रंगांचा व पिचकाऱ्यांचा वापर करण्यात आला होता.**



रंगपंचमीच्या उत्सवानिमित्त राधा मदनगोपाल उत्सव मूर्तीला गर्भगृहातून बाहेर आणले. विशेष सजविलेल्या वेदीवर स्थापन करून त्यांची आरती करण्यात आली. शंखनादाने रंग उधळणीला सुरुवात करून सर्वप्रथम विग्रहांना कोरडे नैसर्गिक रंग लावले गेले. नंतर ओले रंग व पिचकारीने रंगीत जलाचा वर्षाव केला गेला. सुरुवातीला कोरड्या नैसर्गिक रंगांची उधळण करण्यात येऊन नंतर उपस्थित भक्तांवर रंगीत जलाचा शिडकावा करण्यात आला. शेवटी विविधरंगी पुष्पांच्या पाकळ्यांनी विग्रहांचा अभिषेक करण्यात आला.

याप्रसंगी मोठ्या प्रमाणात भक्त व नाशिककर उपस्थित होते. हा रंगोत्सव अनुभवण्यासाठी भाविकांनी सकाळपासूनच मंदिर परिसरात गर्दी केली होती. सोबतच सुरू असलेल्या हरे कृष्ण संकीर्तनाच्या स्वराने रंगपंचमीच्या सणाला भक्तिमय स्वरूप प्राप्त झाले. भक्तगण भक्तिरंगांत रंगून, कीर्तनाच्या तालात दंग होऊन नृत्यही करत होते.

उत्सवाच्या शेवटी सर्वांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते. उत्सवासाठी सर्व नैसर्गिक रंगांचाच वापर करून पर्यावरणपूरक (इको फ्रेंडली) रंगपंचमी साजरी केली गेली तसेच पाण्याचा कमीत कमी वापर करून पाणी बचतीचा संदेशही दिला गेला. कार्यक्रमासाठी गोपालानंद प्रभू, सार्वभौम कृष्ण प्रभू, मुकुंदरस प्रभू, पावन गौरंग प्रभू, राजा रणछोड प्रभू, सर्वत्मा गोविंद प्रभू, अखिलेश्वर राम प्रभू, राग कृष्ण प्रभू, अक्षय एडके, बलरामचंद्र प्रभू, देवेश गोरे, कौस्तुभ महाले, यश भडके आदींसह भक्तांनी परिश्रम घेतले.




## संपादकीय

# सुस्वागतम्



अंतराळात अडकून पडलेली अमेरिकेची अंतराळवीर आणि भारतीय वंशाची सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी बुच विल्मोर हे पृथ्वीवर परत कधी येणार? याची उत्सुकता साऱ्या जगाला लागली होती. विशेषतः भारतीय आणि अमेरिकन नागरिकांना त्यांच्या भवितव्याची चिंता लागली होती. दोघे परत येतील काय? येणार असतील, तर कधी? ते दोघे अंतराळातच राहणार काय? त्यांचे भवितव्य काय? असे नानाविध प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. यामागचे कारण म्हणजे केवळ आठ दिवसांच्या मोहिमेसाठी हे दोघे अंतराळात गेले होते. पण, काही तांत्रिक कारणांमुळे त्यांना तब्बल नऊ महिने अडकून पडावे लागले. त्यांना सुरक्षितपणे पृथ्वीवर आणण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न करण्यात येत होते. अखेर प्रयत्नांना यश आले. सुनीता आणि तिचा सहकारी विल्मोर परत आल्याने त्यांचा नवा जन्म झाल्याचे आता मानले जात आहे. सुनीता विल्यम्स या भारतीय वंशाच्या असल्याने भारतीयांनासुद्धा आनंद झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्यासोबतचा एक जुना फोटो शेअर करत आनंद व्यक्त करत त्यांच्या धाडसाचे कौतुकही केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही दोघांचे अभिनंदन केले. विशेष म्हणजे ते अध्यक्ष झाल्यानंतर अंतराळात अडकून पडलेल्या अंतराळवीरांना वाचविण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यांचे सल्लागार एलॉन मस्क यांची त्यांनी मदत घेतली. माजी अध्यक्ष जो बायडेन यांनी त्यांना सोडून दिले, अशी राजकीय टिप्पणीही करण्यास ट्रम्प विसरले नाहीत. जे वचन दिले होते ते पूर्ण केले आहे, असे म्हणत त्यांनी एलॉन मस्क, स्पेसएक्स आणि नासाचे आभार मानले. सुनीता विल्यम्सने अनेक अंतराळ मोहिमा यशस्वीपणे पूर्ण केल्या. त्यातील ही सर्वात कठीण मोहीम होती. दोघे अडकून पडले. नऊ महिन्यांच्या कालावधीचा योग्य उपयोग करून त्यांनी वेगळ्या प्रकारचे संशोधनही केले. या कालावधीत सुनीताने १७ ते १८ वेळा स्पेसवॉक (अवकाशात चालणे) केला. इतक्या वेळा अंतराळामध्ये स्पेसवॉक करणारी ती पहिली महिला अंतराळवीरही ठरली. अमेरिकेच्या नासा या अंतराळ संशोधन संस्थेमध्ये काम करणार्या सुनीताची आतापर्यंतची कामगिरी अशाच प्रकारची देदीप्यमान आणि प्रेरणादायी आहे. अमेरिकन हवाई दलात काम करणार्या सुनीताने आपल्यातील लढावूवृत्ती समोर आणल्यामुळेच तिला अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात नासातर्फे संधी देण्यात आली. सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी विल्मोर आठ दिवसांच्या मोहिमेसाठी अवकाशात झेपावले तेव्हा अडकून पडण्याचे संकट निर्माण येणार, याची त्यांना कल्पनाही नसेल. अर्थात, अंतराळ मोहीम जोखमीची असते. आठ दिवसांनंतर पृथ्वीवर परतण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा तांत्रिक बिघाडामुळे आपण पृथ्वीवर परत येऊ शकणार नाही हे त्यांना समजले होते. परंतु, त्यांनी धीर सोडला नाही. आपण लवकरच पृथ्वीवर पोहचू हा विश्वास त्यांच्यामध्ये होता. पण, तब्बल नऊ महिने अडकून पडावे लागेल, असे त्यांना वाटलेही नसेल. महिनाभरात तांत्रिक बिघाड दुरुस्त होईल, असे त्यांना वाटत असेल. पण, बिघाड दुरुस्त करून त्यांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी नासाला तब्बल नऊ महिन्यांचा कालावधी लागला. स्पेसएक्सचे ड्रॅगन कॅप्सूल सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांच्यासह चार अंतराळवीरांना घेऊन फ्लोरिडा समुद्रात भारतीय प्रमाण वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.५७ ला उतरले. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून पृथ्वीपर्यंत अंतराळवीरांचा संपूर्ण प्रवास सुमारे १७ तासांचा होता. या प्रवासात एक क्षण असा आला की, नासाच्या शास्त्रज्ञांचे श्वास रोखले गेले होते. कॅप्सूलने पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताच त्याचे तापमान १६०० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढले. नासाचा अंतराळयानाशी संपर्क तुटला. सात मिनिटांनी संपर्क पूर्ववत झाला. सात मिनिटांचा कालावधी सतरा तासांच्या प्रवासात खूप मोठा होता. दिनांक १ फेब्रुवारी २००३ रोजी नासाचे अंतराळयान 'कोलंबिया' याच स्थितीत अपघातग्रस्त झाले होते. पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताच ते कोसळले. ज्यामध्ये भारतीय वंशाच्या अंतराळवीर कल्पना चावला या बळी ठरल्या होत्या. याचा विचार करता सर्वांना दोघांची काळजी वाटत होती. दोघांना परत आणण्यासाठी नासाने स्पेसएक्स या खासगी अंतराळ संशोधन कंपनीच्या मदतीने मोहीम आखली होती. स्पेसएक्सच्या अवकाशयानाने १४ मार्च रोजी दोघांना परत आणण्यासाठी उड्डाण केले. भारतीय प्रमाणवेळेनुसार बुधवारी पहाटे ते यान दोन्ही अंतराळवीरांना घेऊन परतले. परतीचा प्रवास देखील सोपा नव्हता. परतीचा प्रवास अत्यंत नियोजित आणि तांत्रिकदृष्ट्या जटिल होता. त्यांनी १८ मार्च रोजी प्रवास सुरू केला आणि १९ मार्च रोजी ते पृथ्वीवर सुखरूपपणे उतरले तेव्हा जगभरात त्यांचे स्वागत करण्यात आले. आनंद व्यक्त करण्यात आला. त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. अडकून पडलेल्या कालावधीत सुनीता सर्वांना शुभेच्छाही देत होती. नववर्षाच्या शुभेच्छासुद्धा तिने तमाम पृथ्वीवासीयांना दिल्या होत्या. संशोधनासाठी माणसाला जेव्हा अंतराळात पाठवले जाते तेव्हा अशा प्रकारची आव्हाने निर्माण होऊ शकतात, याचा धडा या निमित्ताने सर्व अवकाश संस्थांना मिळाला आहे. अवकाशामध्ये स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी अंतराळवीरांना कोणती आव्हाने स्वीकारावी लागतात, याची माहिती या निमित्ताने समोर येणार आहे. सुनीता आणि विल्मोर यांना अवकाश मोहिमांचा मोठा अनुभव असल्यामुळे त्यांनी या संकटाचा सामना डगमगून न जाता केला. जेव्हा या दोघांचे दर्शन पृथ्वीवरील लोकांना झाले तेव्हा त्यांच्या चेहर्यावर निराशा किंवा काळजी दिसत नव्हती. अत्यंत आनंदी चेहर्याने ते सर्वांशी संवाद साधताना दिसत होते. दोघेही सुरक्षितपणे परत आले असले, तरी त्यांना पृथ्वीवरील नैसर्गिक वातावरणामध्ये स्वतःला जुळवून घेण्यासाठी त्यांना आणखी काही कालावधी लागेल. अंतराळवीर जेव्हा दीर्घकाळ अवकाशात राहतात तेव्हा त्यांच्या शरीरावर आणि मनावर अनेक प्रकारचे परिणाम होतात. रक्तातील पेशी, पचन संस्था, मुख्य म्हणजे मानसिकता याबाबत अनेक आव्हाने अंतराळवीरांसमोर उभी राहू शकतात, असे तज्ज्ञ सांगतात. अंतराळस्थानकात नेहमीसारखे पायांनी न चालता हवेत तरंगण्याची सवय असणार्या अंतराळवीरांना पृथ्वीवर आल्यावर पुन्हा एकदा नैसर्गिकरित्या चालण्याची सवय करून घ्यावी लागते. एवढेच नव्हे तर नैसर्गिक आहार आणि विहार या गोष्टींचीही सवय पुन्हा एकदा नव्याने करून घ्यावी लागते. पृथ्वीवरील सामान्य वातावरणाशी जुळवून घेतल्यानंतर त्यांचे नियमित जीवन सुरू होईल.

## विचारधन

# माणसाची हाव कायमच राहते



जगात दोन प्रकारचे रोग माणसाला सतावीत असतात. एक रोग असा की, त्याने भूकच लागत नाही. कितीही औषधपाणी करा, काही उपयोग होत नाही. अशा माणसाला पंचपक्वानाचे जेवण तयार असूनही काय फायदा? तो म्हणतो, खायला खूप आहे, परंतु मला भूकच नाही, त्याला काय करू? दुसरा रोग असा की, कितीही खाल्ले तरी खाण्याची हाव काही पुरी होत नाही. काहीही खा, त्याचे भस्म होते. तद्वत् आपले आहे. मात्र, आपल्याला एकच रोग नसून, दोन्ही रोग आहेत. इतका परमार्थाचा हाट भरला आहे, भजन-पूजन चालू आहे, परंतु आपल्याला त्याचे प्रेम नाही. त्याची आवडच वाटत नाही. आपल्याला त्याची खरी भूकच लागलेली नाही. उलटपक्षी, भगवंताने आपल्याला आपल्या कल्पनेपेक्षा खरोखर कितीतरी जास्त दिले? बायको, मुले, नोकरी-धंदा, घरदार इ. कितीतरी गोष्टी, की ज्यांपासून सुख मिळेल असे आपल्याला वाटते, त्या गोष्टी पुरविल्या; पण अजून आपली हाव या सर्वांना पुरून, या सर्वांचे भस्म करून, कायमच आहे, आणि परमेश्वराचे प्रेम मात्र काही लागत नाही. हे असे किती दिवस चालणार? आपण नीतिधर्माने चालतो, आपली वागणूक वाईट नाही, हे खरे. पण याचे कारण वाईट वागलो तर आपल्याला लोक नावे ठेवतील ही भीती! असा हा दिखाऊ चांगुलपणा, ही वरवरची सुधारणा काय कामाची?

मानवी जीवन सुखी झाले तर ती सुधारणा म्हणायची! उलट आजची स्थिती पाहावी तर 'सुधारणा' जितक्या जास्त तितका माणूस जास्त असमाधानी झाला आहे. परमेश्वराचे प्रेम लागल्याशिवाय आणि इतर गोष्टींची हाव कमी झाल्याशिवाय काही फायदा नाही. तीर्थयात्रा, पूजा, भजन ही परमार्थाची नुसती आठवण देतील, पण अंतरंग सुधारेलच असे नाही आणि अंतरंग सुधारले नाही तर बाकीच्याचा उपयोग नाही. आपण दरवर्षी वारी करतो आणि जन्मभर वारी करीतच राहणार, परंतु परमेश्वराचे प्रेम मात्र काही लागत नाही. मनुष्याला किती असले म्हणजे पुरे होईल हे ठरलेले नाही; आहे त्या परिस्थितीत समाधान मानले की जे आहे ते पुरेल. परमार्थ 'समजून' जो त्याचे आचरण करील त्याला तो लवकर साधेल.

# लोकविचारांचा नेता : कर्मवीर रा.स.वाघ

**दिंडोरी तालुक्यातील तळेगाव वणी हे छोटेसे गाव. त्या गावातील प्रथम वकील, कादवा साखर कारखान्याचे मूळ संस्थापक कर्मवीर राजाराम सखाराम वाघ या नेत्याची आज पुण्यतिथी.**

दिंडोरी तालुका त्या काळातील ओसाड रान असलेला दुष्काळी तालुका. गोरगरीब शेतकरी भूमिपुत्र यांच्यासाठी काहीतरी काम असावे. भूमिपुत्राच्या मुलांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून एक वकील आपली चांगली सेवा असताना या माळरानावर सहकार तत्त्वावरचा एक सहकारी साखर कारखाना व्हावा म्हणून जीवापाड प्रयत्न करतो. अशा माळरानावर साखर कारखाना कसा उभा राहू शकतो म्हणून लोक वेड्यात काढतात तरी आपली जिद्द सोडत नाही. शेतकरी भूमिपुत्राच्या दारोदारी सायकलवर जाऊन कारखान्याची माहिती देतो, त्यांना संघटित करतो. शेअर जमा करतो आणि आजही अत्यंत सुस्थितीत सुरू असलेल्या कादवा सहकारी साखर कारखान्याची उभारणी करतो.

ती व्यक्ती म्हणजे थोर समाजसेवक कर्मवीर रा. स. वाघ होते. त्यांनी परिसरातील त्या काळातील व्यक्तींची मदत घेऊन हे भव्य दिव्य स्वप्न उभारले. आज हा परिसर अत्यंत विकसित झाला असून, भूमिपुत्र सुखाने इथे नांदत आहेत ही रा. स. वाघांची देणगी होय.

साखर कारखाना उभा करणे म्हणजे हजारो व्यक्तींना काम मिळणे, त्यांच्या मालाला भाव मिळणे, त्यांच्या कष्टाला यश मिळणे. कर्मवीर रा. स. वाघ अशी व्यक्ती होती की, भूमिपुत्रांच्या हाताला काम व इथल्या भूमिपुत्रांच्या मुलाला नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत, हा त्यांचा ध्यास होता. साखर कारखाना निघाला म्हणजे त्यांच्या उसाला भाव मिळेल, मुलांना नोकऱ्या मिळतील, लहान-मोठे व्यवसाय इथे उभे राहतील, ही त्यांची दूरदृष्टी आजच्या काळात दिसून येते. इथल्या शेतकऱ्यांच्या पिकाला पाणी मिळावे म्हणून होऊ घातलेले एक मोठे धरण सरकारला नमवून त्याचे लहान लहान धरणात रूपांतर करावे म्हणून त्यांनी शेतकऱ्यांचे सजोग मार्गाने आंदोलने उभारली आणि लहान लहान धरणे करण्यास सरकारला भाग पाडले. त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर भूमिपुत्रांनी त्यांना कर्मवीर पदवी बहाल केली. वकिली व्यवसायात गोरगरीब जनतेच्या न्यायासाठी वकिली केली. पिंपळगाव बसवंतसारख्या मोठ्या शहरात ज्यांना घर घेणं शक्य नव्हते, त्यांच्यासाठी शिवाजीनगरसारखी मोठी वसाहत उभी केली. लोकांनी मग या कर्मवीरांना स्थानिक स्वराज्य संस्थेत

**पुण्यतिथी**

**प्राचार्य विलास जाधव**
**बी.के. कावळे विद्यालय, राजारामनगर**

जिल्हा परिषदेलाही भरघोस मतांनी निवडून दिले. राजकीय, सामाजिक क्षेत्रात त्यांचा दबदबा वाढला. लोकविचारांचा नेता म्हणून त्यांचा नावलौकिक उभा राहिला. त्यांचे सहकारी कै. बाबूराव खंडेराव कावळे आणि इतर सहकाऱ्यांच्या आणि तत्कालीन संचालकांच्या मदतीने हा परिसर विकसित करण्यास सुरुवात केली. आयुष्यभर समाज विकासाच्या ध्येयाने ते कार्य करत राहिले.

कमी बोलून जास्त काम करणारा, नेता म्हणून त्यांना त्या काळी ओळखले जायचे. त्यांच्यानंतर कै. बी.के. कावळे, ॲड. बाजीराव कावळे, रामभाऊ डोखळे आणि विद्यमान अध्यक्ष श्रीराम शेटे यांनी त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवत आजही विकसित साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. ॲड. बाजीराव कावळे यांनी त्यांच्या नावाने कर्मवीर रा. स. वाघ शैक्षणिक व आरोग्य संस्थेची स्थापना केली. त्या संस्थेच्या दिंडोरी तालुक्यात आज अकरा शाखांचा विस्तार होऊन एक विकसित शैक्षणिक संस्था म्हणून नावलौकिक झाला. इथल्या भूमिपुत्रांच्या मुलांची शैक्षणिक प्रगती झाली. शेतकरी संघ, पतसंस्था, छोटे-मोठे उद्योग या भागात येऊन हजारो लोकांना काम मिळाले. अनेक मोठे-लहान साखर कारखाने बंद पडलेले असताना कर्मवीर रा.स. वाघ यांनी सुरुवात केलेला कादवा सहकारी साखर कारखाना आजही दिमाखात सुरुवात आहे, ही इथल्या भूमिपुत्रांची पुण्याईच म्हणावी लागेल. याचे संपूर्ण श्रेय कर्मवीर रा.स. वाघ यांना जाते. वयाने मोठी असलेली



माणसे बरीच असतात. पण दुसऱ्यासाठी योगदान देणारी, कार्याने, अभ्यासाने, परिश्रमाने, दूरदृष्टीचे आणि विचाराची माणसे थोडीच असतात. त्यातलेच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे कर्मवीर रा. स. वाघ होते. लोकांची टीका, प्रासंगिक विरोध, जननिंदा याला न जुमानता समाजविकास हेच व्रत समजून जी व्यक्ती उभी राहते ती सर्वांच्या स्मरणात राहते म्हणून ते आजही इथल्या भूमिपुत्रांच्या समरणात आहेत. दूर केले मोह! साधला न स्वार्थ ! जन्म गा सार्थ. नम्र होतो माथा! कर्तृत्वाची गाथा.. चारी दिशा अशा या समाजधुरीणाचे निधन दुर्दैवी अपघाताने व्हावे, ही समाजासाठी निश्चितच दु:खदायी गोष्ट आहे.

# एक संघर्षातून घडलेले व्यक्तिमत्त्व : रा.स.वाघ

**माणूस मोठा होतो तो त्याच्या कर्तृत्वाने. तुम्ही कुठे जन्माला आलात. कोणत्या खेड्यात यावर ते अवलंबून नसते. तुमचे काम आणि प्रामाणिकता असली की प्रयत्नांना यश हमखास मिळते. सर्वसामान्य माणसांच्या हितासाठी लढणारा एक लढाऊ नेता होऊन गेला त्यांचे नाव राजाराम सखाराम वाघ. त्यांच्या कर्तृत्वामुळे लोकांनी त्यांना कर्मवीर पदवी बहाल केली.**

ऊस हे परिसरातील महत्त्वाचे पीक, मात्र उसाला भाव नाही आणि तो विकायचा कुठे? असा महत्त्वाचा प्रश्न रा. स. वाघ यांना पडला. मग त्यांनी या भागात साखर कारखाना निर्माण करता येईल का? हा विचार त्यांना लोकांसमोर मांडला आणि त्यांच्या जवळच्या मित्रांना ही गोष्ट पटवून देऊन भुमिपुत्रांच्या मनामध्ये ही गोष्ट बिंबवली, त्यांनी हळूहळू लोक जोडले. त्यांच्या अथक प्रयत्नातून दिंडोरीच्या मातेरेवाडी परिसरात एका माळरानावर कादवा सहकारी साखर कारखाना हा मोठ्या कष्टाने आणि संघर्षशील वातावरणात त्यांनी उभा केला.

दिंडोरी तालुक्यात सर्वांगीण विकासाचे केंद्र म्हणून कादवा सहकारी साखर कारखाना ही कर्मवीर राजाराम सखाराम वाघ यांच्या कर्तृत्वाची देणगी म्हणून आज त्यांच्याकडे बघितले जाते. स्वतः काहीकाळ ते कारखान्याचे अध्यक्ष होते. त्यानंतर त्यांचे मित्र कर्मवीर बाबूराव खंडेराव कावळे, निष्णात वकील बाजीराव बाबूराव कावळे, शेतकरी नेते रामभाऊ डोखळे, प्रभाकर पाटील आणि त्यानंतर दूरदृष्टीचे नेते श्रीराम शेटे यांनी कारखान्याची धुरा अतिशय

**पुण्यतिथी**

**शहाजी सोमवंशी**
**अध्यक्ष, कर्म.रा.स.वाघ शिक्षण संस्था, राजारामनगर**

चांगल्या पद्धतीने सांभाळून आज संपूर्ण महाराष्ट्रात इतर सर्व कारखान्याची वाताहत होत असताना हा साखर कारखाना अत्यंत दिमाखात सुरू आहे. कारखान्यामुळे परिसरात रस्ते, लहान-मोठ्या संस्था उभ्या राहिल्या. भव्य अशा शैक्षणिक संस्थेची उभारणी झाली. छोट्या पतसंस्था, पेट्रोलपंप, सर्वप्रकारची दुकाने, शेतकऱ्यांसाठी खरेदी-विक्री संघ निर्माण झाले. शैक्षणिक संस्थेत तालुक्यातून हजारो गोरगरीब शेतकऱ्यांची मुले या संस्थेच्या अनेक विद्यालय, महाविद्यालयात शिकून बाहेर पडली. म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून तत्कालीन अध्यक्षांनी संस्थेला कर्मवीर रा. स. वाघ शैक्षणिक व आरोग्य संस्था हे नाव दिले. त्याचबरोबर कारखान्यात काम करणाऱ्या कामगार वसाहतीला राजारामनगर हे नाव देण्यात आले. त्यांचे काम हे गोरगरीब भूमिपुत्राला मदत करण्याचे होते. कादवा कारखाना उभारणीत त्या काळात ज्या सहकाऱ्यांनी त्यांना मदत केली तेही महत्त्वाचे ठरतात. हा परिसर सुजलाम् सुफलाम् होण्यासाठी खरे तर कर्मवीर वाघ यांनी मोठे योगदान त्या काळात दिले. अनेक मोठमोठे कारखाने बंद पडले. परंतु कादवा कारखाना आजही दिमाखात सुरू आहे. नव्याने प्रकल्प उभे करत आहे. म्हणून आज जिल्ह्यात सर्वांत समृद्ध तालुका म्हणून दिंडोरी प्रसिद्ध आहे. यात वाघ यांचे योगदान मोठे आहे.

लोकहिताची जाणीव, प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची व तल्लख बुद्धी असलेल्या या कर्मवीराला २१ मार्च १९७३ रोजी काळाने हिरावून नेले. आयुष्यभर जनकल्याणाची कामे करणारी माणसे काळाच्या पडद्याआड जातात. परंतु कर्तृत्वाने मात्र सदैव जनतेच्या अंतःकरणात वास करतात.

या अजरामर पुरुषाच्या पुण्य स्मृतीस संस्थेचे विश्वस्त मंडळ, पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी या सर्वांच्या वतीने विनम्र अभिवादन!

# चिमण्यांसाठी एवढे कराच!

दरवर्षी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही हा दिवस जगभर उत्साहात साजरा केला गेला. चिमणी या चिमुकल्या पक्ष्यासाठी व त्याच्या संरक्षणासाठी हा दिवस साजरा केला जातो. झपाट्याने कमी होणारी चिमण्यांची संख्या लक्षात घेऊन २० मार्च जागतिक दिवस म्हणून साजरा केला, तसेच येणाऱ्या पिढीला चिमणी हा पक्षी माहीत असावा या उद्देशाने हा दिवस चिमणी दिवस म्हणून घोषित करण्यात आला. भारतात सर्वांत जास्त माहीत असणारा पक्षी म्हणून चिमणी परिचयाची आहे. पूर्वी गल्लीबोळात, बाल्कनीत, गच्चीवर, झाडावर दिसणाऱ्या व मानवी वस्तीत मुक्त संचार करणाऱ्या चिमण्या आज दिसेनाशा झाल्या आहेत. अन्य पशुपक्ष्यांप्रमाणे चिमण्यांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. सहा महिन्यांतून एकदा दोन-चार अंडी



घालणाऱ्या चिमण्यांना मिलन काळात मातीची गरज असते. पण मातीची जागा आता सिमेंटने घेतली आहे. सिमेंटच्या जंगलामुळे व वाढत्या वृक्षतोडीमुळे चिमण्यांचा अधिवास नष्ट झाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. विशेषतः शहरांमध्ये मोबाइल टॉवर्समधून होणारे विद्युत चुंबकीय उत्सर्जन, आधुनिक प्रकारच्या घरबांधणी पद्धतीमुळे घरट्यांच्या जागांची अनुपलब्धता, अन्नाची उपलब्धता, शहरांमधील वाढते प्रदूषण तसेच शेतात होणारा रासायनिक खते व कीटकनाशक यांचा वापर यांसारख्या अनेक कारणांमुळे चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. २० मार्च हा दिवस चिमण्यांच्या संख्येबद्दल लोकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी साजरा केला जातो. चिमण्यांची घटती संख्या अशीच कायम राहिली तर येणाऱ्या पिढीला चिमणी केवळ चित्रांमधूनच पाहता येईल. पक्षी हा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. सकाळी आपल्याला झोपेतून उठवणाऱ्या कोकिळेपासून चिमण्यांचा किलबिलाटापर्यंत सारे पक्षी आपला सारा दिवस आनंददायी जावा यासाठी आपल्या कानावर आणि मनावर नादमधुर संगीताचे स्वर उमटवीत असतात. जसे हिरवेगार झाडे बघून मन प्रसन्न होते, तसेस पक्ष्यांमुळे मन आनंदी होते. त्यासाठी पक्ष्यांचे अस्तित्व टिकवणे महत्त्वाचे. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीत, बाल्कनीत, छपरावर कृत्रिम घरटी ठेवावीत. त्यात ज्वारी, बाजरी, गहू यांसारखी धान्ये ठेवावीत. बाल्कनीत, गॅलरीत मातीच्या भांड्यात पाणी ठेवल्यास ते चिमण्यांना पिण्यास मिळेल व त्यांना उन्हाळ्याची झळही बसणार नाही. केवळ चिमणी दिवस साजरा करून चिमण्या परत येणार नाहीत याचा विचार व्हावा. **- श्याम ठाणेदार**

# नद्यांच्या प्रदूषणावर ठोस उपाय व्हावेत

**जलशक्ती मंत्रालयाने नुकत्याच दिलेल्या माहितीत नवीन काहीच नाही. सांडपाणी व्यवस्थेतील गंभीर त्रुटींमुळे नद्यांचे प्रदूषण रोखण्यात अपयश येत आहे. हा विषय काही नवा नाही, उलट तो वारंवार चर्चेत येत असतो, पण उपाय मात्र कधीच ठोस घेतले जात नाहीत.**

हे केवळ निराशाजनक नाही, तर चिंताजनकही आहे की, नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरांमधील सांडपाणी व्यवस्थेतील सुधारणा पूर्णत्वाला जात नाहीत. परिणामी, अस्वच्छ सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडले जाते आणि त्यामुळे त्या विषारी बनतात. ही वस्तुस्थिती सर्वश्रुत आहे की, नद्यांच्या किनाऱ्यावर उभारलेली सांडपाणी प्रक्रिया केंद्रे अपुरी, निकृष्ट आणि अकार्यक्षम आहेत.

**सांडपाणी प्रक्रिया केंद्रे**

काही ठिकाणी या केंद्रांची क्षमता इतकी तोकडी आहे की, ती निम्मेही सांडपाणी शुद्ध करू शकत नाहीत. त्यातच ही संयंत्रे वारंवार बंद पडतात. त्यामुळे समस्या अधिक गंभीर बनते. राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची जबाबदारी आहे की, आवश्यक संख्येने प्रक्रिया केंद्रे उभारली जातील आणि ती पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.

मात्र, केंद्र सरकारला हे दिसत असताना की, राज्यांकडून हा मुद्दा गांभीर्याने घेतला जात नाही, तरीही त्यांच्यावर कुठलाही दबावशाही होत नाही, हे खेदजनक आहे. विलंब न करता ही केंद्रे कार्यान्वित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**गटारांचा थेट नद्यांत मिळणारा प्रवाह**

अनेक शहरांमधील गटारे

**दृष्टिक्षेप**

**मच्छिंद्र ऐनापुरे**

अजूनही सांडपाणी प्रक्रिया केंद्रांशी जोडले गेलेली नाहीत. परिणामी, हजारो टन अस्वच्छ सांडपाणी दररोज नद्यांमध्ये मिसळते. विशेष म्हणजे, ज्या नद्यांना प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प केंद्र आणि राज्य सरकारांनी केला आहे, त्याच नद्या या परिस्थितीला बळी पडत आहेत. पण या संकल्पांना काही निश्चित वेळमर्यादा आहे का? की केवळ घोषणा आणि निधीच्या मंजुरीपुरतेच हे सगळे सुरू आहे? प्रत्येक नाला सांडपाणी प्रक्रिया केंद्राशी जोडणे आणि प्रक्रिया न झालेल्या कोणत्याही पाण्याला नदीत जाण्यापासून रोखणे ही तातडीची गरज आहे.

**औद्योगिक कचऱ्याचा धोका आणि सरकारी निष्क्रियता**

नद्यांच्या प्रदूषणाचे एक मोठे कारण म्हणजे औद्योगिक सांडपाणी. नद्यांच्या काठावर असलेल्या कारखान्यांमधून मोठ्या प्रमाणात विषारी सांडपाणी सोडले जाते आणि याकडे लक्ष देणे हे सरकारी यंत्रणांचे काम आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ७३ प्रदूषक उद्योग बंद करण्याचे आदेश दिले, पण एवढ्यावरच समाधान मानावे का? अजूनही असंख्य उद्योग नद्यांमध्ये थेट अपशिष्ट सोडत असतील तर ही कारवाई केवळ कागदावरच मर्यादित आहे, असे म्हणावे लागेल.

**राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि नद्यांची दुर्दशा**

जर आज आपण ठामपणे सांगू शकत नसलो की, सर्व उद्योगांचे सांडपाणी प्रक्रिया होऊनच नद्यांमध्ये सोडले जाते, तर यातून एकच निष्कर्ष निघतो - नद्यांना प्रदूषणमुक्त करण्याच्या मोहिमा केवळ कागदोपत्री आहेत. यात सर्वांत मोठी अडचण म्हणजे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव. निधी मंजूर होतो, योजना जाहीर होतात, परंतु अमलात आणताना अपयश येते. या टोकाच्या ढिलाईमुळे आपल्या नद्या दिवसेंदिवस अधिक प्रदूषित होत आहेत.

# जनमनाचे प्रतिध्वनी

## पोहताना दक्षता घ्या

आता उन्हाळा सुरू झाला आहे. काही दिवसांतच मुलांच्या परीक्षा संपतील. मग मुलांना सुट्टीचे वेध लागतात. अनेक मुले ग्रुप करून पोहावयास जातात. खरे तर यातील कित्येक मुलांना पोहावयाससुद्धा येत नसते. अशा वेळी विनाकारण ही मुले पाण्यात जाऊन आपल्यावर संकट ओढवून घेतात. अशा वेळी आई-वडिलांनी अत्यंत सावधानता बाळगून ज्यांना पोहावयास येत नसेल अशा मुलांना मनाई करणे जरुरीचे आहे. ज्या मुलांना पोहावयास येते त्यांनाही जेथे पोहावयास जाणार ती जागा व त्यातील बारकावे माहीत पाहिजेत. माहीत नसेल तर आजूबाजूच्या लोकांकडून माहीत करून घेणे जरुरीचे आहे.

कित्येक वेळा पाण्याच्या खाली गाळ भरलेला असतो. तेथे पाय अडकून धोका निर्माण होऊ शकतो. हल्ली बऱ्याच ठिकाणी नदीमध्ये अनेक पाणवनस्पती वाढलेल्या असतात. त्यांचाही धोका निर्माण होऊ शकतो. शहरी भागात पोहण्याचे तलाव असतात, तेथे त्यामानाने बरीच सुरक्षा असते. तेथेही ट्रेनर असल्याशिवाय पाण्यात उतरू नये. हल्ली वरील नियम कसोशीने न पाळल्यामुळे अनेक मुलांचे मृत्यू झाल्याचे आपण पाहतो. हे टाळणे सहज शक्य आहे. पालकांनी याबाबत सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## रेल्वेला भुर्दंड

रेल्वेने प्रवास करताना तिकीट काढून प्रवास करावा असे आवाहन करावे लागते. यावरून फुकटे प्रवासी किती असतील याचा अंदाज येतो. क्वचित कधीतरी वेळ मिळाला नाही म्हणून तिकीट काढले नाही हे कारण ठीक असेल. पण रोजच्या प्रवासासाठी अजिबात योग्य नाही. रेल्वे डब्यात टीसी आल्यावर ज्यांच्याकडे तिकीट आहे ते लोक शांतपणे तिकीट दाखवतात. पण ज्यांच्याकडे तिकीट नाही ते मात्र वॉशरूममध्ये जाऊन बसणे, कोपऱ्यात जाऊन झोपणे वगैरे प्रकार करतात. पण तिकीट निरीक्षकांना हे प्रकार माहीत असल्याने ते बरोबर दंड वसुली करतात. रेल्वे प्रवास तुलनेने स्वस्त आहे तरीही तिकीट काढले नाही तर रेल्वेला फायदा होईल की तोटा?

**- प्र. मु. काळे**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### एमईआयएलला आव्हान देणारी जनहित याचिका हायकोर्टाने फेटाळली

**मुंबई :** बोरिवली-ठाणे जोड बोगदा प्रकल्प मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेडला(एमईआयएल) देण्यास आव्हान देणारी जनहित याचिका (पीआयएल) मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. हैद्राबाद येथील पत्रकार रवी प्रकाश यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत एमईआयएलच्या परदेशी बँकच्या हमी अवैध असल्याचा आरोप करण्यात आला होता, परंतु या याचिकेत अपेक्षित न्यायालयीन योग्यता नसल्याने ती फेटाळण्यात आली. गेल्या सुनावणीदरम्यान, एमएमआरडीएचे प्रतिनिधित्व करणारे सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया तुषार मेहता यांनी असा युक्तिवाद केला की आरोप करण्यात आलेल्या परदेशी बँक हमी स्टेट बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ महाराष्ट्र यांनी प्रमाणित केल्या आहेत, ज्याचा खुलासा याचिकाकर्त्याने केला नव्हता. एमईआयएलच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की जनहित याचिका सार्वजनिक हितापेक्षा वैयक्तिक सूडबुद्धीने प्रेरित आहे. जनहित याचिका फेटाळण्यात आल्यानंतर, १६,६०० कोटी रुपयांचा बोरिवली-ठाणे जोड बोगदा प्रकल्प आता कायदेशीर अडथळ्यांशिवाय पुढे जाण्यास मदत होईल.

### 'झापुक झुपूक'चा टिझर रिलीज


**मुंबई :** बिग बॉस मराठी सिझन ५ च्या विनर ट्रॉफीवर सूरज




चव्हाणने आपलं नाव कोरलं आहे. सूरजने लाखो चाहत्यांची मनं जिंकली आणि आता पुन्हा एकदा तो आपला जलवा दाखवायला सज्ज आहे. सूरज चव्हाण लवकरच झापुक झुपूक या त्याच्या पहिल्या मराठी सिनेमात दिसणार आहे आणि आज जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे ,केदार शिंदे दिग्दर्शित झापुक झुपूक चा धमाकेदार टिझर प्रदर्शित झालाय. सूरज चा एक प्रसिद्ध डायलॉग आहे ज्यात तो 'म्हणतो मार्केट गाजवायला आणि पोरीला लाजवायला सूरज चव्हाणच्या नजरेतच दम आहे', असाच त्याच्या झापुक झुपूक सिनेमाचा टिझर आहे. दमदार आणि गाजवणारा. टिझर मध्ये चित्रपटाची थोडीशी झलक पहायला मिळते, सूरजची कॉमेडी, हटके स्टाईल त्याचा भन्नाट अभिनय आणि फुल्ल ऑन मनोरंजन सिनेमामध्ये अनुभवायला मिळणार आहे. हालाखीच्या परिस्थितीतून वर येऊन सूरज ने प्रसिद्धी मिळवत माणुसकी जपली. त्याची अकल्पनीय आणि प्रशंसनीय मेहनत आता मोठ्या पद्यावर पाहायला मिळणार आहे. एका ग्रामीण भागातील हा मुलगा त्याच्या चित्रपटासाठी सध्या भरपूर चर्चेत आहे, मराठी मातीतल्या ह्या साध्या भोळ्या सूरज साठी प्रेक्षकांमध्ये कमालीची क्रेझ निर्माण झाली आहे. सूरज चव्हाणसोबत या चित्रपटात अनेक मराठी कलाकार जसे जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. हल्लीच सूरज ने जेजुरीच्या खंडोबा देवाचे, आईमरी मातेचे आणि मोरगावच्या गणपती बाप्पाचे दर्शन घेत सिनेमाच्या प्रमोशन ची जोरदार सुरुवात केली आहे. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित आणि दिग्दर्शित झापुक झुपूक हा सिनेमा येत्या २५ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्रातील सिनेमागृहांत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

### दागिन्यांच्या निर्यातीत २३ टक्के घसरण

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि चीनमधून मागणी कमी झाल्यामुळे भारताची रत्ने व दागिन्यांची निर्यात फेब्रुवारीमध्ये २३.४९



टक्क्यांनी घसरून २१,०८५ कोटी रुपयांवर मर्यादित राहिली आहे, असे द जेम अँड ज्वेलरी एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलने (जीजेईपीसी) बुधवारी स्पष्ट केले. गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ च्या याच कालावधीत रत्ने व दागिन्यांची एकूण निर्यात २६,२६८ कोटी रुपये नोंदवली गेली होती. एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ही निर्यात १३.४३ टक्क्यांनी घसरून २,१७,१४८ कोटी रुपये झाली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीतील २,४६,१०५ कोटी रुपये होती. रत्ने आणि दागिन्यांच्या निर्यातीत घट ही मुख्यतः चीन तसेच अमेरिकेतील मागणीत सतत घट झाल्यामुळे आहे. सध्या सुरू असलेल्या भू-राजकीय तणावामुळे अमेरिका, चीन आणि जी७ राष्ट्रांसह प्रमुख निर्यात बाजारपेठांमधील मागणीवर परिणाम झाला आहे. तसेच, कच्च्या हिऱ्याच्या किमतीत १०-१५ टक्क्यांनी घसरण झाल्याने निर्यातीत एकूण घट झाली आहे, असे जीजेईपीसी नवनिर्वाचित अध्यक्ष किरीट भन्साळी यांनी सांगितले. दरम्यान, फेब्रुवारीमध्ये ११,८६० कोटी रुपये मूल्याच्या हिऱ्यांची एकूण निर्यात झाली, जी २०.२ टक्क्यांनी घसरली आहे. सोन्याच्या दागिन्यांची एकूण निर्यात १८.०९ टक्क्यांनी कमी होऊन ६,५४९.४६ कोटी रुपयांवर मर्यादित राहिली आहे.

### 'शॉर्ट ड्युरेशन' फंडांचा अधिक परतावा



**मुंबई:** मागील सहा महिन्यांत भांडवली बाजारातील प्रचंड अस्थिरतेत म्युच्युअल फंडांच्या रोखेसंलग्न 'शॉर्ट ड्युरेशन फंडां'नी गुंतवणूकदारांना बँकांच्या मुदत ठेवींपेक्षा जास्त म्हणजेच ७.५१ टक्क्यांपर्यंत परतावा दिला आहे. तर तीन वर्षांत या योजनांचा परतावा वार्षिक सरासरी सात टक्क्यांपर्यंत राहिला आहे. योग्य सुरक्षिततेसह स्थिर परतावा देणाऱ्या या योजना अल्पावधीचे गुंतवणूक उद्दिष्ट असणाऱ्यांसाठी सर्वोत्तम ठरतात. जवळपास सर्व फंड घराण्यांकडून शॉर्ट ड्युरेशन या रोखेसंलग्न योजना गुंतवणुकीस उपलब्ध आहेत. 'अर्थलाभ'कडून संकलित आकडेवारीनुसार, एका वर्षात चांगला परतावा देणाऱ्या फंड घराण्यांमध्ये एचडीएफसीने ७.७२ टक्के, ॲक्सिसने ७.६१ टक्के, आदित्य बिर्ला सनलाइफने ७.५१ टक्के आणि निप्पॉन फंडाने ७.६० टक्के परतावा दिला आहे. तीन वर्षांत चांगला परतावा देणाऱ्या पर्यायांमध्ये एचडीएफसीने ६.६० टक्के, आदित्य बिर्लाने ६.५९ टक्के, ॲक्सिसने ६.४३ टक्के, आयसीआयसीआय प्रुडेन्शियलने ७.०२ टक्के आणि बंधन फंडाने ६.१५ टक्के परतावा दिला आहे. या प्रकारची फंड योजना कॉर्पोरेट बाँड्स, सरकारी सिक्युरिटीज व मनी मार्केट इन्स्ट्रुमेंट्सचा माग घेते. दोन ते पाच वर्षांच्या कॉर्पोरेट बाँड आणि सरकारी सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करते. प्रामुख्याने एएए आणि ए१ प्लस रेटिंग असलेल्या मालमत्तांमध्ये गुंतवणूक केली जाते.

# टीडीएसचे नवे नियम १ एप्रिलपासून लागू

**नवी दिल्ली : केंद्र सरकारने गेल्या महिन्यात देशाचा आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात सरकारने टॅक्सबाबत अनेक घोषणा केल्या होत्या. १ एप्रिलपासून नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात होत असल्यामुळे अर्थसंकल्पाद्वारे केलेल्या योजना या दिवसापासून लागू होतील. १ एप्रिलपासून टीडीएसचे नियमदेखील बदलणार आहेत. टीडीएस नियमांमधील बदलांमुळे करदाते, गुंतवणूकदार, ज्येष्ठ नागरिक व कमिशन एजंटांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.**




टीडीएसमधील सूट वाढवण्यात आल्यामुळे गुंतवणूकदारांना डिव्हिडेंट इन्कम (लाभांश उत्पन्न) व म्युच्युअल फंडांद्वारे झालेल्या कमाईवर अधिक सूट मिळेल. अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये, सरकारने १ एप्रिलपासून शेअर्स व म्युच्युअल फंड युनिट्सद्वारे मिळणाऱ्या लाभांशावरील टीडीएस सूट मर्यादा ५,००० रुपयांवरून १०,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांना सरकारने व्याज उत्पन्नावरील टीडीएस सूट मर्यादा दुप्पट केली आहे. डिपॉझिट व रेकरिंग डिपॉझिटद्वारे ज्येष्ठ नागरिकांच्या मिळणाऱ्या व्याज उत्पन्नावर बँका फिक्स्ड टीडीएस कापून घेतात. १ एप्रिलपासून ज्या ज्येष्ठ नागरिकाचं आर्थिक वर्षातील एकूण व्याज उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तरच त्या एक लाखाच्या पुढील रकमेवरील टीडीएस कापून घेतला जाईल. याचाच अर्थ ज्या ज्येष्ठ नागरिकाचं वार्षिक व्याज उत्पन्न एक लाख रुपयापेक्षा कमी असेल त्यांच्या उत्पन्नावरील टीडीएस कापला जाणार नाही.

दरम्यान, सरकारने ज्येष्ठ नागरिकांप्रमाणे ५० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या लोकांना दिलासा देण्यासाठी व्याज उत्पन्नावरील टीडीएस सूट मर्यादा वाढवली आहे. ज्या लोकांचं (६० वर्षांपेक्षा कमी वय असलेले) आर्थिक वर्षातील एकूण व्याज उत्पन्न ५०,००० रुपयांपेक्षा अधिक असेल तरच त्यांचा टीडीएस कापून घेतला जाईल. याचाच अर्थ या नागरिकांचं वार्षिक व्याज उत्पन्न ५० हजार रुपयांपेक्षा कमी असेल तर त्यांच्या उत्पन्नावरील टीडीएस कापला जाणार नाही. लॉटरी, हॉर्स रेसिंग आणि गेमिंगवरील टीडीएस मर्यादेत सुधारणा करण्यात आली आहे. पूर्वी एका आर्थिक वर्षात १०,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम जिंकली तर त्या रकमेवर टीडीएस लागू होत होता. आता केवळ एकाच व्यवहारात १०,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम जिंकली तरच टीडीएस कापला जाईल.

# ॲमेझॉन फॅशनच्या ग्राहकांमध्ये तिप्पट वाढ

**नाशिक :** ॲमेझॉन फॅशनने त्यांच्या नेक्स्ट जेन स्टोअरसाठी महत्त्वपूर्ण टप्प्यांची माहिती दिली, ज्यामध्ये भारतामधील बदलत्या फॅशन करण्याच्या पद्धतीचे प्रतिबिंब असलेले बदलत्या वाढीच्या नमूनांवर भर देण्यात आला आहे. २०२३ मध्ये जेन झेडसाठी भारतातील पहिले समर्पित डिजिटल फॅशन हब म्हणून सुरू झालेल्या या नवकल्पक स्टोअरफ्रंटने जेन झेड ग्राहकांमध्ये तिप्पट वाढ आणि मध्यम शहरांमधून आणखी चौपट वाढ घडवून आणली आहे, ज्यामुळे भारताच्या भूमीवर ट्रेंड-फॉरवर्ड फॅशनचे सामान्यीकरण दिसून येते. नेक्स्ट जेन स्टोअरने जागतिक ट्रेंड आणि स्थानिक संवेदनशीलता एकत्रित करण्याच्या धोरणात्मक दृष्टिकोनाद्वारे युवा पिढीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या फॅशनसाठी बाजारपेठेतील दरी यशस्वीरीत्या भरून काढली आहे. २० लाखांहून अधिक उत्पादनांसह ३४०+ देशांतर्गत आणि जागतिक ब्रँड्सचा विस्तृत पोर्टफोलिओ असलेले हे ऑनलाइन स्टोअर डिजिटल पद्धतीने नेटिव्ह असलेल्या फॅशन ग्राहकांसाठी उपलब्धता आणि एक्सप्रेशन दोन्ही शोधणारे निश्चित ठिकाण म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे.

या गतीला चालना देण्यासाठी, ॲमेझॉन फॅशन २०-२४ मार्च दरम्यान फार प्रतिक्षेत असलेल्या नेक्स्ट जेन ऑनलाइन शॉपिंग इव्हेंटचे आयोजन करणार आहे, ज्यामध्ये तरुणाईच्या सौंदर्याचे वर्णन करणाऱ्या खास तयार केलेल्या कलेक्शनवर ६०% पर्यंत सूट मिळेल. या इव्हेंटमध्ये वाय२के बॅडी, ९० च्या दशकातील ग्रंज, स्ट्रीट स्टार आणि सॉफ्ट बॉय यांसारख्या समकालीन शैलीतील कथा प्रदर्शित केल्या जातील, तसेच जेन झेड लेन्सद्वारे पुन्हा कल्पना केलेल्या फॅशन स्टेपलचे प्रदर्शन केले जाईल - मोठ्या आकाराच्या सिल्हूटपासून ते शिल्पकला फिटिंगपर्यंत, मोनोक्रोम पॅलेट्सपासून निऑन ॲक्सेंटपर्यंत सर्व गोष्टींचा यात समावश असेल.

ॲमेझॉन फॅशन आणि ब्युटी इंडियाचे संचालक सिद्धार्थ भगत म्हणाले, आमच्या नेक्स्ट जेन स्टोअरची उल्लेखनीय वाढ म्हणजे भारताच्या फॅशन इकोसिस्टममधील मूलभूत बदलाचे प्रतिबिंब आहे, ते पुढे म्हणाले, आपण सध्या साक्षीदार आहोत ते नवीन फॅशन नमून्याचा उदय होत असल्याचे जेथे भारतामधील विविध क्षेत्रातील जेन झेड ग्राहक स्टाईलच्या माध्यमातून स्वतःच्या एक्स्प्रेशनमध्ये व्यापले जात आहेत. चंदिगड, जयपूर, सुरत आणि विशेषतः मध्यम शहरांमध्ये नेक्स्ट जेन स्टोअरचे यश डिजिटल प्लॅटफॉर्म फॅशन उपलब्धतेला अशा प्रकारे वाढ देत आहेत, जेणेकरून ट्रेंड-फॉरवर्ड निवडी महानगरांच्या सीमांच्या पलीकडे पोहोचू शकतात हे त्यामधून लक्षात आले आहे.

नेक्स्ट जेन स्टोअर हे धोरणात्मक ब्रँड सहकार्यातून विकसित झाले आहे जे जेन झेड ग्राहकांच्या विशिष्ट मूल्यांशी सुसंगत आहे - ज्यात हे स्टोअर शाश्वतता, समावेशकता, स्त्री-पुरूष प्रवाहीपणा आणि वैयक्तिक एक्स्प्रेशन यावर भर देते.

# कोटक म्युच्युअल फंडतर्फे छोटी एसआयपी सादर

**नाशिक :** कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (केएमएएमसी / कोटक म्युच्युअल फंड)ने काल छोटी एसआयपी सुविधा लॉन्च केल्याचे जाहीर केले. छोटी एसआयपी कोटक महिंद्रा म्युच्युअल फंडच्या सर्व पात्र योजनांसाठी उपलब्ध असेल. सेबी आणि एएमएफआयने अलीकडेच छोटी एसआयपी आपला संपत्ती निर्मितीचा प्रवास सुरू करू शकतात. आपण त्याला 'छोटी रक्कम - बडा काम' असे म्हणू शकतो.

या उपक्रमाच्या अंतर्गत नवीन गुंतवणूकदार २५० रुपयांच्या किमान रकमेसह एसआयपीच्या माध्यमातून गुंतवणूक करू शकतात. 'छोटी एसआयपी' (स्मॉल सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) सरू (स्मॉल टिकेट एसआयपी) दाखल केली आहे, ज्यामधून संपत्ती निर्मितीच्या प्रवासात अधिकाधिक भारतीयांना आणण्याची एक उत्तम संधी सादर केली आहे.

केएमएएमसीचे मॅनिजिंग डायरेक्टर नीलेश शाह म्हणाले, भारताच्या लोकसंख्येपैकी केवळ सुमारे ५.४ कोटी अनोखे गुंतवणूकदारच म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करतात- अशाप्रकारे ही फारशी न वापरलेली आणि प्रचंड मोठी संधी आहे, जी अजूनही खूप जास्त लोकांपर्यंत पोहोचू शकते आणि भारतीय बचतकर्ते त्यातून आर्थिक स्वातंत्र्य मिळवू शकतात. सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी) नवीन गुंतवणूकदारांना आकर्षित करून त्यांचा म्युच्युअल फंड प्रवास सुरू करण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

छोटी एसआयपीच्या लॉन्चसह नवीन गुंतवणूकदार कमीत कमी २५० रुपयांनी करण्यामागचा उद्देश प्रवेशातील अवरोध कमी करून, जास्तीत जास्त लोकांसाठी, विशेषतः नवीन गुंतवणूकदारांसाठी म्युच्युअल फंड गुंतवणूक उपलब्ध करण्याचा आहे. गुंतवणूकदाराने आधी कधीही उद्योगस्तरावर म्युच्युअल फंड (एसआयपी किंवा एकरकमी) मध्ये गुंतवणूक केलेली नसली पाहिजे. गुंतवणूकदाराने ग्रोथ ऑप्शनमध्येच गुंतवणूक केली पाहिजे आणि कमीत कमी ६० मासिक हप्ते भरण्यासाठी तो वचनबद्ध असला पाहिजे. हप्ते एनएसीएच किंवा यूपीआय ऑटो-पेमार्फतच भरले पाहिजेत.

हा प्लॅन अनुकूल आहे की नाही, याबद्दल काही शंका असल्यास गुंतवणूकदाराने आपल्या आर्थिक तज्ज्ञाचा किंवा कर सल्लागाराचा सल्ला घ्यावा. कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (केएमएएमसी) कोणत्याही परताव्याची / भावी परताव्याची हमी देत नाही किंवा तसे वचन देत नाही.

# आइकूचा जनरल झेड सीजीओचा शोध सुरू

**नवी दिल्ली :**

आइकू, एक उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड, २०२५ साठी त्यांच्या चीफ गेमिंग ऑफिसर (सीजीओ) शोधत आहे, जो स्मार्टफोन स्पेसची सह-निर्मिती करण्यासाठी, ब्रँडच्या ईस्पोर्ट्स व्हिजनचे नेतृत्व करण्यासाठी आणि भारतातील शीर्ष ईस्पोर्ट्स गेमर्सशी सक्रियपणे सहभागी होण्यासाठी जबाबदार असेल. ही संधी १८ ते २५ वयोगटातील तरुण गेमिंग उत्साहींना त्यांच्या आवडीचे यशस्वी आणि फायदेशीर करिअरमध्ये रूपांतर करण्याची संधी देते. सीजीओला आइकूमधील नवीनतम उत्पादनांची उपलब्धता असेल आणि जगभरातील प्रमुख गेमिंग इव्हेंटमध्ये ब्रँडचे प्रतिनिधित्व करेल.




इकूचे चीफ गेमिंग ऑफिसर (सीजीओ) नेतृत्व टीमसोबत जवळून काम करतील आणि गेमिंग समुदायाशी संवाद साधतील. तो गेमप्ले, गेमिंग शैली, सादरीकरण आणि खेळाची समज यासारख्या विषयांवर आपले विचार मांडेल. इकू त्यांच्या सीजीओला एकूण १०,००,००० चे बक्षीस देखील देत आहे. कंपनीने त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर (www.aiku.com/in/activity/cgo) १८ ते २५ वयोगटातील तरुणांसाठी नोंदणी सुरू केली आहे आणि अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० मार्च २०२५ आहे.

चीफ गेमिंग ऑफिसर सर्चबद्दल बोलताना, आयकूचे सीईओ निपुण मरिया म्हणाले, आम्ही नेहमीच भारतातील गेमिंग समुदायाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला आहे आणि आमच्या शेवटच्या सीजीओ हंटला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हे आणखी बळकट झाले आहे. आमच्या समुदायाकडून असंख्य विनंत्या मिळाल्यानंतर, आम्हाला जाणवले की आपण ते पुन्हा आणले पाहिजे. आयकू येथे, आम्ही तरुण गेमिंग उत्साहींना ईस्पोर्ट्स उद्योगात पाऊल ठेवण्यासाठी आणि भारतातील मोबाइल गेमिंगचे भविष्य घडविण्यासाठी सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहोत. सीजीओला आयपी म्हणून आणून, आम्ही क्रेस्टर्सना त्यांच्या आवडीचे व्यवसायात रूपांतर करण्याची आणि आमच्या व्हिजनचा भाग बनण्याची संधी देत राहू.

गेल्या सहा वर्षांत, २०१८ ते २०२४ पर्यंत भारतातील गेमर्सची संख्या दरवर्षी १४.६% दराने वाढली आहे. IMARC अहवालांमधील ट्रेंड्सच्या आधारे, गेमर्सची नवीनतम अंदाजे संख्या सुमारे ४८ कोटींवर पोहोचली आहे. त्याच अहवालानुसार, २०२३ मध्ये गेमर्सची संख्या ४३.९ कोटी होती. CGO २.० सह iKoo चे उद्दिष्ट त्यांच्या वेगाने वाढणाऱ्या समुदायाशी अधिक जोडले जाणे, नवीन नवोपक्रम आणणे आणि भारतातील मोबाइल गेमिंगचे भविष्य घडविण्यासाठी तरुण गेमिंग उत्साहींना सक्षम करणे आहे.

# आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्टसह संपत्तीचे संरक्षण आणि महागाई नियंत्रण

**नाशिक :** आजच्या अनिश्चित आर्थिक परिस्थितीत वाढती महागाई हाताळण्यासाठी, बाजारातील चढ-उतारांवर मात करण्यासाठी आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत असणे गरजेचे झाले आहे. या गरजेची पूर्तता करण्यासाठी, लोक अशा गुंतवणुकीच्या पर्यायांकडे पाहत आहेत जे गुंतवलेल्या भांडवलाची सुरक्षितता आणि वाढ दोन्ही प्रदान करतील. ही गरज पूर्ण करण्यासाठी, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट नावाचा एक खास दीर्घकालीन बचत योजना सुरु केली आहे. हा प्लॅन तुमच्या संपत्तीचे जतन करत निश्चित उत्पन्न मिळवून देण्यासाठी बनविण्यात आला आहे.

आमचे उद्दिष्ट ग्राहकांना त्यांची दीर्घकालीन आर्थिक स्वप्ने निश्चितपणे पूर्ण करण्यात मदत करणे आहे, असे आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सचे मुख्य उत्पादन आणि वितरण अधिकारी श्री. अमित पालटा यांनी सांगितले. या योजनेत लवचिकता असून ग्राहकांना निश्चित उत्पन्न कालावधी निवडण्याचा पर्याय मिळतो याशिवाय मॅच्युरिटीच्या वेळी एकरकमी मोठी रकम मिळते आणि ती कर भरण्याच्या दृष्टीने फायदेशीर असते. या योजनेमध्ये दरवर्षी ५% उत्पन्न वाढते ज्यामुळे ग्राहकांना वाढत्या महागाईला तोंड देणे सोपे होते. आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स आपल्या विमा वितरण प्रणालीमध्ये मोठे डिजिटल बदल करत आहे. याच अंतर्गत आयपीआरयू एज या मोबाइल ॲपद्वारे विमा एजंटांना अधिक सक्षम बनविण्यात येत आहे.

ग्राहकांनी योग्य आर्थिक निर्णय घ्यावे यासाठी एजंट महत्त्वाची भूमिका बजावतात. आयपीआरयू एजच्या मदतीने, आम्ही त्यांना डिजिटल ऑफिस त्यांच्या हातात उपलब्ध करून देत आहोत, असे श्री. अमित पालटा यांनी सांगितले. या मोबाइल ॲपद्वारे एजंट नवीन ग्राहक शोधू शकतात, सोशल मीडिया प्रचार करू शकतात आणि कोणत्याही प्रत्यक्ष कागदपत्राविना पूर्ण डिजिटल पद्धतीने विमा विक्री करू शकतात. यामुळे विमा एजंट त्यांचा व्यवसाय अधिक सक्षमपणे वाढवू शकतात. एप्रिल ते डिसेंबर २०२४ या कालावधीत आयपीआरयू एज वापरणाऱ्या एजंटांच्या विमा विक्रीत २५% वाढ झाली.

विशेष म्हणजे, ९८% पात्र एजंटांना त्यांच्या कमिशनचे पेमेंट त्याच दिवशी मिळाले. एआय-आधारित उपायांमुळे ५०% पेक्षा जास्त बचत विमा योजना ज्याच्या त्याच दिवशी जारी केल्या जाऊ शकल्या. एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या काळात कंपनीचा विमा दावा मंजुरीचा दर ९९.३% इतका होता यावरून आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सचा ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन स्पष्ट होतो. याशिवाय, ज्या दाव्यात चौकशी करण्याची गरज नव्हती ते अवघ्या १.२ दिवसांत मंजूर झाले. ग्राहकांचे आर्थिक भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि एजंटांना करिअरमध्ये सुलभ आणि उत्तम प्रगती मिळवून देण्यास कंपनी वचनबद्ध आहे.

# निफ्टी ईव्ही न्यू एज ऑटोमोटिव्ह ईटीएफसोबत वेगाने वाटचाल

इंधनाचे दर सातत्याने वाढत आहेत, पण जर तुम्हाला पुन्हा पेट्रोल-डिझेल भरण्याची गरजच पडली नाही, तर? हे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरू लागले आहे! भारतात इलेक्ट्रिक वाहनांची (ईव्ही) क्रांती वेग घेत आहे, आणि २०२३ मध्ये ईव्ही नोंदणींनी नवे उच्चांक गाठले. सरकारी धोरणे आणि बॅटरीच्या घटत्या किमतींमुळे या क्षेत्राला प्रचंड गती मिळत आहे. अंदाजानुसार, २०३२ पर्यंत भारतातील ईव्ही बाजार १५ पट वाढून ११८ अब्ज इतका होईल. या परिवर्तनाचा भाग होण्याची संधी देतो निफ्टी ईव्ही न्यू एज ऑटोमोटिव्ह ईटीएफ, जो वाहन उत्पादक, बॅटरी निर्माते आणि आधुनिक तंत्रज्ञान कंपन्यांना समाविष्ट करतो.

**ईव्ही क्षेत्राचा सुवर्णकाळ**

इलेक्ट्रिक वाहने आता केवळ एक पर्यायी निवड राहिली नसून, भविष्यातील मुख्य प्रवाहातील माध्यम बनत आहेत. हा बदल वेगाने का होत आहे?

**१. सरकारी प्रोत्साहन**

भारतात ईव्ही स्वीकारण्यावर भर दिला जात आहे. फेम (फास्टर अडॉप्शन अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रिक व्हेईकल्स) आणि पीएलआय योजनांमुळे ईव्ही उत्पादनाला चालना मिळाली आहे. १.२ लाख कोटींच्या प्रोत्साहनामुळे तसेच बॅटरी स्वॅपिंग योजनांमुळे बाजार वेगाने विस्तारतो आहे. सरकारच्या करसवलती आणि अनुदानामुळे इलेक्ट्रिक वाहने आता संपूर्ण आयुष्यातील खर्चाच्या दृष्टीने पेट्रोल/डिझेल वाहनांपेक्षा स्वस्त ठरत आहेत.

**२. वेगाने वाढणारा बाजार**

भारताच्या ईव्ही क्षेत्राने अलीकडच्या वर्षांत मोठी झेप घेतली आहे. अधिक स्वच्छ आणि शाश्वत वाहतुकीकडे जाण्याची मानसिकता ग्राहक आणि उद्योगधुरीणांमध्ये वाढत आहे.



**चिंतन हरिया**
**प्रिन्सिपल - इन्व्हेस्टमेंट स्ट्रॅटेजी, आयसीआयसीआय प्रुडेंशियल एएमसी**

**३. स्वस्त होत असलेली बॅटरी**

बॅटरी तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे उत्पादन खर्च कमी होत आहे. कमी खर्चामुळे कंपन्यांना अधिक नफा तर ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत वाहने मिळत आहेत.

**४. जागतिक स्तरावर बदल**

जगभरातील देश पेट्रोल आणि डिझेलवर चालणारी वाहने हळूहळू बंद करत आहेत. नॉर्वे २०२५ पासून सर्व नवीन वाहने शून्य-प्रदूषण असतील तर यूके २०३० पासून पेट्रोल/डिझेल वाहन विक्री थांबवणार आहे. भारतही ईव्ही निर्मितीवर लक्ष केंद्रित करत आहे आणि प्रमुख वाहन कंपन्या या दिशेने मोठ्या गुंतवणुकी करत आहेत.

**ईव्ही क्षेत्रात गुंतवणुकीचा स्मार्ट पर्याय**

निफ्टी ईव्ही न्यू एज ऑटोमोटिव्ह ईटीएफ हा निफ्टी ईव्ही आणि आधुनिक ऑटोमोटिव्ह निर्देशांकाचा मागोवा घेतो आणि भारतातील ईव्ही क्रांती घडवणाऱ्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीची संधी उपलब्ध करून देतो. हा ईटीएफ संपूर्ण ईव्ही इकोसिस्टममध्ये विविध स्तरांवर गुंतवणूक करतो - उत्पादक, बॅटरी निर्माते, ऑटोमोटिव्ह सॉफ्टवेअर कंपन्या, तसेच आवश्यक रसायने आणि साहित्य पुरवठादार यांचा समावेश करतो.

त्याच्या क्षेत्रीय वाटपाचा विचार करता, हा निर्देशांक ऑटो घटक (२८.४%), प्रवासी वाहने (२६.१%), माहिती तंत्रज्ञान (१४.२%), दुचाकी/तिपहिया वाहने (१३.३%), रसायने (८.७%), अवजड उपकरणे (३.६%) यांसारख्या विविध विभागांमध्ये समान संतुलन राखतो.

**हा ईटीएफ का खास आहे?**

ईव्ही क्रांतीत थेट सहभाग: केवळ वाहन उत्पादक नव्हे, तर ईव्ही तंत्रज्ञानाशी संबंधित कंपन्यांचा समावेश.

संतुलित गुंतवणूक : एकाच कंपनीवर अवलंबून न राहता संपूर्ण ईव्ही इकोसिस्टममधील महत्त्वाच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक.

स्वस्त व पारदर्शक गुंतवणूक संधी: स्टॉकप्रमाणे ईटीएफ खरेदी-विक्री करता येते, लॉक-इन कालावधी नाही.

सतत बदलणाऱ्या बाजाराशी जुळवून घेतलेली रणनीती : हे निर्देशांक सहा महिन्यांनी पुन्हा संतुलित केले जाते, त्यामुळे भारतातील ईव्ही उद्योगाच्या वाढीसोबतच तुमची गुंतवणूक विकसित होते.

**गुंतवणुकीला गती द्या**

इलेक्ट्रिक वाहनांकडे होणारी वाटचाल केवळ एक ट्रेंड नाही, तर वाहतुकीचे भविष्य आहे. गुंतवणूकदारांसाठी, निफ्टी ईव्ही न्यू एज ऑटोमोटिव्ह ईटीएफ हा भारताच्या ईव्ही क्रांतीत सक्रिय भाग घेण्याचा एक उत्कृष्ट मार्ग आहे. दीर्घकालीन वाढीच्या संधी शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. वाढत्या संधींवर विश्वास ठेवत असाल किंवा भारताच्या स्वच्छ वाहतुकीकडे होणाऱ्या प्रवासाचा भाग व्हायचे असेल, तर हा ईटीएफ या प्रवासात मागे पडू देणार नाही.



# जगणे हे बेभान!

**अश्विनी पांडे**

संस्कृती, परंपरांच्या जोखडातून महिला कधीच बाहेर पडल्या आहेत. मोरपंखी स्वप्नांना सत्यात उतरवण्याची जिद्द आणि परिश्रमांच्या पंखांनी आकाश कवेत घेत आहेत. सर्वच क्षेत्रात महिला आज आघाडीवर आहे. बदलत्या काळाशी जुळून घेत महिला पुरुषांच्या बरोबरीने कदाचित त्यांच्याही पुढे जाऊन स्वत:ला सिद्ध करत आहेत. मात्र, या स्वातंत्र्याचे आता स्वैराचारात रूपांतर होत आहे. बदलत्या काळानुसार महिलांचे विचार बदलले, फॅशन बदलली, राहणीमान बदलले, जीवनशैली बदलली. इतका बदल झाला की पुरुषांप्रमाणे काही महिला, तरुणी व्यसनाधीन बनत आहेत. त्याचा प्रत्यय हायप्रोफाइल हुक्का पार्ट्यांमध्ये येतच असतो. आत्मविश्वास हा यशाकडे नेतो, अतिआत्मविश्वास हा अधपत्तनाचे कारण ठरतो. तसेच काही महिलांच्या बाबतीत होताना दिसत आहे.

एकीकडे महिलांवर अत्याचार होत आहे अशी ओरड होत असताना दुसरीकडे नशापान करत धिंगाणा घातल्याच्या घटनाही घडल्याचे सोशल माध्यमातून दिसून आले आहे. खरे तर सर्वच महिला नशापान करतात असे नाही, तसेच सर्वच महिलांवर अत्याचार होतात असेही नाही. मात्र, समाजात होणारी कोणतीही घटना समाजाचे वास्तव दर्शवणारी असते. नजीकच्या काळात रेव्ह, हुक्का यांसारख्या पार्ट्यांमध्ये तरुण मुली बिनधास्त सहभागी होतात. पाटीत होणाऱ्या अनैतिक कृत्यांचा मुलींना नंतर पश्चात्तापही होतो. खरे तर महिलांमध्ये इतका बिनधास्तपणा येतो कुठून? असा प्रश्न सर्वांच्याच मनात येतो. शिक्षणामुळे आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. आर्थिक स्वातंत्र्यामुळे कोणावरही अवलंबून नसल्याने महिला बेभान होऊन जगताना दिसत आहे.

व्हिस्की, बिअर, वाइनचा पेग रिचवत सिगारेटचे झुरके सोडत, गप्पांचे फड विविध पार्ट्यांमध्ये महिलाही बिनदिक्कतपणे रंगवत आहे. महिलामध्ये दिसत असलेला बिनधास्तपणा अनेक कारणांनी आला आहे. आर्थिक स्वातंत्र्य, आयुष्यातला एकाकीपणा, मानसिक तणाव आणि विशेष म्हणजे महिलांवर होणारे अत्याचारही जबाबदार आहेत. तसेच नवतरुण मुली करत असलेल्या नशेचे कारण आर्थिक चंगळवाद हेही आहे. अर्थिक चंगळवादाच्या नावाखाली मोकाटपणे वागण्यात येत आहे. मात्र, हा बेभानपणा आयुष्य उद्ध्वस्त होण्यास कारणीभूत ठरत आहे. बेभान वागणे आयुष्यभराचा पश्चात्ताप देत आहे.

भारतीय समाजव्यवस्था पुरुषप्रधान असल्याने महिलांना दुय्यम वागणूक मिळत होती. त्यामुळे महिला अबला होत्या. मात्र, समाजसुधारकांनी तथाकथित प्रतिगामी समाजाशी महिलांच्या न्याय्य हक्कासाठी लढा दिला. समाजसुधारकांना तत्कालीन समाजव्यवस्थेचा मोठा विरोध पत्करावा लागला. त्यांच्या लढ्याला यश आले आणि महिलांना समाजात सन्मानाची वागणूक मिळण्यास सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, राजाराम मोहन रॉय यांच्या लढ्यामुळे महिलांना समाजातील अनिष्ठ प्रथातून मुक्ती मिळाली. सावित्रीबाईंमुळे शिकता आले. शिक्षणातून महिलांना स्वातंत्र्य मिळाले. मात्र, त्याच स्वातंत्र्याचा आजच्या काळात स्वैराचार झाला आहे, हे मात्र निश्चितच.

# नोकरी

## सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी

- पद : सहाय्यक कार्यालय अधीक्षक, सहाय्यक शिक्षण अधिकारी, सुरक्षा पर्यवेक्षक, लिपिक / टंकलेखक, शिपाई (पुरुष).
- नोकरी ठिकाण : नाशिक.
- अर्ज करण्याची पद्धत : ऑनलाइन.
- अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख : १९ मार्च २०२५
- अर्ज करण्याची शेवटची तारीख : २५ मार्च २०२५
- वेबसाइट : : https://bhonsala.in/
- नवोदय विद्यालय समिती, क्षेत्रीय कार्यालय, पुणे
- पद : पीजीटीएस, टीजीटी, ग्रंथपाल आणि स्टाफ नर्स
- नोकरी ठिकाण : पुणे, जळगाव आणि वर्धा
- अर्ज करण्याची पद्धत : ऑनलाइन.
- अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख : १८ मार्च २०२५
- अर्ज करण्याची शेवटची तारीख : ३० मार्च २०२५
- निवड प्रक्रिया : मुलाखत.
- मुलाखतीची तारीख : ०३, ०४, ०५ एप्रिल २०२५.
- मुलाखतीची पत्ता : नवोदय विद्यालय पुणे, जळगाव आणि वर्धा
- वेबसाइट : https://navodaya.gov.in/

## महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्स्फॉर्मेशन

- पद : अवर सचिव, संशोधन अधिकारी
- एकूण रिक्त पदे : ०२ पदे.
- नोकरी ठिकाण : मुंबई.
- अर्ज करण्याची पद्धत : ऑनलाइन (ई-मेल).
- अर्ज करण्याची शेवटची तारीख : २६ मार्च २०२५
- आवेदन पाठवण्याचा ई-मेल पत्ता: admin-mitramah.gov.in
- वेबसाईट : https://mahades.maharashtra.gov.in/

# समज-गैरसमज

**स्पंदन**

आयुष्यात अनेक वेळा सगळे सुरळीत सुरू असताना अचानक काही तरी विपरीत घडते. आणि अचानक असे काही तरी घडते आणि होत्याचं नव्हतं होतं. याचा आपण विचार करत बसतो की असं कसं झालं. पण अनेक वेळा चांगले नाते, मैत्री, प्रेम अशा जवळच्या नात्यात वितुष्ट येतात आणि त्या वितुष्टाचे एकमेव कारण म्हणजे गैरसमज हाच असतो. आपल्याकडून आपल्या जवळच्याच माणसाविषयी गैरसमजामुळे ग्रह करून घेतो. आणि कालांतराने नाते तुटून जाते. दुसऱ्याकडून आपल्या माणसाबद्दल ऐकणे किंवा कोणत्याही गोष्टीची एकाच बाजू ऐकून घेणे हेच गैरसमजाचे मुख्य कारण असतं. त्यासाठी आयुष्यात कधीही आपल्या माणसाविषयी गैरसमज होतो तेव्हा त्या गैरसमजाच्या मुळाशी जाऊन सत्य जाणून घ्यायला हवे. तर आणि तरच गैरसमज दूर होऊन नात्यातला गोडवा टिकू शकतो. गैरसमज होऊ नये, असे वाटत असले तर कोणतीही गोष्ट योग्यरित्या समजून घेणे आवश्यक आहे. गैरसमज म्हणजे समजून न घेतलेली गोष्ट! आयुष्यात कटू गोड प्रसंग येतच असतात. त्यातून आपण सर्व सावरत सामोरे जातो. पण गैरसमज हा भुंग्यासारखा असतो. तो चांगल्या नात्याचा पाया खिळखिळा करतो. त्यासाठी नाते निर्माण होताना आणि नाते तयार झाल्यावर फक्त विश्वासाच्या आधारावर असावे ...विश्वास असेल तरच नाते जन्मोजन्मी टिकून राहते.



## कॉलेज तरुणींमध्ये लोकप्रिय असलेले फंकी आणि स्टेटमेंट ज्वेलरी प्रकार

**१. मोठे आणि अनोखे इअररिंग्ज**

इअररिंग्ज हा तरुणींच्या लूकचा महत्त्वाचा भाग आहे. मोठे झुमके, हूप्स, टॅस्सल इअररिंग्ज, आणि अतरंगी डिझाईन्समधील कानातले सध्या लोकप्रिय आहेत. ऑक्सिडाइज्ड, मेटल, बीडेड आणि ॲक्रेलिक मटेरिअलमधील मोठ्या आकाराचे कानातले कोणत्याही साध्या आउटफिटला फॅशनेबल लुक देऊ शकतात.



**२. लेयर्ड आणि स्टेटमेंट नेकलेस**

स्टेटमेंट नेकलेस हा साध्या ड्रेसला हटके लुक देण्यासाठी उत्तम पर्याय आहे. लेयर्ड नेकलेस, चोकर, मोठ्या पेंडंट असलेले लांब माळ, बीडेड आणि मेटल नेकलेस यांचा समावेश यामध्ये होतो. टर्टलनेक किंवा डीप नेकलाइन टॉपवर हे नेकलेस अप्रतिम दिसतात.

# फ्रेन्ड झोन

**काव्या देसाई**



दोन वर्षांपूर्वीची गोष्ट, आम्ही मराठी साहित्याचे पदव्युत्तर शिक्षण घेत होतो. पदव्युत्तर शिक्षणाची दोन वर्ष त्यातील आमची दिड वर्ष संपलेली. त्यामुळे प्रत्येकाचा वेगवेगळा असा 'फ्रेंड झोन' तयार झालेला. त्यातच पदव्युत्तर शिक्षण त्यामुळे काही जण शिक्षण पूर्ण करत असताना नोकरी करणारे म्हणजे खर्या अर्थाने मोठे झालेले.पण माणूस कितीही मोठा झाला तरी त्याच्यात लहान मुल दडलेले असते.अगदी आमच्यातही ते दडलेले होते, म्हणजे आताही आहे.कॉलेज हे रेग्युलर करायच नसतं, हा जणू अलिखित नियमच असतो. पण मी मात्र रेग्युलर कॉलेज करायचे. त्यामुळे वर्गात दोन ग्रुप एक रेग्युलर लेक्चरला येणारा आणि दुसरा फक्त सबमिशन्सला येणारा.त्या दिवशीची गोष्ट माझा वाढदिवस होता,सबमिशन्समुळे पूर्ण वर्ग हजर होता. माझ्या काही जवळच्या मैत्रीणीनी माझा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले. त्यामुळे वर्गातील सर्वजण त्या वाढदिवसाला उपस्थित होते,सगळं खुप छान प्रकारे झाल.पण कळत नकळत झालेल्या गैरसमजातून किंवा आमच्यात दडलेल्या लहान मुलामुळे आमच्यात वाद झाला. वादाच कारण आता आठवत नाही. पण या वादामुळे वर्गातले सर्वजण एकत्र आले आणि याच वाढदिवसाच्या कारणांमुळे मला सख्खी मैत्रिण मिळाली. तिचं नाव भक्ती!

भक्ती, नोकरी करत असल्याने सबमिशन्सलाच येणारी! डॅशिंग, मनमोकळी, स्वत:ची वेगळी छाप पाडणारी, कशालाही न घाबरणारी, आत्मविश्वासाने जगणारी, अगदी टॉम बॉय, स्टाईलिश, तिच्याकडे बघितल्यावर अटिट्यूड आहे अशी वाटणारी पण तिच्याशी बोलल्यावर खुल्या पुस्तकाप्रमाणे भासणारी मनमोकळी! तिची माझी ओळख झाली तेव्हा कळल की ती गुजराती कुटुंबातून आहे. पण तरीही ती मराठी साहित्याचे शिक्षण घेत आहे, त्यामुळे तिचे मला कुतूहल वाटले. तिच्या बोलण्यात मराठीसोबत गुजरातीचा लहेजा आहे. त्यामुळे तिच्या बोलण्यात वेगळाच गोडवा आहे. हळदीला हलदी म्हणणारी ती नटखट वाटते. रेग्युलर नसणारी ती ग्रुपची मात्र क्वीन होती, ते तिच्या स्वभावामुळे.!

मी मात्र पूर्णपणे तिच्या विरोधी स्वभावाची. मी खूप बोलकी आहे पण स्वतः:ला सावरत असलेली, बावरलेली. भक्ती आणि मी म्हणजे पूर्व -पश्चिम आहोत. दोघींचे जगण्याचे मार्ग वेगळे, विचार वेगळे, समस्या वेगळ्या इतकंच काय तर स्वभावही वेगळे पण आम्ही दोघी मनाने एक आहोत त्यामुळे आमच्यात घट्ट मैत्रीचे ऋणानुबंध जुळले. आमच्यात गेल्या दोन वर्षांतील एकही दिवस असा नसेल की आम्ही बोललो नाही. बोलण्यासाठी आम्हाला कोणताच विषय वर्ज्य नाही.

वाढदिवसाला घडलेल्या त्या वादामुळे आमच्यात छान मैत्री झाली आणि ती दिवसेंदिवस घट्ट होत राहील. गेल्या दोन वर्षांत आम्ही एकमेकींसोबत अमर्याद बोललो. आमच्यात अनेकवेळा टोकाचे वाद झाले, पण आमची मैत्री तुटली नाही ती फुलत गेली. किती तरी असे प्रसंग जे आम्ही विसरू शकणार नाही. ट्रीप्सी असल्यामुळे आमची पकडलेली स्कूटी आणि मग पोलिसांना उत्तर देताना आमची उडालेली तारांबळ...! कॉलेजच्या वॉचमनला खोटं कारण सांगून कॉलेजमध्ये रविवारी केलेला प्रवेश..! हे प्रसंग आम्ही कधीच विसरू शकणार नाही. हीच तर असते मैत्री..! कधी खोटं तर कधी खरं बोलून जगलेले कटू गोड प्रसंग..! या निमित्ताने एवढंच म्हणेल हर एक फ्रेंड जरूरी होता...! Love you dear friends...Love you dear Bhakti.




# स्पर्धा परीक्षा देताय?

**सौ.अलका सानप (सांगळे)**

आयुष्याच्या शैक्षणिक वाटचालीत अनेक वेळा कोणत्या ना कोणत्या कारणावरून अपयश येत असते आणि त्यामुळे तुम्ही प्रशासकीय अधिकारी किंवा एका चांगल्या नोकरीस मुकण्याची वेळ येते. प्रशासकीय अधिकारी, आयएएस अधिकारी किंवा त्यापेक्षाही चांगल्या अनेक करिअरच्या संधी उपलब्ध असतात.

प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी आपल्याला देशातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि वय वर्षे २१ वर्षे पूर्ण असणे गरजेचे असते. आयुष्याच्या शैक्षणिक वाटचालीत अनेक वेळा कोणत्या ना कोणत्या कारणावरून अपयश येत असते, आणि त्यामुळे तुम्ही प्रशासकीय अधिकारी किंवा एका चांगल्या नोकरीस मुकण्याची वेळ येते. प्रशासकीय अधिकारी, आयएएस अधिकारी किंवा त्यापेक्षाही चांगल्या अनेक करिअरच्या संधी उपलब्ध असतात, पण त्याबाबत आपण बरेच वेळा असता अनभिज्ञ असतो. त्यासाठी विविध पदभरतीसाठी काही प्रक्रिया राबविल्या जातात. त्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स फॉलो कराव्यात. सर्वांत प्रथम या परीक्षेसाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, याची एक यादी तयार करावी.



कोणतेही दिलेली परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांनी या अगोदर स्वतःचे आत्मपरीक्षण मनापासून करणे गरजेचे असते. जे क्षेत्र आपल्याला आवडते, त्या आवडत्या क्षेत्रात प्रथम आपण प्रयत्न करावेत, प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळते.

स्पर्धा परीक्षा पास होण्यासाठी केव्हा केव्हा पाच वर्षांचा कालावधी देखील लागू शकतो एवढा वेळ, पैसा, क्षमता, हे आपण आपले तपासून पहावे, ते करत असताना सतत अपयश येत असल्यास विद्यार्थ्यांनी निराश न होता यशस्वी होण्यासाठी आपल्याला अजून काय प्रयत्न करता येतील, ते पुन्हा पूर्ण आत्मविश्वासाने करणे गरजेचे आहे. अजून वेगळे आणि उत्तम काय करता येईल,ते तपासून पाहावे.

कधी कधी वारंवार पाठपुरावा करूनही हवं तसं यश मिळत नसेल तर दुसरा पर्यायी मार्गही तयार ठेवावा.

लेखन कौशल्य कसे विकसित करता येतील, त्यासंदर्भात विचार करा व लेखनाची सवय, तयारी ठेवा. कारण स्पर्धा परीक्षेची उत्तरपत्रिका लिहिताना लेखन कौशल्य, बुलेट पोइंट्स, योग्य आणि ठराविक ठिकाणी आकृती कशा काढाव्यात, हे सर्व अवगत असणे गरजेचे असते. कारण तुम्ही किती मोठा परिच्छेद लिहिता याला महत्त्व नसतं. तर त्यामध्ये योग्य, मुद्देसूद लेखन असणे हा कौशल्याचा भाग आहे. आणि सर्वात महत्त्वाचे स्पर्धा परीक्षांसाठी एमपीएससीसाठी वयाची अट ही किमान १९ वर्षं आहे तर ३८ वर्षांपर्यंत तुम्ही कितीही वेळा परीक्षा देऊ शकता.

तसेच यूपीएससीसाठी वयाची अट ही किमान २१ वर्षं तर वयाच्या ३२ पर्यंत तुम्ही ६ वेळा परीक्षा देऊ शकता. त्यामधे आरक्षणानुसार यामध्ये बदल मात्र नक्कीच होतात. त्यामुळे आपल्या जीवनात आपण या सर्व बाबींचा समावेश करून यश नक्कीच मिळवू शकतात.



# लाइफ पार्टनर...

## स्ट्रेस कमी करा... भाग ३६

**विलास पंचभाई ७७७४९५५८९२**

काल मित्राशी गप्पा मारताना सहज विचारलं वहिनीला काही मदत करतो का? तो लागलीच म्हणाला. पळ रे तिकडे! जॉब करते एवढे पहाटे उठते. स्वयंपाक पाणी सर्व करून मग जात office ला, तू काय करतो, चहा करतो, घर झाडतो, भांडे विसळतो, भाजी चिरतो, मग स्वयंपाक करतो, का यापैकी काहीच नाही करत.

तो म्हणाला, 'गप्प बस...!'

हा त्याचा परवलीचा शब्द.

मनच काम माले गण शे.

काय करतो तू या पैकी. वहिनीला काय मदत करतो.

मी फिराले जास. भाजी लयस लाईट बिल भरस. बस. वहीनीला का नाही मदत करत. त्याचे उत्तर आमनामा नाही करतंस. तुले नाही समजस. गप्प बस.

म्हणजे काय तर अजूनही माणूस परंपरेच्या जोखड मधून बाहेर पडायला तयार नाही ए. बायको शिकली मुलगी शिकली प्रगती झाली. खाद्यांला खांदा लावून लढू लागली तरी म्हणे, पुरुषप्रधान संस्कृतीच आमची आहे. हे कसं शक्य आहे. तिचा पगार मात्र हवा हवासच वाटतो ती ही आपल्या संसाराच्या रथाचे एक चाक आहे.

सकाळची जॉब असणाऱ्या स्त्रियांना सकाळी किती धावपळ होते किती ताण तणाव डोकं भनभनत अक्षरशः नोकरीच्या ठिकाणी घरातलं आणि अशात त्यांना मदतीला जर कोणी करत नसेल तर त्यांची आग मस्तकाला जाईल नाही का? होते आग पण बिचारी दाबत असते. डोकं शांत ठेवून सगळं सोसत असते. कारण आता घेतली जबाबदारी खांद्यावर ती पूर्ण करायची आहे.

पण पुरुषांनी जर स्त्रियांना जॉब करत असतील तर नक्कीच काहीतरी हातभार लावावा मदत करावी त्यामुळे त्यांचा पुरुषाबद्दलचा आदरभाव वाढीस जातो व प्रेम ही!

आणि हे काम केल्याने आपल्याला देखील रोजची सवय होऊन जाते त्यामुळे शरीराची देखील हालचाल होते आणि बायकोला मदत केल्याचा आनंदही मिळतो. पण हे सर्व आनंद घेणाऱ्याला आहे बर का!

मुलं-मुली ही शाळा. कॉलेज वा नोकरी मुळे आईच्या मदतीला येत नाही. मग तिची चिडचिड होतेच; पण ती दाखवत नाही

त्याचा परिणाम आरोग्यावर होतो.

जी नोकरी वाली बायको असते तिला खरंच घरदार संसार आत बाहेर सर्वच सांभाळावा लागतो त्यामुळे त्याची मानसिकता खूपच गंभीर होत असते तेव्हा आपणच तिला सांभाळून घ्यायला हवं नाही का? कारण की जे काही करते ती फक्त आपल्या संसारासाठी करत असते आणि आपण संसार थाटत असतो आणि जर आपणच नाही समजून घेतलं तर मग तिने करायचं कोणासाठी हा प्रश्न उरतो. दुसऱ्यालाही स्ट्रेस असतो आपण समजून घ्यायला हवे. आपण समजून घेतले तर ऑफिसचा स्ट्रेस ती आपल्याजवळ शेअर करेल त्यामुळे मन हलके होते. एक चांगला लाईफ पार्टनर आपल्याला मिळाला याचं समाधान चेहऱ्यावर असते. बायकोला मदत करायला कुठलाही कमी पणा नाही. उलट हा एक आदरभाव आहे आपल्या जोडीदारा सोबत.

ती ऑफिस मधून आली आणि आपण तिला एक कप चहा बनवून दिला तर...तिचा स्ट्रेस कुठल्या कुठे पळून जाईल...बघा पटतंय का..करून तर पहा..!

## महत्त्वाचे

### लासलगाव ते वाकी रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची मागणी

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव शहरातील गुंजाळ पेट्रोलपंप ते पिंपळगाव नजीक, वाकी रस्त्यावर वाहतूक नियंत्रणात आणण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी कमीत कमी तीन ठिकाणी तातडीने गतिरोधक बसविण्यात यावेत अशी मागणी या रस्त्यावर असलेल्या जिजामाता प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला पाठवलेल्या निवेदनात केली आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून लासलगाव ते पाटोदा रस्त्यावरील शिवनदीवरील पुलाचे काम अत्यंत युद्ध पातळीवर सुरू असल्यामुळे या पुलावरून वेळापूर, आंबेगाव, पाटोदा या गावाकडे जाणारी अनेक वाहने पर्यायी रस्ता म्हणून गुंजाळ पेट्रोलपंप ते पिंपळगाव नजीक, वाकी या रस्त्यावरून जात असल्यामुळे या रस्त्यावर वाहनांची रहदारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या रस्त्यावरून ये-जा करणारी वाहने अत्यंत भरगाव वेगाने जात असल्यामुळे विद्यार्थी तसेच नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडावा लागत आहे. या रस्त्यावरून पाच ते सहा शाळा व दोन महाविद्यालयाचे विद्यार्थी ये-जा करतात, मात्र या रस्त्यावरून वाहने अत्यंत भरगाव वेगाने जात असल्यामुळे विद्यार्थी जीव मुठीत घेऊन शाळेत जात आहे. या परिस्थितीची सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दखल घेऊन सदरची वाहतूक नियंत्रणात आणण्यासाठी व अपघात टाळण्यासाठी या रस्त्यावर कमीत कमी तीन ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवणे अत्यंत गरजेचे आहे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### जानोरी येथे इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन

**दिंडोरी : प्रतिनिधी**

भाजपाचे नाशिक ग्रामीणचे जिल्हा उपाध्यक्ष योगेश तिडके यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आज शुक्रवार दि. २१ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत जानोरी, ता. दिंडोरी येथील ग्रामपंचायत पटांगण येथे आयोजन करण्यात आले असून, या सोहळ्यासाठी ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे समाजप्रबोधनवर भव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. योगेश तिडके यांचा २ मार्च रोजी वाढदिवस होता. त्यांनी तो साध्या पद्धतीने साजरा केला. तसेच त्यांनी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भेट देऊन आश्रमातील मुलांना अन्नदान वाटप केले. तसेच आज वाढदिवसाचे औचित्य साधून हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे कीर्तन ठेवण्यात आले. तरी जानोरी व पंचक्रोशीतील नागरिकांनी निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या भव्य अशा कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक टेंभी नाका जानोरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**ओझर : बोरस्ते विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ आकर्षक गुढ्या बनविल्या. याप्रसंगी मुख्याध्यापक सोपान वाटपाडे, अभिनवच्या मुख्याध्यापिका वनिता शिरसाठ, प्रभाकर लवांड, मोनाली निकम, वर्षा पाटील व विद्यार्थी.**

### बोरस्ते विद्यालयात टाकाऊ वस्तूंपासून आकर्षक गुढ्या

**ओझर : वार्ताहर**

विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांचा विकास व त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने माधवराव बोरस्ते विद्यालयात आयोजित टाकाऊ वस्तूंपासून गुढ्या बनविणे कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कार्यानुभव अंतर्गत टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ आणि सर्वधर्मसमभाव संस्कृती संवर्धन अंतर्गत आकर्षक गुढ्या बनवल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सोपान वाटपाडे होते. व्यासपीठावर अभिनवच्या मुख्याध्यापिका वनिता शिरसाठ, क्रीडाशिक्षक प्रभाकर लवांड उपस्थित होते. या उपक्रमात पाचवी ते सातवीचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांना कलाशिक्षिका मोनाली निकम, वर्षा पाटील यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करीत शक्य असल्यास विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात गुढ्या बनवून त्यांची विक्री करावी, त्यातून विद्यार्थ्यांना व्यवहारी ज्ञान मिळेल असे आवाहन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन मोनाली निकम यांनी केले.

### ओझरला बोरस्ते विद्यालयात रंगपंचमी साजरी



**ओझर : वार्ताहर**

येथील 'मविप्र' संचलित माधवराव बोरस्ते विद्यालयात शिक्षिकांनी रंगपंचमीनिमित्ताने विविध रंगांची उधळण करत नावीन्यपूर्ण रंगपंचमी साजरी केली. जिजाऊंची प्रेरणा, शिवरायांचे विचार, संभाजी महाराजांचा पराक्रम, सावित्रीचा त्याग, महात्मा फुलेंचे शिक्षण, बाबासाहेबांची प्रज्ञा शोध करूना, अण्णा भाऊंची शाहिरी, गाडगेबाबांची स्वच्छता, अब्दुल कलामांचे मिसाइल, ताराराणीचा पराक्रम, अहिल्याबाई होळकरांचा कारभार, विश्वकल्याणकारी प्रार्थना, माणसाला माणूस जोडण्याचा, माणसात देव शोधण्याचा संकल्प करून टिक्का लावत मोठ्या उत्साहात रंगपंचमी उत्सव साजरा केला. याप्रसंगी मोनाली निकम, वर्षा पाटील, शीतल हांडोरे, मेघा शेजवळ, शीतल आहेर, राजश्री टरले, योजना खैरनार, वनिता अहिरे, मनीषा मोगल, वैशाली कातकाडे आदी सर्व शिक्षिका उत्सवात सहभागी झाल्या होत्या.

# लासलगाव येथून रेल्वेने कांदा लोडिंग दोन महिन्यांपासून बंद

## प्रयागराज येथील महाकुंभमेळ्याचा परिणाम



**लासलगाव : वार्ताहर**

**मध्य रेल्वेच्या लासलगाव रेल्वे स्टेशनला कांदा वाहतुकीतून रेल्वेला वर्षाला १२ ते १५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते, मात्र गेल्या दोन महिन्यांपासून उत्तर प्रदेश येथील प्रयागराज येथे महाकुंभमेळा असल्यामुळे भाविकांची गर्दी पाहता या मार्गावर देशभरातून मोठ्या प्रमाणात प्रवासी गाड्या सोडण्यात आल्यामुळे या मार्गावरील मालगाड्यांचे थांबे रद्द केले आहे.**

यामुळे कांद्याचे आगार असलेल्या लासलगाव येथील रेल्वे स्टेशनवरून पटनाकडे जाणाऱ्या सर्व मालगाड्या रद्द केल्यामुळे लासलगाव येथून एकही कांदा गेल्या दोन महिन्यांपासून लोडिंग न झाल्यामुळे रेल्वेला मिळणाऱ्या कोटींच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागले तर व्यापाऱ्यांना तिप्पट भाडे खर्च करून ट्रकच्या माध्यमातून कांदा हा परराज्यात पोहोचवण्याची वेळ आली आहे. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या कांद्याच्या बाजारभावावर होत असल्यामुळे महाकुंभमेळा संपल्यामुळे पुन्हा मालगाडीच्या माध्यमातून कांद्याची लोडिंग करत वाहतूक सुरू करावी, अशी मागणी कांदा व्यापाऱ्यांकडून जोर धरू लागली आहे.

कांदा म्हटले की, तोंडात नाव येते ते लासलगावचे. दररोज लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दोन ते तीन कोटी रुपयांची कांद्याची उलाढाल होत असते. हा कांदा देशांतर्गत तसेच विदेशातही निर्यात केला जातो. देशांतर्गत व बांगलादेशात कांद्याची रेल्वे मालगाडीच्या माध्यमातून निर्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. मध्य रेल्वेच्या एकट्या लासलगाव रेल्वे स्थानकातून दरवर्षी १२ ते १५ कोटी रुपयांचे कांदा वाहतुकीतून रेल्वेला उत्पन्न मिळते. गेल्या नऊ महिन्यांत १० कोटींचे उत्पन्न कांदा वाहतुकीतून मिळाले आहे तर मका वाहतुकीतून सव्वा कोटीचे उत्पन्न मिळाले आहे. अशाच पद्धतीने खेरवाडी, कसबे सुकेणे आणि नगरसूल या रेल्वे स्टेशन येथून कांद्याची वाहतूक करण्यात येते, मात्र प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून रेल्वे मालगाडीच्या माध्यमातून परराज्यात एकही कांद्याची वाहतूक न झाल्याने लासलगाव, खेरवाडी, कसबे सुकेणे आणि नगरसूल या चार रेल्वे स्टेशनचे अंदाजे सात ते आठ कोटी रुपयांच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागले.

> प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यामुळे लासलगावसह नाशिक जिल्ह्यातील रेल्वेच्या इतर स्टेशनवरून कांद्याची वाहतूक बंद असल्यामुळे कांदा व्यापाऱ्यांना राज्यात खरेदी केलेला कांदा हा ट्रकने पाठवण्याची वेळ आल्याने रेल्वेच्या तुलनेत ट्रकमधून कांदा पाठवण्यासाठी तिप्पट भाडे मोजावे लागले. आता महाकुंभमेळ्याची सांगता झाल्याने आता पुन्हा रेल्वेच्या माध्यमातून कांदा वाहतूक सुरू करावी, जेणेकरून जास्तीत जास्त कांदा हा परराज्यात पाठवता येईल आणि वाहतूक खर्च कमी होण्यास मदत मिळेल. याचा अप्रत्यक्ष फायदा हा कांद्याच्या बाजारभावातून शेतकऱ्यांनाही मिळेल.
> **प्रवीण कदम**
> कांदा निर्यातदार व संचालक, लासलगाव

# सरस्वती शाळेत पक्ष्यांसाठी 'मूठभर धान्य, घोटभर पाणी' उपक्रम

## जागतिक चिमणी दिनानिमित्त राबविला उपक्रम

**लासलगाव : प्रतिनिधी**

**निसर्ग साखळीमध्ये पक्ष्यांचे अनन्यसाधारण महत्त्व ओळखून पक्ष्यांची ऱ्हास होत चाललेली संख्या वाढविण्यासाठी आणि त्यांचे संवर्धन करण्यासाठी सरस्वती विद्यामंदिर लासलगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी जागतिक चिमणी दिनानिमित्त पक्ष्यांसाठी 'मूठभर धान्य, घोटभर पाणी' हा उपक्रम राबविला.**

विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून पक्ष्यांना खाद्य खाण्यासाठी व पाणी पिण्यासाठी विविध प्रकारची २४२ भांडी तयार केली. शाळेच्या परिसरात असणाऱ्या झाडांना विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने ती अडकविली. शाळेच्या परिसरातील अमृतनगर, विद्यानगर, उमेशनगर, गुरुसावली, सुमतीनगर, नंदनगर आदी नगरांमध्ये घरोघरी जाऊन पक्ष्यांसाठी बनविलेल्या या भांड्यांचे नागरिकांना वितरण करत आपल्या घराच्या परिसरात ते लावण्याचे विद्यार्थ्यांनी आवाहन केले.



**पक्ष्यांसाठी बनविलेल्या भांड्यांचे नागरिकांना वितरण करताना सरस्वती शाळेचे विद्यार्थी. (छाया : समीर पठाण)**

पक्ष्यांच्या संवर्धनासाठी शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमाची नागरिकांनी प्रशंसा केली व विद्यार्थ्यांच्या संवेदनशीलतेचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष जगदीश होळकर, उपाध्यक्ष सुलेमान मुलानी, सचिव गुणवंत होळकर, संचालक बाळासाहेब बोरसे, सुनील शिंदे, डॉ. विकास चांदर, संदीप होळकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक भीमराव शिंदे आदींनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

या उपक्रमासाठी प्रदीप ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सुनील आव्हाड, कैलास पातळे, संदीप सूर्यवंशी, नवनाथ जिरे, कांचन शेलार, धर्मेंद्र निकम, रूपाली शिंदे, मोहन नाईक, सोनाली होळकर, स्वप्नील आहिरे, सुनील होळकर, रूपाली दिवटे, हर्षाली रसाळ, सोनाली बागुल, वर्षा गुंजाळ, तुषार फेंगडे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

> विद्यार्थ्यांच्या अंगी चांगले संस्कार आणि मूल्य विकसित होण्यासाठी शाळास्तरावर नेहमीच विविध उपक्रम घेतले जातात. जागतिक चिमणी दिवसाच्या निमित्ताने पक्षी संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी राबवलेला हा उपक्रम पक्ष्यांप्रति संवेदनशीलता जोपासणारा आहे.
> **भीमराव शिंदे**, मुख्याध्यापक, सरस्वती विद्यामंदिर, लासलगाव

> पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्राणी, पक्ष्यांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. याचे महत्त्व ओळखून शालेय विद्यार्थ्यांनी राबविलेला हा उपक्रम समाजातील सर्वांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल या सर्व विद्यार्थ्यांचे खूप खूप कौतुक. **-जगदीश होळकर,** अध्यक्ष, लासलगाव विद्याप्रसारक मंडळ

# सापांना मारण्यापेक्षा नीट हाताळण्याची गरज : सर्पमित्र पटेल

**लासलगाव : वार्ताहर**

**साप हा पर्यावरणाचा महत्त्वाचा घटक असून, त्यांना मारण्यापेक्षा योग्य पद्धतीने हाताळण्याची गरज आहे. पृथ्वीवर मनुष्याप्रमाणे मुक्या प्राण्यांनाही जीवन जगण्याचा अधिकार आहे. कधी- कधी मनुष्याच्या चुकीमुळे प्राण्यांना आपले प्राण गमवावे लागतात. त्यामुळे सापाला इजा न करता वन विभाग किंवा सर्पमित्रांना सूचना द्यावी, असे आवाहन निसर्ग वन्यजीव सर्प व प्राणीमित्र असिफ पटेल यांनी केले आहे.**

साप किंवा नाग म्हटल्यावर कोणाचाही थरकाप उडतो. दिवसेंदिवस सापांच्या संख्येत लक्षणीय घट होत असल्याने पर्यावरण संवर्धन धोक्यात येत आहे. निसर्गाच्या अन्नसाखळीत सापांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. फेब्रुवारी ते एप्रिल हा सापांचा मिलन काळ असल्याने या काळात ते जास्त सक्रिय असतात. नागरिकानी योग्य खबरदारी घेतली नाही तर साप मानवी वस्तीत येण्याची शक्यता वाढते. साप आढळल्यास नागरिकांनी



घाबरू न जाता सर्पमित्रांना बोलवावे तसेच सापाला मारण्याचा प्रयत्न करू नका. साप निसर्गाचा महत्त्वाचा घटक आहे. योग्य खबरदारी घेतल्यास मनुष्य आणि सापाचे सहजीवन शक्य असल्याचे पटेल यांनी सांगितले. शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने साप हा मित्र आहे. शेतात पिकांचे नुकसान करणाऱ्या उंदरांचा नायनाट करण्यासह महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या या सापाला अनेकदा मारले जाते. घराच्या परिसरात शेतात आढळणारे सर्वच साप हे विषारी नसून, फक्त नाग, फुरसे, मणियार, पोवळा हेच साप विषारी आहेत. सध्या मिलनकाळ सुरू असल्यास नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज असल्याचे पटेल यांनी सांगितले.

# लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनतर्फे पर्यावरणपूरक रंगपंचमी साजरी

**लासलगाव : वार्ताहर**

**लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनतर्फे रंगपंचमी उत्सव सांस्कृतिक परंपरा जपत, नैसर्गिक रंगांच्या वापरावर भर देत आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत साजरा करण्यात आला. डॉक्टर्स आणि त्यांच्या कुटुंबियांनी रासायनिक रंगांना फाटा देत, नैसर्गिक आणि पाण्याविना खेळता येणाऱ्या रंगांच्या माध्यमातून रंगपंचमीचा आनंद लुटला. सण साजरा करताना निसर्गाचे संरक्षण ही काळाची गरज आहे. हा महत्त्वाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.**

रंगपंचमी हा केवळ रंगांचा सण नाही तर तो निसर्ग आणि आरोग्यासोबत जोडलेला एक महत्त्वाचा सण आहे. नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत करून आपण सणाचा आनंद घेतानाच पर्यावरण रक्षणातही योगदान देऊ शकतो. नागरिकांनी जबाबदारीने आणि पर्यावरणस्नेही पद्धतीने रंगपंचमी



**नैसर्गिक रंगाचा वापर करत पर्यावरण पूरक रंगपंचमी साजरी करतांना लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनचे सदस्य (छाया : समीर पठाण)**

साजरी करावी असे लासलगाव डॉक्टर्स असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. स्वप्निल जैन यांनी यावेळी सांगितले. लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनतर्फे भविष्यातही पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला.

यावेळी डॉ.विलास कांगणे,डॉ. सुरेश दरेकर, डॉ.स्वप्नील जैन, डॉ. कैलास पाटील, डॉ मृगेश शाह, डॉ अमित धांडे, डॅा प्रताप पवार, डॉ अनिल बोराडे, डॉ सोनल सोनवणे, डॉ श्रीधर दायमा, डॉ संजय पालोड, डॉ अमोल गायकर, डॅा विनोद लोहाडे, डॅा सचिन जांगडा, डॉ प्रणव माठा, डॉ विजय केंगे, डॉ चारुदत्त अहिरे, डॉ उषा बनसोडे, डॉ अमोल शेजवळ, डॉ सुजित गुंजाळ, डॉ पौरव गांगुर्डे, डॉ विक्रम होळकर, डॉ गौरव माठा, मनीषा आवारे, पुष्पा ताई दरेकर डॉ रोहिणी ठाकरे, डॉ प्रियांका गायकर, डॉ मनिषा पालोड, डॉ भाग्यश्री सोनवणे, डॉ अर्चना लोहाडे उपस्थीत होते.

# वाजगावच्या अरुंधतीची अधिकारीपदाला गवसणी

**देवळा : प्रतिनिधी**

**खडतर मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर काहीच अशक्य नाही हे सिद्ध करत तालुक्यातील वाजगाव येथील शेतकरी कुटुंबातील कन्याने उत्तुंग अशी भरारी घेत अरुंधती भाऊसाहेब देवरे हिने घवघवीत यश संपादन करून समाजात आपले मानाचे स्थान निर्माण केले आहे.**

महाराष्ट्र शासन नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत नगररचना सहाय्यकपदी हिची निवड झाली. अरुंधती भाऊसाहेब देवरे ही देवळा तालुक्यातील वाजगाव येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन विष्णू देवरे यांची पुतणी तर प्रगतिशील युवा शेतकरी भाऊसाहेब देवरे यांची कन्या असून, तिचे प्राथमिक शिक्षण सुरुवातीला देवळा येथील शारदादेवी ज्ञानविकास मंदिर तर पाचवी ते दहावीचे शिक्षण जिजामाता कन्या विद्यालयात झाले. पुढील शिक्षण उच्च माध्यमिक नाशिक येथील केटीएचएम कॉलेजमध्ये घेऊन पुढे तिने छत्रपती संभाजीनगर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय बीटेकच्या (सिव्हिल इंजिनिअरिंग ) पदवित विशेष प्रावीण्य मिळवत नामांतिक



**अरुंधती देवरे हिचा सत्कार करताना जि. प.चे माजी सभापती शैलेश पवार, दीपक पवार आदींसह अरुंधतीचे आई, वडील. (छाया : विनोद देवरे)**

कंपनीत कॅम्पसमध्ये सिलेक्शन झाले होते. त्यानंतर अरुंधतीला संगमनेर येथे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात नोकरी मिळाली. नोकरी करत असतानाच तिने महाराष्ट्र शासनाच्या नगररचना विभागाच्या लेखी परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय यश संपादन करत मूल्यनिर्धारण विभागांतर्गत नगररचना सहाय्यक अधिकारी म्हणून नियुक्ती मिळवली.

जिद्द, चिकाटीच्या जोरावर अरुंधतीने यश संपादन केले. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण घेऊन अरुंधती देवरे हिने अल्पावधीतच उच्चपदावर शिखर गाठल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अरुंधती देवरे हिची महाराष्ट्र शासन नगररचना सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल जिल्हा परिषदेचे माजी सभापती शैलेश पवार, शेतकरी संघटनेचे राज्य समन्वयक कुबेर जाधव, डॉ. जे. डी. पवार, सोसायटीचे चेअरमन दीपक पवार, तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सोमनाथ जगताप आदींनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अरुंधती देवरे हिचे वडील भाऊसाहेब देवरे व आई भारती देवरे उपस्थित होते.

# 'काळी मैना'चे अस्तित्व आजही टिकूनच

## झाडांची संख्या कमी होत असल्याने संवर्धन करणे गरजेचे

**दिंडोरी : प्रतिनिधी**

**डोंगरची 'काळी मैना' म्हणून सर्वदूर परिचित असलेली करवंदे आदिवासी भागातील डोंगरट्यात बहरू लागली असून, या काळ्या मैनेला पांढऱ्या फुलांचा बहर सुरू झाला असून, झाडावर हिरवेगार तसेच काळे रंगाचे करवंदे दर्शन देत आहे. ऐन उन्हाळ्यात हा रानमेवा तयार होऊ पाहत असल्याने आगामी दोन महिने या भागात रानमेव्याचा आस्वाद घेता येणार आहे.**

फाल्गुन महिना सुरू झाल्यानंतर प्रथम दर्शन होते ते डोंगराच्या कुशीत याच्या काटेरी जाळ्या पसरलेल्या करवंदांच्या फुलांचे. सुरगाणा, पेठ, इगतपुरी, दिंडोरी, हरसूल व कळवण पश्चिम भागात झाडाझुडपांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या रानटी फळे अर्थात रानमेव्याचे अस्तित्व टिकून राहू पाहत आहे.

या रानमेव्यात प्रामुख्याने करवंदे तसेच आळू, आमगुळे, तोरणे या झुडुप जातीच्या वृक्षांना आता फुले येऊ लागली आहेत. करवंदांच्या जाळ्या सध्या पांढऱ्या रंगाच्या फुलांनी बहरल्या असल्याने मोहक दिसून येत आहेत, तोंडाला पाणी सुटेल असा चविष्ट, आंबट गोड, रसाळ रानमेवा म्हणजे करवंदे होय. जिभेवर ठेवताच तासन्तास या रानमेव्याची विशिष्ट चव रेंगाळत राहते. चैत्र महिना सुरू झाल्यानंतर प्रथम दर्शन होते ते आंबट-गोड चवीच्या करवंदांचे. डोंगराच्या कुशीत याच्या



काटेरी जाळ्या पसरलेल्या असतात.

या वृक्षाला पांढऱ्या रंगाची फुले येतात. फुलांची गळती झाल्यावर हिरव्या रंगाचे करवंद बहरतात. पिकल्यावर त्यांचा रंग काळा होतो. आदिवासी बांधव पहाटे लवकर करवंदे तोडण्यासाठी रानात पायपीट करीत असतात. या भागातील करवंदे नाशिक, मालेगावपासून तर जळगावपर्यंत पाठविली जातात. मात्र, हक्काची बाजारपेठ नसल्याने व्यापारी वाटेल त्या भावात करवंदे खरेदी करून स्वतःचे उखळ पांढरे करून घेताना दिसून येतात. तर लहान बालके व वृद्ध महिला पळसाच्या पानांचे द्रोण भरून दिंडोरी व कळवण तालुक्याच्या मध्यस्थी असलेल्या सप्तशृंगीमाता वणी गड या रस्त्याच्या कडेला बसून करवंदे, आवळे विक्री करतात. करवंदांपासून लोणचे तयार करत असून, आंब्याचा मोसम सुरू होण्यापूर्वीच करवंदाचा मोसम सुरू होत असल्याने कच्च्या करवंदापासून चांगल्या प्रतीचे लोणचे तयार करता येते. करवंद फळ असून, त्याचा आरोग्याच्या दृष्टीने उपयोग होतो. यामधील अनेक घटक रोगप्रतिबंधांचे काम करतात. करवंद हे नाशवंत फळ असल्याने जास्त काळ टिकत नाही, मात्र कच्च्या करवंदाचे लोणचे व पिकलेल्या करवंदांचा मुरंबा केला तर मात्र जास्त दिवस टिकतो. त्यामुळे या फळांवरील प्रक्रियायुक्त उत्पादनासाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याने शासनाने यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

याबाबत स्थानिक नागरिकांनी करवंद फळाचे अनेक फायदे कथन केले असून, तोडलेली करवंदे आजूबाजूच्या खेड्यापाड्यात तसेच तालुक्याच्या ठिकाणी विक्रीसाठी नेली जातात. त्यातून चार पैसे मिळत असतात. परंतु सध्या डोंगरांना लागणारे वणवे व वृक्षतोड यांसारख्या कारणामुळे रानमेवा धोक्यात आला आहे. झाडांची संख्या कमी होत असल्याने या करवंदांसारख्या झाडांचे संवर्धन होणे गरजेचे असून, शासन पातळीवर याबाबत उपाययोजना करणे गरजेचे ठरत आहे.

## महत्त्वाचे

### अवकाळीचे वातावरण, किरकोळ पावसाची शक्यता

**सिन्नर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मंगळवार दि. १८ ते शनिवार दि. २२ मार्चदरम्यानच्या पाच दिवसांत ढगाळ वातावरणासहित अगदीच तुरळक ठिकाणी किरकोळ पाऊस विजा, वारा व गडगडाटीच्या वातावरणाची शक्यता असल्याचा अंदाज सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला. मध्य महाराष्ट्रातील खांदेश ते कोल्हापूर सोलापूर जिल्ह्यापर्यंतच्या दहा जिल्ह्यांत मंगळवार दि. १८ ते गुरुवार दि. २० मार्चदरम्यानचे तीन दिवस तर मराठवड्यातील आठ जिल्ह्यात मंगळवार दि. १८ ते शुक्रवार दि. २१ मार्च दरम्यानचे चार दिवस व विदर्भातील अकरा जिल्ह्यांत शुक्रवार व शनिवार दि. २१-२२ मार्चदरम्यानचे दोन दिवस या अवकाळी वातावरणाचा परिणाम जाणवेल असे वाटते. विशेषतः मराठवाडा, विदर्भ व जळगांव दक्षिण नगर सातारा सांगली सोलापूर या जिल्ह्यांत शुक्रवार दि. २१ मार्चला या वातावरणाचा प्रभाव अधिक जाणवेल असे वाटते. दरम्यानच्या पाच दिवसांत कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात दिवसाच्या दुपारच्या कमाल तापमानात काहीशी घट होऊन तापमान सध्यापेक्षा २-३ डिग्रीने खालवेल असा अंदाज खुळे यांनी व्यक्त केला.

### कानडी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त वृक्षसंवर्धन २८ हजारांचा निधी

**सिन्नर : प्रतिनिधी**



येथील दिवंगत कवी प्रा. चंद्रकांत कानडी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त उमाळा या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात कवितासंग्रहाच्या विक्रीतून जमा झालेल्या रु.२३,४००/- रकमेसह कानडी कुटुंबीयांकडून वैयक्तीकरीत्या ५ हजार असे २८ हजार ४०० रुपयांची देणगी ग्रीन रिवोल्यूशन संस्थेला वृक्षसंवर्धनासाठी देण्यात आली. याप्रसंगी डॉ. ललित पवार, आनंद कानडी यांच्यासह ग्रीन रिवोल्यूशनचे पदाधिकारी व कानडी कुटूंबिय उपस्थित होते.

### कोपरगाव शहरातील ३.८८ कोटींच्या विकासकामांना मान्यता : आ. काळे

**वावी : वार्ताहर**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत कोपरगाव शहरातील ३.८८ कोटींच्या विविध विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात



आली असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली. कोपरगाव शहराच्या विकासाला गती देवून आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहराचा पाणी प्रश्न, रस्ते, व्यापारी संकुल, शहर सुशोभिकरण अशा विविध विकास कामांना मोठ्या प्रमाणात निधी देवून विकासाच्या बाबतीत कोपरगाव शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. कोपरगाव शहरातील नागरीकांसाठी पादचारी मार्ग, भूमिगत गटारी आदी सुविधा उपलब्ध होवून नागरीकांच्या अडचणी दूर व्हाव्यात यासाठी कोपरगाव शहराच्या विविध प्रभागातील विकास कामांना निधी मिळावा यासाठी केलेल्या पाठपुराव्यामुळे कोपरगाव शहरातील एकूण नऊ प्रभागातील विविध विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कोपरगाव शहरातील उर्वरित प्रभागातील शिल्लक विकास कामांना देखील लवकरात लवकर निधी उपलब्ध व्हावा यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरु असून त्या कामांना देखील लवकरच मंजुरी मिळणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले आहे. कोपरगाव शहरातील नऊ प्रभागातील ३.८८ कोटीच्या विविध विकास कामांना प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल आ.आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजित पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री ना.एकनाथ शिंदे, जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा. यांचे कोपरगाव शहरातील जनतेच्या वतीने आभार मानले आहे.

### सिन्नर वाचनालयात शंकरशेठ वाजेंना अभिवादन



**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सिन्नर सार्वजानिक वाचनालयात लोकनेते शंकरशेठ बाळाजी वाजे स्मृतिदिन साजरा करण्यात आला. वाचनालयाचे कार्यवाह हेमंतनाना वाजे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात संचालक मनीष गुजराती यांच्या हस्ते वाजे यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी संचालक जितेंद्र जगताप, मोईज बोहरी, नीलेश जगताप, तुकाराम यादव, विकास उकाडे आदी उपस्थित होते.

# औंढेवाडीत महिलांकडून अवैध दारू विक्रेत्याला बेदम चोप

## सिन्नर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह, गावातील १२ ग्रामस्थांवर गुन्हा दाखल

**सिन्नर : प्रतिनिधी**

**पोलिसांकडे वारंवार तक्रार करूनही गावातील अवैध दारू विक्री थांबत नसल्याने संतप्त झालेल्या महिलांनी थेट दारू दुकान गाठत दारू विक्रेत्याला बेदम चोप दिल्याची घटना तालुक्यातील औंढेवाडी येथे मंगळवारी (दि.१८) घडली. विशेष म्हणजे, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने सिन्नर पोलिसांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत.**

दारूबंदी करण्यात पोलिसांना अपयश आल्याने संतप्त झालेल्या महिलांना टोकाचे पाऊल उचलावे लागले. त्यामुळे तालुक्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अवैध दारू विक्रीला सिन्नर पोलिसांचे असलेले अभय या निमित्ताने समोर आले असून त्यामुळेच स्थानिक महिलांना कायदा हातात घ्यावा लागला.

दरम्यान, दारू विक्रेत्याला चोप महिलांनी दिला असला तरी गैर कायद्याची मंडळी जमवून मारहाण केल्याप्रकरणी दारू विक्रेत्याने दिलेल्या फिर्यादीवरून गावातील १२ पुरुषांच्या विरोधात सिन्नर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणी आता गावकरीच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहिले आहेत. साहजिकच त्यामुळे सिन्नर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि बिटावर असलेले कर्मचारी यांच्या अर्थपूर्ण घडामोडीची चर्चा तालुक्यात झडू लागली आहे.

**पोलिसांकडून छापा टाकण्याची औपचारिकता**

औंढेवाडी - आगासखिंड रोड परिसरात अजय कुंदे याने गेल्या दोन-तीन महिन्यापासून हॉटेल रानवारा सुरू केले आहे. तेथेच तो अवैध दारू विक्री करत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. त्यातून पोलिसांना तक्रारही करण्यात आली होती.



दरम्यान, पोलिसांच्या म्हणण्यानुसार धाडी टाकूनही त्याच्याकडे माल आढळून आला नाही. दुसरीकडे पोलिसांकडूनच धाड टाकण्यापूर्वी सबंधितांना कळवले जात असल्याने अवैध दारू विक्रीचे प्रमाण वाढले होते.

त्यामुळे गावातील तरुण वाम मार्गाला लागले. शिवाय त्यांच्याकडून घरातील महिलांना मारझोड होत असल्याने महिला संतप्त झाल्या. संबंधित दारू विक्रेत्याला मंदिरासमोरही बोलावून दोन-तीन वेळा समज देण्यात आली. मात्र त्याने ग्रामस्थांना न जुमानल्याने अखेर संतापाच्या कडेलोट झाला आणि मंगळवारी महिलांनी त्याला धडा शिकवला.

### तीनही पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध धंदे

सिन्नर, वावी आणि मुसळगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सध्या मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री सुरू आहे. पोलीस अधीक्षक शहाजी उमप यांच्या काळात बंद झालेले सर्व धंदे सध्या बिनदिक्कतपणे सुरू आहेत. पोलीस मात्र त्याकडे अर्थपूर्ण कानाडोळा करत असल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये खाकीच्या कार्यक्षमतेविषयी कमालीचा रोष आहे. तालुक्यात कायदा -सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांना आता त्यांच्या कर्तव्याची जाण करून देण्याची गरज निर्माण झाली आहे.



### क्रांतिवीर करंडक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत रोहन कवडे अव्वल

**सिन्नर : प्रतिनिधी**

**येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या क्रांतिवीर करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालय वक्तृत्व स्पर्धेत पुण्याच्या रोहन जोतिराम कवडे प्रथम तर तेजस दिनकर पाटील याने द्वितीय क्रमांक पटकावला.**

स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर के. व्ही. नाईक संस्थेचे उपाध्यक्ष उदय घुगे, विश्वस्त बबनराव सानप, नामदेवराव काकड, अशोकराव नागरे तसेच संचालक बाळासाहेब धात्रक, समाधान गायकवाड, जयंत आव्हाड आदी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर पखाले यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाचे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे हे पहिलेच वर्ष असूनही प्रचंड प्रतिसाद राज्यभरातून मिळाला ही बाब महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख उंचावणारी आहे, असे प्रतिपादन देशपांडे यांनी केले. तरुणाईने वाचन संस्कृती जोपासून अशा स्पर्धेच्या ठिकाणी आपली छाप पाडावी असा आशावाद संचालक जयंत आव्हाड यांनी व्यक्त करीत स्पर्धकांना मार्गदर्शन केले. के. व्ही. एन. नाईक महाविद्यालय नाशिक येथील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक दिलीप कुटे यांनी वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी या हेतूने महाविद्यालयास ४० पुस्तके भेट दिली. स्पर्धेचे परीक्षण सुजित काळुंगे व रोहित जाधव यांनी केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक रोहन जोतिराम कवडे (पुणे), द्वितीय क्रमांक तेजस दिनकर पाटील(पुणे), तृतीय क्रमांक श्रुती अशोक बोरस्ते ( नाशिक), चतुर्थ क्रमांक अक्षदा दत्ता वडवणीकर (अ. नगर), पाचवा क्रमांक आकाश दत्तात्रय मोहिते (अ. नगर) यांनी प्राप्त केला. तसेच क्रांतिवीर करंडक २०२४-२५ एच. पी. टी. महाविद्यालय यांच्या संघाला देण्यात आला. सूत्रसंचालन वाड्मय विभाग प्रमुख प्रा. मंगल सांगळे यांनी केले तर क्रीडा विभाग प्रमुख प्रा. अमोल आव्हाड यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील एसडीडब्ल्यू अधिकारी प्रा.डॉ. ज्योती गायकवाड, सांस्कृतिक समन्वयक प्रा. पूनम कुटे, परीक्षा विभागप्रमुख प्रा. संतोष आव्हाड, आयक्युएसी समन्वयक प्रा. ज्ञानेश्वर चकोर, इतर प्राध्यापक, विद्यार्थी व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# वाजे विद्यालयात वार्षिक गुणगौरव सोहळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

**येथील लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात वार्षिक गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला.**

मविप्रचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपिठावर उद्योजक किशोरशेठ राठी, एस.जी पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक उदय कुदळे, शालेय समिती सदस्य भाऊसाहेब गोजरे, बबनराव ठोक, डॉ. विजय लोहारकर, माजी मुख्याध्यापक किशोर जाधव, अभिनव बाल विकास मंदिरच्या मुख्याध्यापिका आशा उमप, सिन्नर तालुका मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रा.राजाराम मुंगसे, अर्जुनराव गोजरे गुरूजी, सौ व्यवहारे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.




यावेळी माजी आमदार कै.सूर्यभानजी गडाख यांच्या स्मरणार्थ राजेशजी गडाख यांनी विद्यालयात ठेवलेल्या एक लाख रुपये एफ.डी.च्या व्याजातून, कै.लिलाबाई शिरोळे यांच्या स्मरणार्थ विद्यालयात ठेवलेल्या एक लाख रुपये एफ.डी.च्या व्याजातून व इयत्ता दहावी मार्च ९३-९४ च्या विद्यार्थ्यांनी ठेवलेल्या अकरा हजार रुपये एफडीच्या व्याजातून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या हस्ते शालेय विद्यार्थी व शिक्षक यांनी तयार केलेल्या हस्तलिखिताचे अनावरण करण्यात आले.

यावेळी विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती मंगल हांडे , पर्यवेक्षक राम ढोली, ज्येष्ठ शिक्षक नंदू घोटेकर, मच्छिंद्र धातडक, यशवंत दाणी, दिलीप सहाणे, मनिषा बनकर, सुनिता अहिरे, ज्योती पगार आदींसह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन जितेंद्र शिंदे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक राम ढोली यांनी मानले.



सिन्नर येथे रंगपंचमी खेळताना नागरिक.

# पंचाळेत टांगा शर्यतीदरम्यान शेततळ्यात बुडून बैल आणि घोड्याचा मृत्यू

**सिन्नर : प्रतिनिधी**

**शर्यत पूर्ण करून आलेला टांगा वळण घेत असताना त्याला दुसऱ्या टांग्याचा धक्का लागला आणि उधळलेल्या घोडा - बैलाने थेट पाटीपासून काही अंतरावर असलेल्या शेततळ्याकडे धाव घेतली. या तळ्यात घोडा-बैलाचा बुडून करून अंत झाल्याची घटना तालुक्यातील पंचाळे येथे घडली. विशेष म्हणजे यात टांग्यावरून पडल्याने गाडीवान जखमी झाला, मात्र तो शेततळ्यात पडण्यापासून बचावला.**

या घटनेत निफाड तालुक्यातील करंजी खुर्द येथील अडसरे कुटुंबीयांचा पवन नावाचा बैल आणि विजू नावाचा घोडा गतप्राण झाला. त्यामुळे अडसरे कुटुंबीयांसह टांगाशौकिनांमध्ये शोककळा पसरली.

रंगपंचमीच्या आदल्या दिवशी मंगळवारी (दि.१८) तालुक्यातील पंचाळे येथे कानिफनाथ महाराज यात्रोत्सवानिमित्त खडांगळी रस्त्यालगत टांगा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. करंजी खुर्द (ता. निफाड) शेतकरी कैलास अडसरे, नवनाथ अडसरे, सचिन अडसरे यांच्यासह मित्रांनी पवन (बैल) आणि विजू (घोडा) टांगा शर्यतीला जुंपले होते. शर्यत झाल्यानंतर पवन - विजू यांचा टांगा पाटी लगत स्थिरावत होता. त्यावेळी माघारी फिरुन येताना पवन - विजूला शेजारच्या टांग्याचा धक्का बसला. त्यामुळे पवन - विजूचा टांगा बिथरला. टांग्यासह बैल - घोडा सैरभैर पळाले. त्यामुळे टांगा स्वार जमीनीवर कोसळला. शर्यतीच्या पाटी पासून सुमारे ५०० फुट अंतरावर असलेल्या पंचाळेच्या शेतकऱ्याच्या शेततळ्यावर टांगा चढला. शेततळ्यावर जाण्यासाठी असणार्या बाजूने बैल घोडा टांग्यासह पळत सुटले. शेततळ्याच्या निम्मा भागात बैल पवनचा पाय प्लास्टिक आच्छादनारून सरकला. त्यामुळे टांग्याचे दोरखंड दोन्ही जनावरांच्या पायांना गुंडाळून गेले. पवनने विजूला टांग्यासह ओढले. त्यामुळे बैल- घोडा टांग्यासह शेततळ्याच्या पाण्यात बुडाले. टांगा शौकीनांसह ग्रामस्थांनी शेततळ्याकडे धाव घेतली. पण तो पर्यंत घोडा - बैल पाण्यात बुडाले होते. त्यांना वाचवण्यासाठी टांगा स्वारांनी शेततळ्यात उड्या घेतल्या. दोन तासांच्या अथक परिश्रमानंतर घोडा बैलाला शेततळ्याच्या बाहेर काढले. मात्र तोपर्यंत दोन्हीही जनावरे मृत झाली होती. करंजी येथे शेतकरी कैलास अडसरे यांच्या शेतात पवन - विजूवर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, यासंदर्भात मुसळगाव पोलीस ठाण्यात मात्र कुठलीही नोंद करण्यात आली नव्हती.




### सिन्नर तहसीलकडून ७७ दिव्यांगांना अंत्योदय शिधापत्रिकेचे वितरण

**सिन्नर : प्रतिनिधी**

**दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या तालुक्यातील ७७ दिव्यांग बांधवांना सिन्नर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या वतीने अंत्योदय शिधापत्रिकेचे वितरण करण्यात आले.**

तहसिलदार सुरेंद्र देशमुख, पुरवठा निरीक्षण अधिकारी विवेक जमधडे, पुरवठा निरीक्षक राजेंद्र पोळ, पुरवठा लिपिक सोनाली आहेर, मुरलीधर चौरे, प्रहारचे जिल्हाध्यक्ष अरुण पाचोरे, शशिकांत सावंत, अमोल वाजे, मेघा दराडे आदींसह मान्यवरांच्या उपस्थितीत या शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. तहसिल मधील पुरवठा विभागाच्या पुढाकारामुळे ७७ दिव्यांगांच्या कुटूंबातील सदस्यांना आता अंत्योदय शिधापत्रिकेवरील धान्यासह शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे.

प्रहारचे जिल्हाध्यक्ष अरुण पाचोरे यांनी गरजू दिव्यांग बांधवांना अंत्योदय शिधापत्रिकेचा लाभ मिळावा यासाठी पुरवठा निरीक्षण अधिकारी विवेक जमधडे, तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांच्याकडे अंत्योदय शिधापत्रिका मिळण्यासाठी पाठपुरावा केला होता. त्यानंतर पुरवठा विभागाकडे दिव्यांग बांधवांच्या कागदपत्रांची जुळवाजुळव करत प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावांची पडताळणी करत तहसीलदार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा विभागाच्या वतीने या प्रकरणांना मंजुरी देण्यात आली.

तहसीलदारांच्या हस्ते या अंत्योदय शिधापत्रिकांचा लाभ मिळाल्याने दिव्यांग बांधवांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी प्रहारचे तालुकाध्यक्ष दौलत ढोली, नामदेव आडके, भगवान पगार, नंदू शिरसाठ, चंद्रकांत पवार, आनंद सातभाई, महेश भोसले, वैभव वेलजाळी, मालन आव्हाड, सिमाताई वाकळे, कविता खैरनार आदी उपस्थित होते.



### माळेगाव - मापारवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी स्वाती आव्हाड विजयी

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील माळेगाव - मापारवाडी येथील ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी चुरशीच्या निवडणुकीत स्वाती गोरख आव्हाड यांनी विरोधी उमेदवार रूपाली अनिल आव्हाड यांच्यावर ३ मतांनी विजय मिळवला. स्वाती आव्हाड यांना ९ तर रूपाली आव्हाड यांना ६ मते मिळाली.

सहकारी सदस्यांना संधी मिळावी यासाठी प्रिया केशव सांगळे यांनी सरपंचपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर रिक्त पदासाठी निवडणूक निर्णय अधिकारी ए. बी. गायके यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.१९) ग्रामपंचायतीच्या सभागृहात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच पदासाठी रूपाली अनिल आव्हाड आणि स्वाती गोरख आव्हाड यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले.

रूपाली आव्हाड यांच्या अर्जावर सुनिता कोकाटे यांनी तर स्वाती आव्हाड यांच्या अर्जावर रामदास सांगळे यांनी सूचक म्हणून स्वाक्षरी केली होती. छाननीत दोन्ही अर्ज वैध ठरल्यानंतर आणि माघारीत कुणीही माघार न घेतल्याने सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.

यावेळी चिठ्ठ्या टाकून केलेल्या मतदानात स्वाती आव्हाड यांना ९ तर विरोधी उमेदवार रूपाली आव्हाड यांना ६ मते मिळाली. स्वाती आव्हाड यांची सरपंचपदी बहुमताने निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी गायखे यांनी केली. त्यांना ग्रामविकास अधिकारी एस. एम. बेनाडे यांनी सहाय्य केले. याप्रसंगी मावळत्या सरपंच प्रिया केशव सांगळे, रामदास सांगळे, महेंद्र रमेश सांगळे, प्रमोद पवार, मीना पवार, शोभा विघे, रतन जाधव, प्रिया सांगळे, पूजा जाधव, कैलास सांगळे, विजया जाधव, सविता सांगळे, सुनिता कोकाटे आदी सदस्य उपस्थित होते. निवडीनंतर स्वाती आव्हाड यांच्या समर्थकांनी गुलालाची उधळण करत आनंदोत्सव साजरा केला.

# वडांगळीकरांना धिंडीसाठी मिळाला जावई

## शिवशंभू ग्रुपचा पुढाकार, सलग दोन वर्षे परंपरा झाली होती खंडित

**सिन्नर : प्रतिनिधी**

**डोईवर सुपाचे बाशिंग, कपाळी लसणाच्या मंडवळ्या, गळ्यात कांदा आणि तुटक्या चपलांचा हार घालून तसेच चेहऱ्याला विविध प्रकारचे रंग लावत वडांगळी येथे रंगपंचमीच्या दिवशी जावयाची गाढवावर बसवून वाजतगाजत रंगांची उधळण करत मिरवणूक काढण्यात आली.**

सलग दोन वर्षे खंडित झालेली जावयाची गाढवावरून मिरवणूक काढण्याची परंपरा यंदा सुरू होणार की नाही, अशी शंका उपस्थित केली जात होती. मात्र, वडांगळी गावातील शिवशंभू ग्रुपने त्यासाठी पुढाकार घेत गावातीलच रामेश्वर शिवराम शिंदे (२७) या जावयाला पकडून रंगपंचमीच्या मुहूर्तावर त्यांची गाढवावर बसवून वाजतगाजत मिरवणूक काढून खंडित झालेली परंपरा सुरू ठेवली. रामेश्वर शिंदे हे गावातीलच संदीप भोकनळ यांचे जावई आहेत.



वडांगळी गावातून जावयाची काढण्यात आलेली धिंड.

धूलिवंदन ते रंगपंचमीदरम्यान वडांगळी आणि पंचक्रोशीतील गावांमधून जावयाचा शोध घेऊन त्यांची गाढवावरून मिरवणूक काढली जाते. यंदा शिवशंभू ग्रुपचे कार्यकर्ते जावयाच्या शोधासाठी जंग जंग पछाडत होते. अशातच त्यांना गुरुवारी (दि.१९) सकाळी रामेश्वर शिंदे यांना थेट घरी जाऊन पकडण्यात यश आले.

त्यानंतर दुपारी ५ वाजता जावयाची मिरवणूक काढण्यात आली. १००० लिटर रंगाची या मिरवणुकीत उधळण करण्यात आली. मिरवणूक मार्गात पाण्याचे टँकरही ठेवण्यात आले होते. कोरोनाचा काळ आणि मधले एक-दोन वर्ष वगळता ही प्रथा निरंतर सुरूच होती. मात्र आता २०२३ आणि २०२४ अशा सलग दोन वर्ष तरुणांनी ही प्रथा जपण्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी, लागोपाठ दोन वर्षे गावातून जावयाची मिरवणूक निघालीच नव्हती.

### तरुणांचा पुढाकार अन् ज्येष्ठांचे समाधान...

जावयाची गाढवावरून धिंड काढण्याची शेकडो वर्षांची परंपरा लोप पावते की काय, अशी भीती तरुणांना वाटत होती. त्यातूनच शिवशंभो ग्रुपच्या तरुणांनी ही प्रथा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यासाठी त्यांनी सायखेडा येथून एका कुंभाराकडून गाढव भाड्याने आणले. त्याचबरोबर गावातीलच संदीप भोकनळ यांचे जावई रामेश्वर शिंदे यांना लाडीगोडी लावत दिवसभर आपल्यासोबत ठेवले. दुपारी ५ वाजेच्या सुमारास त्यांची गाढवावर बसून डीजेच्या तालावर वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. तरुणांच्या पुढाकाराने ही परंपरा सुरू झाल्याने गावातील ज्येष्ठांनी समाधान व्यक्त केले.

### सुगंधी उटण्याने आंघोळ अन् मानपानही

गावातून वाजतगाजत मिरवणूक पार पडल्यानंतर सुगंधी उटणे, साबण लावून सुहासिनींनी लग्नाचे पारंपरिक गाणे म्हणत जावई रामेश्वर शिंदे यांना सासरे संदीप भोकनळ यांच्या घरासमोर पाटावर बसून आंघोळ घालण्यात आली. त्यानंतर त्यांना नवीन वस्र परिधान करायला दिली. यथोचित मानसन्मान ग्रामस्थांच्या वतीने त्यांना दिला गेला.